ऋषिपंचमीनिमित्त दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या सामुदायिक अथर्वशीर्ष पठण उपक्रमाचा जागतिक विक्रम झाला आहे. तब्बल ३५ हजार २१५ महिलांच्या अथर्वशीर्ष पठण उपक्रमाची नोंद ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंड मध्ये झाली. जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी ट्रस्टला प्रदान केले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पांचे दर्शन घेऊन आरती केली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे ट्रस्टचे सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला.

**१८. २५१ किलोचा रसमलाई मोदक केक**

गणपती चरणी डब्लू.एस. फूड्स चे संस्थापक सुदेश अगरवाल यांनी २५१ किलोचा रसमलाई मोदक केक अर्पण केला. गणेशोत्सवात भाविक विविध प्रकारचा नैवेद्य बाप्पाला अर्पण करतात. मात्र, पुण्यातील डब्लू एस फूड्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी प्रथमच एवढा भव्य मोदक आकाराचा रसमलाई केक अर्पण केला आहे. हा केक तयार करण्यासाठी १० ते १२ तासाचा वेळ लागला आणि जवळपास १५ ते १८ जणांनी मिळून हा केक बनवला आहे.

## १९. भाविकांसाठी उत्सवात ३ ठिकाणी केंद्र, मोफत रुग्णवाहिका सेवा आणि आयसीयू

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेण्याकरिता केवळ पुण्यातूनच नव्हे तर जगभरातून भाविक लाखोंच्या संख्येने येतात. या भाविकांसाठी जय गणेश प्रांगणासह मंदिर परिसरात ३ ठिकाणी सुसज्ज अशी २४ तास मोफत वैद्यकीय मदत केंद्र सिटी पोस्ट, गणपती मंदिर व मांगल्य मंगल कार्यालय येथे उपलब्ध केली होती. गणपती मंदिराजवळ महाराष्ट्र राज्य उपसंचालक आरोग्य सेवा पुणे तर्फे २४ तास मोफत व्हेंटिलेटर, आयसीयू ९ बेडची सुविधा देण्यात आली होती. पुण्यातील नामांकित ३५ रुग्णालयांच्या सहकार्याने वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. मंडप परिसरात ४ रुग्णवाहिका देखील ठेवण्यात आल्या आहेत. भारती हॉस्पिटल रिसर्च सेंटर धनकवडी, सूर्या सह्याद्री हॉस्पिटल, जहांगिर हॉस्पिटल, रुबी हॉल क्लिनिक, सिल्व्हर बर्च मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, डॉ.डी.वाय. पाटील हॉस्पिटल पिंपरी, ससून सर्वोपचार रुग्णालय, संचेती हॉस्पिटल येथे मोफत वैद्यकीय सेवा ट्रस्टने उपलब्ध केली होती. एन.एम.वाडीया हृदय रुग्णालय पुणे स्टेशन येथे मोफत कार्डियाक रुग्णवाहिका सेवा विनामूल्य मिळणार आहे. तर, ट्रस्टच्या ११ रुग्णवाहिका उत्सवकाळात पुणे शहर, पिंपरी-चिंचवड परिसरात विनामूल्य स्वरुपात कार्यरत होत्या. वैद्यकीय मदत केंद्रावर तसेच रुग्णवाहिकांच्या येथे मोफत औषधे देण्यात येणार असून आरोग्यविषयक सर्वतोपरी मदत भाविकांना देण्याची सुविधा ट्रस्टने उपलब्ध करुन दिली होती.

## २०. रुग्णांसाठी 'दगडूशेठ' गणपतीचे रुग्णालयातून 'व्हर्च्युअल' दर्शन

यंदा सलग १० व्या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे 'इमर्सिव्ह दर्शन' हे ज्यांना प्रत्यक्ष उत्सवात येणे शक्य नाही अशांसाठी ट्रस्टने उपलब्ध करून दिले आहे. व्हर्च्युअल रिॲलिटी द्वारे यंदाच्या सजावटीमध्ये प्रत्यक्ष आपण उभे आहोत तसेच थेट गुरुजींच्या शेजारी उभे राहून आरतीत सहभागी झाल्याचा अनुभव रुग्णांनी घेतला. रुग्णालयात असूनही बाप्पाचे दर्शन घेता आल्याने अनेकांचे डोळे पाणावले. अजय पारगे आणि संजय पारगे बंधू यांनी पुढाकार घेत हा अभिनव उपक्रम राबविला. मंगळवार पेठेतील कमला नेहरू रुग्णालय आणि कसबा पेठेतील सूर्या सह्याद्री रुग्णालयातील रुग्णांनी यानिमित्ताने दर्शनाचा आनंद घेतला. सन २०१६ मध्ये सुरू झालेला हा सेवा उपक्रम, अध्यात्म आणि तंत्रज्ञानाची सांगड घालून, अनेकांच्या आयुष्यात आनंद घेऊन आला. बाप्पाप्रती कृतज्ञता आणि परंपरेचा आदर म्हणून पारगे कुटुंबातील तिसऱ्या पिढीने ही सेवा आधुनिक मार्गाने पुढे नेली आहे. हा संपूर्ण उपक्रम डिजिटल आर्ट व्हीआरई प्रा. लि. या कंपनीमार्फत राबवला जातो. दगडूशेठ गणपतीची दिव्य आरती ३६० कॅमेऱ्यात कैद केली आहे आणि आता ती रुग्णांसाठी रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून दिली.

## २१. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले गणपती चे दर्शन

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पांचे दर्शन घेऊन आरती केली. महाराष्ट्रावर गेल्या वर्षभरात आलेल्या नैसर्गिक संकटांमुळे जनता त्रस्त होती. यातून जनतेला आणि विशेषतः बळीराजाला पुन्हा उभं करण्यासाठी बळ दे अशी प्रार्थना त्यांनी केली.

## २२. 'दगडूशेठ' गणपती मंदिराला युनिव्हर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला अमेरिकेतील युनायटेड स्टेट्स ऑफ मिसूरीने युनिव्हर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यांचेमार्फत एकाच मंदिरात वर्षभर जास्तीत जास्त भाविकांच्या भेटीचा जागतिक विक्रम केल्याबद्दल अधिकृतपणे मान्यता दिली आहे. याबद्दलचे प्रमाणपत्र गणेशोत्सवात ट्रस्टला प्रदान करण्यात आले. सदर सन्मान संपूर्ण वर्षामध्ये भाविकांच्या सतत येणाऱ्या गर्दीची दखल घेत देण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची ख्याती केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात आहे. विविध देशांतून भाविक मोठ्या संख्येने गणरायाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात येतात. त्यामुळे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर हे जागतिक स्तरावर सर्वाधिक भेट दिलेल्या आध्यात्मिक स्थळांपैकी एक बनले आहे. युनिव्हर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि जागतिक नोंदणीच्या अधिकृत समितीने हा विक्रम सत्यापित आणि प्रमाणित केला आहे.

## २३. डाक विभाग महाराष्ट्र सर्कल तर्फे 'गणेशोत्सव २०२५' विशेष कॅन्सलेशनचे प्रकाशन

भारतीय डाक विभागाने राष्ट्रीय सण, संस्कृती व वारसा टपाल तिकिटे आणि विशेष कॅन्सलेशनकडे साजरा करण्याची अविरत परंपरा सुरू ठेवली आहे. यंदा 'दगडूशेठ' गणपतीसमोर भारतीय डाक विभाग, महाराष्ट्र सर्कल च्या वतीने 'गणेशोत्सव २०२५' या विषयावर विशेष कॅन्सलेशन प्रकाशित करण्यात आले. गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्याचा आनंद व्यक्त करण्यासोबतच ट्रस्टच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने हे विशेष कॅन्सलेशन जारी करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंग, डाक सेवा पुणे विभागाचे निदेशक अभिजीत बनसोडे उपस्थित होते. 'गणेशोत्सव २०२५' या विषयावर विशेष कॅन्सलेशन व मोहोर ही प्रत्येक चिठ्ठीला लावण्यात आली. यामध्ये श्री गणेशाचे चित्र साकारण्यात आले आहे. प्रख्यात कॅलिग्राफिस्ट अच्युत पालव यांनी हे चित्र साकारले आहे.

## २४. १ टन निर्माल्यापासून ३०० किलो खताचे शेतकऱ्यांना मोफत वाटप

गणेशोत्सव म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा उत्सव. उत्सव काळात मंडप आणि परिसरात चोवीस तास स्वच्छता केली जाते. निर्माल्य गोळा केले जाते. 'दगडूशेठ' गणपतीच्या चरणी भक्तिभावाने अर्पण केलेले फुले, हार, नारळ हे निर्माल्य शेतकऱ्यांच्या आयुष्यात आनंद पेरत आहे. मागील नऊ वर्षांपासून रोटरी क्लब ऑफ पुणे युवा या निर्माल्याला नवा अर्थ देत आहे.उत्सवात जमा होणारे निर्माल्य डीपी रस्त्यावरील जोशी किचन जवळ उभारलेल्या 'निर्माल्य श्रेडिंग प्रकल्पा'त नेण्यात येते. तेथे निर्माल्याची पावडर करून त्याचे सेंद्रिय खत तयार केले जाते आणि ते खत विनामूल्य अन्नदाता शेतकऱ्याला दिले जाते. दररोज १ टन निर्माल्यापासून साधारण ३०० किलो खत तयार केले जाते. यंदा या प्रकल्पाचे नववे वर्ष सुरू झाले. क्लबचे अध्यक्ष अविनाश डोईफोडे, सचिव दिनेश अंकम व प्रकल्प संयोजक मनोज धारप यांसह इतर सभासद प्रकल्पाचे काम करीत असतात.

## २५. मंत्रजागर

वेदऋचांचे पठण ऐकून देवदेवतांना आनंद होतो. त्यामुळे आपल्याकडे शुभप्रसंगी किंवा मंगल प्रसंगी ब्रह्मवृंदांकडून मंत्रजागर करण्याची परंपरा आहे उत्सवात मंडपामध्ये मंत्रजागर केला जातो. सत्यविनायक पूजन हे गणपतीचे एक व्रत आहे. आपल्याकडे सत्यनारायण करण्याची परंपरा आहे. सत्यनारायण हे भगवान श्री विष्णूंचे पूजन आहे, तर सत्यविनायक हे भगवान श्री गणेशाचे पूजन आहे. याचा प्रचार व प्रसार गणेश भक्तांमध्ये होण्यासाठी मंडपात भाविकांसाठी सत्यविनायक पूजन करण्याची सुविधा आहे

## २६. हळदी कुंकू

गणेशोत्सवातील महिलांचा सहभाग वाढावा यासाठी जसे ऋषीपंचमीच्या दिवशी महिला अथर्वशीर्ष पठण

केले जाते तसे अनंत चतुर्दशीच्या पूर्वसंध्येला सुवर्णयुग तरूण मंडळाच्या महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम करण्यात येतो.

**२७. सुरक्षा व्यवस्था**

भाविकांच्या सुरक्षेसाठी उत्सव मंडप परिसरात सुमारे शंभर सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असतात ट्रस्टचे सुरक्षा रक्षक, खाजगी सुरक्षारक्षक आणि पोलीस दल असा तीन पदरी चोख बंदोबस्त असतो. सीसीटीव्ही वरती पोलिसांचा २४ तास वॉच असतो.

**२८. देणगी व प्रसाद काउंटर**

उत्सवात भाविकांसाठी देणगी स्वीकारण्याचे काउंटर असते. तसेच बाप्पाचा प्रसाद भाविकांना घरी नेता यावा यासाठी प्रसाद विक्रीही करण्यात येते. ही व्यवस्था मंदिरापासून उत्सव मंडपापर्यंत असते. याचे व्यवस्थापन कार्यकर्ते संभाळतात.

**२९. सामूहिक सत्यविनायक पूजा**

उत्सबमंडपात दिनांक ५ सप्टेंबर रोजी सामूहिक सत्यविनायक पूजेचे आयोजन करण्यात आले होते. सत्यविनायक पूजा ही भगवान शंकर व पार्वती मातेला ब्रह्मा, विष्णू, महेश, आदिशक्ती, सूर्य या पाच देवतांनी सांगितली असल्याचे सत्यविनायक पोथीत सांगण्यात आले आहे. सत्यविनायक पूजेला अनन्यसाधारण महत्त्व असून ते भाविकांपर्यंत यामाध्यमातून पोहोचविण्यात येत आहे. यंदा या पूजेसाठीही भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळत असल्याचे बघून पूजांची संख्या वाढवण्यात आली होती. त्यामुळे मंडपात दोन्ही बाजूला सत्यविनायक पूजनाचे आयोजन करण्यात आले होते.

**३०. श्री गणनायक रथातून श्रींची वैभवशाली सांगता मिरवणूक**

अनंत चतुर्दशीच्या दिवशी श्री गणनायक रथातून श्रींची वैभवशाली विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. दुपारी चार वाजता मंदिरापासून मिरवणूक सुरू झाली. भाविकांच्या सोयीसाठी, सुरक्षेसाठी आणि जास्तीतजास्त भाविकांना श्रींचे दर्शन व्हावे यासाठी ट्रस्टने दुपारी चार वाजता मुख्य विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय २०२३ साली घेतला. त्याला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे यंदा मिरवणूक मार्गावर दुतर्फा झालेल्या गर्दीने अधोरेखित केले. आकर्षक रंगीबेरंगी विद्युत रोषणाईने श्री गणनायक रथ उजळला होता. दरबार बँण्ड, प्रभात बँण्ड, स्वरूपवर्धिनीचे पथक अशा लवाजम्यासह हजारो कार्यकर्ते व भाविकांच्या उपस्थिती ही मिरवणूक दुपारी चार वाजता मंदिरापासून सुरू झाली. रात्री नऊ वाजता पांचाळेश्वर घाटावर श्रींचे विधीवत विसर्जन करण्यात आले. आबाल वृद्धांना घरबसल्या मिरवणुकीचा आनंद मिळावा यासाठी ट्रस्टच्या समाज माध्यम वरुन मिरवणुकीचे थेट प्रक्षेपण करण्यात येत होते.

**३१. गणेश भक्तांसाठी ५० कोटींचा विमा, १५० कॅमेऱ्यांचा वॉच, ४ एलईडी स्क्रिनची सुविधा**

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांसाठी पुणे शहर मनपा, पिंपरी-चिंचवड मनपा यांसह कॅन्टोनमेंट बोर्ड हद्दींतर्गत गणेशभक्तांसाठी तब्बल ५० कोटींचा विमा ट्रस्टतर्फे काढण्यात आला होता. यामध्ये चेंगराचेंगरी, अतिरेकी हल्ला व हवाई हल्ला झाल्यास विम्याचे सुरक्षाकवच मिळणार आहे. यामध्ये अपघाती मृत्यु झाल्यास प्रति व्यक्तीला ५ लाख रुपये, अपघातात अंशतः अपंगत्त्व आल्यास २ लाख रुपये आणि अपघातात जखमी झालेल्या प्रत्येक व्यक्ती ५० हजार रुपयांपर्यंत औषधाचा खर्च मिळण्याची सुविधा होती. श्री चे सुलभ दर्शन व्हावे यासाठी ४ एलईडी स्क्रिन लावण्यात आले होते. श्री चे ऑनलाईन दर्शन घेण्याची व्यवस्था होती. भाविकांच्या सुरक्षेसाठी उत्सव मंडप परिसरात १५० सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. फरासखाना चौक, बाबू गेनू गणपती, कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर, सिटी पोस्ट अशा परिसरात देखील सीसीटिव्ही कॅमेर होते. याशिवाय मंदिर परिसरात कायमस्वरुपी असलेल्या कॅमेऱ्यांचा वॉच उत्सवावर होता. त्यामुळे तब्बल १५० कॅमेऱ्यांद्वारे या परिसरावर पोलीस यंत्रणेसोबत ट्रस्टची २५० पुरुष व महिलांची खासगी सुरक्षाव्यवस्था होती.

**३२. 'दगडूशेठ' हलवाई गणपती ट्रस्टचे ज्येष्ठ विश्वस्त विजयकुमार वांबुरे यांचे निधन**

पुणे : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे जेष्ठ विश्वस्त विजयकुमार सुदाम वांबुरे (वय ८६ वर्ष) यांचे (दि.४ सप्टेंबर) वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले व एक मुलगी तसेच नातवंडे असा परिवार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे ते संस्थापक विश्वस्त होते. याशिवाय ट्रस्टच्या सजावटीचे व्यवस्थापन प्रमुख म्हणून देखील त्यांनी अनेक वर्षे काम केले आहे. सुवर्णयुग बँक संचालक म्हणून ते कार्यरत होते. ट्रस्टच्या सामाजिक कार्यात देखील त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. वोल्टस कंपनीमध्ये त्यांनी ४० वर्ष नोकरी केली असून त्याच कंपनीच्या कामगार सोसायटीचे ते अध्यक्ष होते.

**३३. त्रावणकोर राजघराण्याचे युवराज आदित्य वर्मा यांनी घेतले 'दगडूशेठ' चे दर्शन**

केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराचे विश्वस्त आणि त्रावणकोर राजघराण्याचे युवराज आदित्य वर्मा यांनी श्रीमंत दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेत महामंगल आरती केली. यावेळी त्यांनी श्रीं ना अभिषेक केला. वेदमूर्ती नटराज शास्त्री यांनी अभिषेकाचे पौरोहित्य केले. युवराज आदित्य वर्मा यांचा यशोचित सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह आणि यंदाच्या गणेशोत्सवात ट्रस्टतर्फे साकारण्यात आलेल्या श्री पद्मनाभ स्वामी मंदिर प्रतिकृतीचे भव्य छायाचित्र त्यांना देण्यात आले. ट्रस्टच्या सर्व उपक्रमांची माहितीही यावेळी त्यांनी घेतली. पारंपरिक ढोल ताशा आणि केरळी वाद्य चेंदा मेलमच्या सुरेल वाद्यवादनात त्यांचे स्वागत करण्यात आले.

**३४. श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टकडून पूरग्रस्तांसाठी १ कोटींचा निधी**

मानवसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगीकारून कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे 'मुख्यमंत्री सहायता निधी'साठी १ कोटी रुपयांच्या धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केला. सुवर्णयुग सहकारी बँकेकडून २५ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असणाऱ्या बळीराजाला हा मदतीचा हात देण्यात आला. ट्रस्टच्या माध्यमातून कोयना, लातूर भूकंप सारख्या आपत्तीच्या वेळी तसेच मा. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदत यांसह मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये वेळोवेळी मदत देत ट्रस्टने संवेदना दाखविली आहे.

**३५. श्री उमांगमलज जन्मोत्सवात बाप्पाला ११०० नारळांचा महानैवेद्य**

गाणपत्य संप्रदायात कार्तिक शुद्ध चतुर्थी, श्री उमांगमलज जन्मोत्सवात मोरयाला नारळ समर्पित करण्याला विशेष महत्व आहे. त्यामुळेच मंदिरात हा जन्मोत्सव सोहळा साजरा करीत श्रीं ना ११०० नारळांचा महानैवेद्य दाखविण्यात आला. अंतःकरणातील अहंकार आणि ममत्वाचे मळभ दूर झाल्यानंतर शुद्ध, स्वचब प्रशांत स्वरूपातील जे परमात्म दर्शन घडते, त्यांना म्हणतात उमांगमलज. नारळांची आरास व धार्मिक विधी यानिमित्ताने मंदिरामध्ये पार पडले. पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त, पहाटे गायिका

शेफाली कुलकर्णी – साकुरीकर यांचा स्वराभिषेक हा गायनाचा कार्यक्रम झाला. सकाळी ८ वाजता गणेश याग देखील पार पडला. देवी पार्वतीने अंगावरच्या मळापासून एक पुतळा बनवला. त्याला जिवंत केले. पुढे त्याचे आणि शंकरांचे युद्ध झाले. भगवान शंकरांनी त्या मुलाचे मस्तक उडविले. देवी पार्वतीच्या संतापाला शांत करण्यासाठी शेवटी त्या बालकाच्या धडावर भगवान श्री विष्णूंनी आणलेले गज मस्तक बसविण्यात आले. त्यांना श्री गजानन असे म्हटले आहे. ही श्री गणेश जन्माची कथा आपण नेहमी ऐकतो ती या अवताराची कथा आहे. या अवतारात भगवान श्री गणेशांचे नाव आहे उमांगमलज. उमा म्हणजे देवी पार्वती. तिच्या अंगावरील मळापासून ज म्हणजे जन्माला आलेला. असा याचा शब्दशः अर्थ. हा जशाला तसा लागू पडतच नाही. देवी पार्वतीच्या अंगावर पुतळा म्हणण्याइतका मळ असेल तरी कसा? या सर्व कथा आध्यात्माचे निरूपण करण्यासाठीच असतात. आपली बुद्धी हीच पार्वती देवी आहे. तिच्यावर चढलेला अहंकार आणि ममत्वाचा थर हाच मळ आहे. हा अहंकार आणि ममत्व दूर झाले की ज्या मोरयांची प्राप्ती होते त्यांना उमांगमलज असे म्हणतात.

**३६. दगडूशेठ' तर्फे साखरे महाराज मठात श्रीकृष्ण–तुळशी विवाह सोहळा साजरा**

रांगोळीच्या पायघड्या, शुभमंगल सावधानचे मंगल सूर अशा पारंपरिक वातावरणात मंडईतील साखरे महाराज मठामध्ये तुळशीविवाह सोहळा पार पडला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरापासून निघालेली मिरवणूक मंडईतील साखरे महाराज मठात येताच उपस्थितांनी राधे–कृष्ण, गोपाल कृष्ण चा जयघोष केला. चौका–चौकात मिरवणुकीचे स्वागत करत, श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. भगवान विष्णूला तुळशी खूप प्रिय आहेत, तुळस ही लक्ष्मीचे स्वरूप मानली जाते. तुळशी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. तुळशी विवाह म्हणजे तुळशी (पवित्र तुळस) वनस्पतीच्या रोपाचे शालिग्राम किंवा विष्णू किंवा त्यांचे अवतार श्रीकृष्ण याच्याशी विवाह, प्रबोधिनी एकादशीपासून करण्याची पूजोत्सव प्रथा आहे. त्यामुळे ट्रस्टतर्फे हा उत्सव दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो. दगडूशेठ गणपती मंदिरामध्ये सकाळी श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन झाल्यानंतर पारंपरिक पद्धतीने मिरवणुकीला प्रारंभ झाला. तुळशी वृंदावन आणि श्रीकृष्णाची मूर्ती घेऊन रथातून मिरवणूक काढण्यात आली. दरबार ब्रास बँड मिरवणुकीत वादन करत होते. रांगोळीच्या पायघड्यांनी मिरवणुकीचा संपूर्ण मार्ग सुशोभित करण्यात आला होता. समाधान चौक–रामेश्वर चौक–टिळक पुतळा मंडईमार्गेसाखरे महाराज मठात मिरवणुकीचा समारोप झाला. त्यानंतर विवाह समारंभ झाला. उपस्थित भाविकांनी श्रीकृष्ण–तुळशी चे दर्शन घेतले.

**३७. त्रिपुरी पौर्णिमेला ५२१ पदार्थांच्या महानैवेद्याचा अन्नकोट**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात लाडक्या गणरायासमोर अन्नकोट साकारत ५२१ पदार्थांचा महानैवेद्य दाखविण्यात आला. मिठाई, फराळाच्या तिखट–गोड पदार्थांपासून विविध प्रकारच्या फळांची करण्यात आलेली आकर्षक आरास आणि विविध रसास्वादाचे पदार्थ बाप्पाला अर्पण करण्यात आले. यानिमित्ताने तोरण आणि फुले, रांगोळ्यांनी मंदिराचा परिसर आकर्षक पद्धतीने सजविण्यात आला. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दगडूशेठ गणपती मंदिरात कळसापासून गाभाऱ्यापर्यंत सुमारे १ लाख २५ हजार दिव्यांनी संपूर्ण मंदिर सजविण्यात आले. पुणेकरांनी हे दृश्य डोळ्यामध्ये साठविण्यासोबतच मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद करण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

**३८. संकष्टी चतुर्थीला 'दगडूशेठ' गणपतीला पालेभाज्यांची आरास**

संकष्टी चतुर्थी निमित्त हरित संदेश देणारी अनोखी आरास मंदिरात साकारली. तब्बल २१ प्रकारच्या ताज्या व आकर्षक भाज्यांचा नैवेद्य बाप्पाला दाखविण्यात आला. स्वराभिषेकातून गायनसेवा, महाअभिषेक आणि गणेशयाग अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील मंदिरात करण्यात आले होते. यावेळी सकाळी डॉ. सुनील काळे उपस्थित होते. गायिका कृपा किरण नाईक व सहकाऱ्यांनी पहाटे स्वराभिषेक सादर केला. मेथी, कोथिंबीर, शेपू, करडई, चवळई, बीट, लाल माठ, लाल व पांढरा मुळा, अंबाडी, पुदिना, कांदापात, कडिपत्ता, चुका, चाकवत, लाल राजगिरा, गवती चहा अशा विविध भाज्या मांडण्यात आल्या होत्या. तब्बल २ हजार गड्ड्यांमधून ही आरास साकारलेली होती. मार्केट यार्डातील फळभाज्या आणि पालेभाज्यांचे अडतदार राजेंद्र सूर्यवंशी यांनी सजावट केली. यासाठी प्रकाश ढमढेरे, नितीन जामगे यांचे सहकार्य लाभले. तर सरपाले बंधू यांनी आरास तयार करण्यासाठी मदत केली. वर्षभर कष्ट करून शेतकरी तयार करीत असलेल्या पालेभाज्या बाप्पाच्या चरणी अर्पण झाल्याने 'शेतकरी सुखी राहो' अशी प्रार्थनाही यावेळी करण्यात आली.

**३९. 'दगडूशेठ' गणपती च्या दर्शनाला नूतन वर्षारंभी अलोट गर्दी**

मंगलमूर्ती मोरया... गणपती बाप्पा मोरया... च्या जयघोषात नूतन वर्षाचे स्वागत करीत श्री गणेशाच्या दर्शनासाठी भाविकांनी वर्षाच्या पहिल्या दिवशी पहाटेपासून गर्दी केली. पहाटे ३ वाजल्यापासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात श्रीं च्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. यात युवा पिढीची म्हणजेच जेन झीची संख्या लक्षणीय होती. नूतन वर्षारंभानिमित्त मंदिराला आकर्षक पुष्परचना करण्यात आली. सकाळपासून अभिषेक शृंगार, सुप्रभात आरती, नैवेद्यम आरती, दुपारी माध्यान्ह आरती, सायंकाळी महामंगल आरती आणि रात्री शेजाआरती करण्यात आली. यावेळी भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.नूतन वर्षारंभी जशी सजावट करण्यात आली होती, त्याचप्रमाणे गुरुवार निमित्त मंदिरात दैनंदिन अभिषेक, शिशु पूजन सेवा, वैयक्तिक गणेश याग झाले. मंदिरात जाऊन दर्शन घेणाऱ्यांपेक्षा रस्त्यावरून दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या जास्त होती.

**४०. गणेशजन्मानिमित्त 'दगडूशेठ' ला विराज जोशीचा स्वराभिषेक**

यंदाचा गणेश जन्म सोहळा माघ शुद्ध चतुर्थी म्हणजेच गुरुवार, दिनांक २२ जानेवारी रोजी बुधवार पेठेतील दगडूशेठ गणपती मंदिरात आयोजित करण्यात आला आहे. विनायक अवतार असलेला हा गणेशजन्म सोहळ्याचे औचित्य साधत बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी पहाटे मंदिरात भारतरत्न पं.भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांनी श्रीं चरणी स्वराभिषेकातून सेवा अर्पण केली.

**४१. 'दगडूशेठ' गणपती मंदिरात गणेश जन्म सोहळा**

जय गणेश, जय गणेश... श्रीमंत दगडूशेठ गणपती की जय... चा जयघोष आणि वक्रतुंडाचे रूप आगळे, मोठाले कान बारीक डोळे, मूषकाच्या पाठी बसून खेळे, जा बाळा जो जो रे जो... असे पाळण्याचे स्वर श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात निनादले. लाडक्या गणपती बाप्पाचा माघ शुध्द चतुर्थीला जन्म सोहळा साजरा होताना मंदिरात पाळण्यावर पुष्पवृष्टी करीत असताना गणेशभक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला. पारंपरिक वेशात सहभागी महिला आणि शेकडो भक्तांच्या उपस्थितीत सुवर्णपाळण्यात यंदाही गणेश जन्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा श्री गणेशाचा विनायक अवतार आहे. प्रथमेश कापरे यांनी सपत्नीक गणेश जन्माची पूजा केली. अर्चना भालेराव यांसह उपस्थित महिलांनी गणेशजन्माचा पाळणा आणि गणेश गीते म्हटली. शुभचिन्हे आणि मोदक यांची फुलांमध्ये मंदिरावर आकर्षक आरास करण्यात आली होती. गणेशजन्म सोहळ्यानिमित्त बुधवारी पहाटे मंदिरात भारतरत्न पं.भीमसेन जोशी यांचे नातू

विराज जोशी यांनी श्रीं चरणी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण केली. तर गुरुवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक झाला. याशिवाय गणेश सूक्त अभिषेक देखील मंदिरात सुरु होता. तसेच सकाळी ६ ते १० आणि दुपारी १.३० ते सायंकाळी ५ या वेळेत गणेश याग संपन्न झाला. मुख्य गणेशजन्म सोहळ्याला दुपारी १२ वाजता सुरुवात झाली. त्यानंतर श्री गणेशाची मंगल आरती देखील झाली. सायंकाळी नगरप्रदक्षिणा मिरवणूक दगडूशेठ गणपती मंदिरापासून थाटात निघाली. वाजता श्रीगणेशाची मंगलआरती आणि रात्री १० ते पहाटे ३ वाजेपर्यंत श्री गणेश जागर आयोजित करण्यात आला होता. गणेशजन्माच्या दिवशी पहाटे ३ वाजल्यापासून मंदिर भाविकांसाठी खुले होते.

**४२. स्वदेशी शस्त्रास्त्र प्रदर्शनातून पुणेकरांनी प्रथमच अनुभवले भारतीय सैन्याचे सामर्थ्य**

स्नायपर एमके १, एयर डिफेन्स गन, अँटी मटेरियल रायफल (विध्वंसक), एके ४७ रायफल, एमएमजी गन, टियर गॅस गन यांसह ड्रोन, आर्टिलरी अम्युनिशन, एरियल बॉम्ब अशा देशाच्या संरक्षण सज्जतेला बळकटी देणाऱ्या अभेद्य शस्त्रांना पाहण्याची संधी पुणेकरांना मिळाली. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित प्रदर्शनात भारतीय पायदळ, नौदल, हवाई दलासाठी लागणारी शस्त्रास्त्रे, दारुगोळा यांसह विविध प्रकारची युद्ध सज्जतेसाठी आवश्यक असलेल्या साधनांची मॉडेल्स देखील ठेवण्यात आली होती. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतीय बनावटीच्या शस्त्रांचे प्रदर्शन बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरासमोर जय गणेश प्रांगण येथे आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झाले. लष्करातील माजी अधिकारी, स्थानिक नगरसेवक आदी उपस्थित होते. सैन्यदलातील जवान या प्रदर्शनाच्या नियोजनात सहभागी असून पुणेकरांनी प्रत्येक शस्त्राविषयी माहिती देखील उपस्थिति अधिकाऱ्यांनी दिली. ग्रेनेड, लढाऊ विमानातील बॉम्ब, रॉकेटचे विविध प्रकार, तोफांकरीता लागणारा दारुगोळा, विविध प्रकारचे ड्रोन, मल्टी बॅरेल लॉन्च सिस्टिम, बुलेटसब, हँड ग्रेनेड, अँटि सम्बरिन रॉकेट, एरियल बॉम्ब यांसह विविध प्रकारची शस्त्रास्त्रे पाहण्याची संधी मिळाली. आत्मनिर्भर, बलशाली व विश्वगुरू भारत साकारण्याकरिता संपूर्ण देशात शस्त्रास्त्रे पुरविण्यासाठी पुण्यातील खडकी येथील दारूगोळा तयार करणाऱ्या अॅम्युनिशन्स इंडिया लिमिटेडच्या (अॅम्युनशिन फॅक्टरीच्या) सहकार्याने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते

**४३. 'जय गणेश' विद्यार्थी पालकत्व योजना स्नेहसंमेलन, पारितोषिक वितरण**

जय गणेश ज्ञानवर्धन अभियानांतर्गत जय गणेश विद्यार्थी पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचे आयोजन टिळक स्मारक मंदिर येथे करण्यात आले. कार्यक्रमात विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात जय गणेश विद्यार्थी पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक, ऐतिहासिक आणि देशभक्तीपर गीतांवर सादर केलेल्या कलाकृतींना भरभरुन दाद मिळाली. मुंबईत साकीनाका येथे सध्या पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेली पूजा राऊत ही ज्ञानवर्धन अभियातील विद्यार्थिनी असून ती यावेळी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होती. त्यांनी त्यांचे अनुभव विद्यार्थांना सांगितले. जय गणेश ज्ञानवर्धन अभियान अंतर्गत सन २०१० साली सुरू झालेल्या या उपक्रमाने मराठी शाळांमधील शेकडो गुणवंत विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवले आह. मराठी शाळांमधून ५०० पेक्षा अधिक गरजू व हुशार विद्यार्थ्यांची निवड करून त्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी ट्रस्टने स्वीकारली आहे. या योजनेतून शिक्षण पूर्ण करून पुढे गेलेले अनेक विद्यार्थी आज तहसीलदार, पीएसआय, पीएचडीधारक, अभियंते तसेच एमएससी, बीएससी, एमए, बीकॉम आणि बीए अशा विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असून हीच या योजनेच्या यशाची खरी पावती आहे, असे त्यांनी सांगितले.

**४४. श्रीस्वामी समर्थांचा सूर्यमणी व पादुकादर्शन**

अक्कलकोटच्या राजघराण्याने याचे भक्तीपूर्वक श्रद्धेने जतन केलेआहे या पादुका आणि सूर्यमणी श्री अक्कलकोट संस्थान छत्री ट्रस्टकडे आहे. श्री स्वामींच्या संकेताने व प्रेरणेने पवित्र सूर्यमणी व पादुका सामान्य भक्तांसाठी खुल्या करण्याचा निर्णय अक्कलकोटचे विद्यमान राजे श्रीमंत मालोजीराजे संयुक्त राजे भोसले यांनी घेतला. त्यानुसार पवित्रसूर्य मणी आणि पावन पादुका भाविकांना दर्शनासाठी १५० वर्षानंतर प्रथमच बाहेर काढल्या आहेत. या दर्शन सोहळ्याची सुरूवात पुण्यनगरीपासून करावी आणि पुण्यनगरीतील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाच्या दर्शनाने करावी म्हणून ते पादुका आणि सूर्यमणी घेऊन आले होते. यावेळी मंदिरात पादुकांची आणि सूर्यमणीची यथोचित विधिवत पूजा करण्यात आली. श्रीमंत मालोजीराजे आणि त्यांचे सहकारी यावेळेस उपस्थित होते पूजनानंतर पादुका आणि सूर्यमणी श्री मंगलमूर्तीच्या सानिध्यात काही काळ ठेवण्यात आला होता. भाविकांनी दर्शन घेतल्यानंतर पुढे श्री दत्त मंदिराकडे त्यांनी प्रस्थान ठेवले. त्यानंतर पुण्यातील सर्वात जुन्या वीरकरशेठ यांच्या स्वामी मठात मणी व पादुका नेण्यात आल्या होत्या. त्यानंतर गुढी पाडव्यापर्यंत म्हणजे नवसंवत्सरापर्यंत तीन दिवस पवित्र सूर्यमणी व पादुका एक ठिकाणी दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या.

**४५. महिलांना आत्मनिर्भरतेसाठी कौशल्य प्रशिक्षण**

जय गणेश ज्ञानवर्धन अभियान अंतर्गत मेकांती फॅशन यांच्या सहकार्याने आरी वर्क, फॅब्रिक पेंटिंग व ड्रेस डिझाइन या कौशल्याधारित कोर्सेस घेण्यात आले होते. हे कोर्सेस पूर्ण करणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमधील कला-कौशल्यांना चालना देणे आणि गरजू महिलांना त्यांच्या कलेतून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संस्कार वर्ग प्रमुख विजय भालेराव, मेकांती फॅशन डिझाईनच्या संचालिका अंजली पवार, नेहा गुरव उपस्थित होत्या. यावेळी प्रशस्तीपत्र देवून विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

**४६. महार बटालियनच्या ३५ वीर नारींचा सन्मान सोहळा**

महार रेजिमेंट१३ व्या बटालियनच्या हीरक महोत्सवा निमित्त हुतात्मा सैनिकांच्या वीरनारींचा सन्मान सोहळा स.प.महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी मेजर जनरल बिनॉयपूनेन (निवृत्त), १३ महार रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर कर्नल संजीत फुगत, ज्येष्ठ संपादक अरुण खोरे, सुभेदारमेजर (ऑर्डीनरी कॅप्टन) बापू पोळके, लेफ्टनंट कर्नल नरेंद्र पाठक उपस्थित होते. बटालियन मधील हुतात्मा सैनिकांच्या ३५ वीरपत्नी आणि वीर मातांचा सन्मान यावेळी करण्यात आला. प्रत्येकी २५ हजार रुपये, साडी चोळी, सन्मानचिन्ह असे सन्मानाचे स्वरुप होते. भारतीय लष्करामध्ये महार रेजिमेंटचे फार मोठे योगदान आहे. सन१९४१ साली ब्रिटिश सरकारने संरक्षण सल्लागार परिषद स्थापन केली. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्याचे भाग होते. त्यांनी या विषयात अनेक चांगले निर्णय घेतले, हे आपल्याला आजही महार रेजिमेंट १३ व्या बटालियनच्या हीरक

महोत्सवाच्या वर्षी विसरता येणार नाही. मानवता विकसित झालीतर युद्धाची गरज पडणार नाही. केवळ वीर नारींचा सन्मान नाहीतर हा संदेश आहे की ज्यांच्या पतीने बलिदान दिले, त्या नारी एकट्या नाहीत तर समाज त्यांच्या पाठीशी आहे. समाज आणि सैन्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे आज समाज त्यांच्या पाठीशी उभा आहे, हे महत्त्वाचे आहे. सन २०११ पासून ट्रस्ट तर्फे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सुरुवातीला ६ मराठा बटालियनमधील सैनिकांच्या ६० वीरनारींना सन्माननित करण्यात आले होते. त्यानंतर सन २०१७ मध्ये ट्रस्टच्या १२५ व्यावर्षी १२५ वीरनारींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. तसेच भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात ७५ व्यावर्षी ७५ वीरनारींचा सन्मान करण्यात आले. प्रत्येक कार्यक्रमात वीरनारींना प्रत्येकी २५ हजार रुपये, साडी चोळी, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. भारतीय सैनिकांनी आणि त्यांच्या वीरनारींनी देशाप्रती दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात येतो.

**४७. शिवजयंती उत्सव पाच दिवस विविध कार्यक्रम**

शिवव्याख्यान, सांस्कृतिक कार्यकम यांसह आरोग्य शिबीराचे आयोजन सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे शिवजयंती निमित्त पाच दिवसांचा शिवमहोत्सव आयोजित करण्यात आला होता. १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरासमोरील जय गणेश प्रांगणात झाले. यामध्ये शिवव्याख्यान, मृत्युंजय हे महानाट्य, दिव्यांगांसाठी आरोग्य शिबीर अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता दिव्यांगांकरिता मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मोफत व्हिलचेअर, ट्रायसिकल, स्वयंचलित हात वाटप करण्यात आले. संध्याकाळी लेखक केतन पुरी यांचे छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब याविषयावर व्याख्यान झाले. सोमवारी (दि.१६) शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांचे छत्रपती शिवाजी महाराज आणि आजचा समाज या विषयावर व्याख्यान झाले. (दि.१७) इतिहास अभ्यासक, लेखक व शिवव्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे शिवव्याख्यान झाले. मंगळवार दि १८ या दिवशी शिवशंभू प्रतिष्ठानने शिवकालीन युद्धकला – मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यानंतर कीर्तनकार, कथाकार बाजीराव महाराज बांगर यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील समज व गैरसमज या विषयावर व्याख्यान झाले. शिवजयंतीच्या दिवशी दि. १९ पारंपरिक वाद्यवादन झाले. त्यानंतल शिवसाई प्रतिष्ठान ट्रस्ट निर्मिती गणेश लोणारे व सहकारी प्रस्तुत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील मृत्युंजय हे धगधगते महानाट्य सादर करण्यात आले.

**४८. २ हजार किलो द्राक्षांचा महानैवेद्य**

काळी, हिरवी आणि लाल टपोऱ्या द्राक्षांनी गणपती मंदिरातील गाभारा व सभामंडप सजवून द्राक्ष महोत्सव करण्यात आला. या महोत्सवात नाशिक येथील सह्याद्री फार्म कंपनीच्या शेतकऱ्यांनी पिकवलेल्या निर्यातक्षम व रसायनविरहित २ हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली. कंपनीचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे यांसह सह्याद्री फार्मचे पदाधिकारी देखील उपस्थित होते. दगडूशेठ गणपती मंदिराच्या गाभाऱ्यात संपूर्ण सभा मंडपात केलेली ही आकर्षक आरास पाहण्याकरता भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. द्राक्षाच्या हंगामात अशा पद्धतीची आरास मंदिरात गेल्या काही वर्षांपासून केली जात आहे. आज सह्याद्री फार्म ला २२,००० शेतकरी जोडले गेले आहेत. भारतातील सर्वात मोठी द्राक्ष निर्यात करणारी कंपनी म्हणून म्हणून सह्याद्रीची ओळख आहे. द्राक्षाच्या नवीन पेटंटेड वाणांचे उत्पादन सह्याद्री फार्म्स करीत आहे. मागील पाच वर्षांपासून सातत्याने सुरू असलेला हा उपक्रम आता श्रद्धा, कृषी आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम ठरला आहे. ही ताजी द्राक्षे प्रसाद म्हणून भाविकांना वाटली जातात. तसेच परिसरातील अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि सेवाभावी संस्थांनाही हा प्रसाद दिला जातो. त्यामुळे हा उपक्रम केवळ धार्मिक न राहता समाजाशी जोडलेला लोकाभिमुख उपक्रम ठरतो. प्राचीन भारतीय आयुर्वेदात द्राक्षांचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व मोठे आहे. द्राक्षांमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि क जीवनसत्त्वाचे चांगले स्त्रोत आहेत. द्राक्षे हृदयविकाराचा धोका कमी करतात. त्याच्या सेवनाने मेंदूवर वयाचा कमी परिणाम होतो. द्राक्षांमध्ये भरपूर फायबर असते, जे वजन कमी करण्यास मदत करते. हिरवी द्राक्षे खाल्ल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्या पासून आराम मिळतो. द्राक्षांमध्ये असलेल्या फायबरमुळे आतड्याची हालचाल सुलभ होते. तसेच शरिरातील रक्ताची कमतरता दूर होते. हे हिमोग्लोबिन पातळी वाढवते.

**४९. 'दगडूशेठ' गणपतीला ५१ लाख सुवासिक पुष्पांचे अर्घ्य, वासतिक उटी**

सुवासिक विविधरंगी फुलांनी सजलेले श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर आणि लाडक्या गणरायाचे रुप मोगरा महोत्सवाच्या निमित्ताने गणेशभक्तांनी अनुभविले. मोगऱ्याच्या फुलांसह लिली, झेंडू, जास्वंद, गुलाब, चाफा यासारख्या तब्बल ५१ लाख फुलांनी गाभाऱ्यासह सभामंडपात आकर्षक सजावट करण्यात आली. गणरायाला फुलांचे जणू अर्घ्य दिल्याचा भास यावेळी होत होता. मंदिरात वासंतिक उटी, मोगरा महोत्सव आयोजित करण्यात आला. यावेळी संत साहित्यिक डॉ. आरती दातार यांच्या हस्ते आरती करण्यात आली. गणरायाला शुंडाभूषण, मुकुट आणि विविध फुलांची आभूषणे देखील परिधान करण्यात आली होती. दोन दिवसांपासून पुष्पसजावटीची तयारी कारागिर करीत होते. यंदाच्या पुष्पसजावटीमध्ये मोगरा, गुलाब, लिली, झेंडू, शेवंती, गुलछडी, चाफा, गुलाब पाकळी तसेच कमळ, जाई-जुई, जास्वंद यांसह अनेक प्रकारची फुले वापरण्यात आली होती. गणरायाच्या चांदीच्या मूर्तीला उटीचे लेपन करण्यात आले. तसेच मोगरा महोत्सवासह वासंतिक उटीचे भजन अखिल भारतीय वारकरी मंडळातर्फे करण्यात आले.

**५०. कानाची तपासणी करून श्रवणयंत्र वाटप**

ॲलिम्को कंपनीच्या संयुक्त विद्यमाने सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील तब्बल ४०० ज्येष्ठांना श्रवणयंत्र मोल्डचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध शहरांतून तसेच ग्रामीण भागातून हे ज्येष्ठ नागरिक शिबीरासाठी पुण्यात आले होत. केवळ पुण्यातच नाही,

तर इतरही शहरातून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावरुनच समाजातील मोठी व्यथा समोर येत असल्याचे दिसून आले आहे. कार्यक्रमात ४०० रुग्णांना यंत्र देण्यात आले.

**५१. अक्षयतृतीयेला ११ हजार आंब्यांचा महाभोग शारदेश मंगलम् विवाह सोहळा संपन्न**

अक्षयतृतीयेनिमित्त दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांचा महाभोग दाखविण्यात आला. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्यतृतीयेच्या मंगलदिनी दरवर्षी हा महानैवेद्य बाप्पाला दाखवला जातो. सनई व मंगलाष्टकांचे स्वर लग्नसोहळ्यासाठी सजलेला मंडप आणि शुभमंगल सावधान च्या मंगल स्वरांत मंदिरात श्री गणेश आणि देवी शारदा यांचा विवाह सोहळा संपन्न झाला. याच दिवशी गणरायाचे दर्शन व्हावे, याकरिता भाविकांनी पहाटेपासून रांगा लावल्या होत्या. मंदिरात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये गणपती बाप्पांना ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. पुण्यातील आंब्यांचे सुप्रसिद्ध व्यापारी देसाई आंबेवालेचे संचालक मंदार देसाई कुटुंबियांच्यावतीने हा नैवेद्य देण्यात आला. गाणपत्य सांप्रदायातील परंपरेनुसार विवाह सोहळ्याचे आयोजन देखील केले जाते. दुपारी १२ वाजून ४७ मिनिटांनी भगवान श्री गणेश आणि देवी शारदा यांचा विवाह म्हणजेच शारदेश मंगलमब सोहळा थाटात पार पडला. संकेत मते यांसह तुषार रायकर यांनी सपत्नीक पूजन केले. रात्री भारतीय वारकरी महिला मंडळाच्यावतीने उटीचे भजन देखील आयोजित करण्यात आले होते. श्री गणेशांच्या दोन शक्तींना गाणपत्य संप्रदायात देवी सिद्धी आणि देवी बुद्धी या नावाने आळिवले जाते. भगवंताच्या क्रियाशक्तीला देवी सिद्धी असे म्हणतात, तर भगवंताच्या ज्ञानशक्तीला देवी बुद्धी असे म्हणतात. अश्विन महिन्यामध्ये शरद ऋतू असल्याने या काळात प्रगट झालेल्या देवी बुद्धीला शारदा असे म्हणतात. शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे तिची उज्ज्वलता, आल्हाददायकता असल्याने तिला शारदा असे म्हणतात. शरद ऋतू मधील प्रसन्नतेप्रमाणे देवी बुद्धीने प्रसन्नता प्राप्त होत असल्याने तिला शारदा असे म्हणतात. अशा देवी शारदेचा भगवान श्री गणेशांसोबतच्या महामीलनाचा सोहळा म्हणजे श्री शारदेश मंगलम आहे. मंदिरात रविवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक झाला. त्यानंतर पहाटे ४ वाजता गायिका विदुषी मंजुषा पाटील यांनी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण केली. सकाळी ८ वाजता गणेशयाग देखील झाला. आंब्याचा प्रसाद ससूनमधील रुग्णांना, श्रीवत्समधील मुलांना तसेच वृद्धाश्रम व दिव्यांग मुलांच्या संस्था व मंदिरात भाविकांना देण्यात आला.

**५२. मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण**

ट्रस्ट तर्फे साकारलेल्या मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण झाले. सारसबागेजवळील बाबुराव सणस मैदानासमोर असलेल्या हिराबाग कोठी परिसरात हे केंद्र उभारण्यात आले आहे. यामध्ये रुग्णांना विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार आहेत. या केंद्राचे उद्घाटन राज्याच्या आरोग्य सेवा विभागाचे संचालक डॉ. विजय कंदेवाढ यांच्या हस्ते झाले. यावेळी पुणे मनपा आरोग्य प्रमुख डॉ.नीना बोराडे, आयएमए चे डॉ. वीरेंद्र ओस्तवाल, डॉ. अमरीश दरक, डॉ. संदेश पटवर्धन वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी हे येथील व्यवस्था पहात आहेत. शासकीय व धर्मादाय यंत्रणांनी यामध्ये ट्रस्टला मोठे सहकार्य केले आहे. पुणे शहर आणि आपले महाराष्ट्र राज्य निरोगी राहावे, हा यामागील उद्देश आहे. सर्वाना आरोग्यसेवा तत्परतेने मिळतील असा प्रयत्न यामाध्यमातून केला जाणार आहे. मोफत आरोग्य सेवा केंद्र हे सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ५ पर्यंत खुले राहणार असून येथे विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार आहेत. यामध्ये विविध रक्त तपासणी, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, जनरल ओपीडी, हृदय ईसीजी, दंत तपासणी, दात काढणे, लहान बालकांकरिता लसीकरण सुविधा, कृत्रिम हात व पाय वाटप नोंदणी, श्रवण तपासणी होणार आहे. याकरिता तज्ज्ञ डॉक्टरांची टीम येथे कार्यरत असणार आहे. अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक ९८८१५१६५१७/ ९९२३५१६५१७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**५३. 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा**

जगभरातील कोट्यवधी गणेश भक्तांचे आराध्य दैवत आणि महाराष्ट्राचे वैभव असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला महाराष्ट्र शासनाने 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा बहाल केला आहे. या निर्णयामुळे पुण्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. याबाबत ट्रस्टचे सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांनी अथक प्रयत्न करून पाठपुरावा केला होता. मंदिरात दररोज ५० ते ५५ हजार भाविक, दर संकष्टी चतुर्थीला २ ते ३ लाख भाविक आणि गणेशोत्सवात दीड कोटी भाविक दर्शनासाठी येतात. तर, दर महिन्याला जगभरातून तब्बल दोन हजार पर्यटक विविध देशातून मंदिराला भेट देतात. मंदिराला 'अ' वर्ग दर्जा मिळाल्यामुळे आसपासच्या परिसराचा विकास आणि भाविकांच्या सोयी– सुविधांसाठी सरकारकडून विशेष निधी उपलब्ध होईल. याशिवाय व्हीलचेअर रॅम्प, उत्तम सुरक्षा यंत्रणा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा भाविकांसाठीच्या सर्व सुविधा अधिक बळकट करण्यात येत आहेत. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता जागतिक स्तरावर पुण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परदेशी पर्यटकांची संख्या वाढण्यास आणखी मदत होणार आहे. तसेच २० ते २५ हजार रोजगार निर्मिती या माध्यमातून पुढील पाच वर्षात होईल.

**५४. मराठा लाइट इन्फंट्रीच्या १६ भैरव बटालियनला दगडूशेठ गणपतीची पंचधातूची मूर्ती सुपुर्द**

भारतीय लष्करातील मराठा लाइट इन्फंट्रीतील सैनिकांची दगडूशेठ गणपतीशी निगडित असलेली श्रद्धा आणि परंपरा जपत, नव्याने स्थापन झालेल्या तसेच संवेदनशील भागात किंवा घटनांच्या वेळी कार्यरत राहण्यासाठी विशेष प्रशिक्षित असलेली १६ भैरव बटालियनला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची पंचधातूची मूर्ती सन्मानपूर्वक सुपुर्द करण्यात आली. बटालियनच्या मागे गणपती बाप्पाचा आशीर्वाद आणि शक्ती कायम रहावी, या भावनेतून ही मूर्ती देण्यात आली आहे. ट्रस्टतर्फे मंदिरात ही मूर्ती सुपुर्द करण्यात आली. मराठा लाइट इन्फंट्रीला गणपती मूर्ती देण्याची परंपरा पूर्वीपासूनच सुरू असून, त्याच परंपरेचा भाग म्हणून १६ भैरव बटालियनने दगडूशेठ गणपतीची मूर्ती देण्याची विनंती लेफ्टनंट कर्नल रणजीत सिंह सिनसिनवार यांनी सैनिकांच्या वतीने केली होती. त्यानुसार विधिवत पूजा करून सुमारे दीड फुट उंचीची पंचधातूची मूर्ती बटालियनच्या प्रतिनिधींना नुकतीच प्रदान करण्यात आली. सदर

बटालियन, मंदिराची प्रारंभिक स्थापना बेळगाव येथे करणार आहे. त्यानंतर बटालियनच्या ऑपरेशनल तैनातीप्रमाणे या मंदिराचे स्थलांतर अरुणाचल प्रदेशातील सीमावर्ती भागात करण्यात येणार आहे. बाप्पाचा आशीर्वाद या बटालियनच्या पाठीशी कायम राहावा, या भावनेने १६ भैरव बटालियनसाठी ही मूर्ती सुपुर्द करण्यात आली आहे. देशसेवेत असलेल्या आपल्या जवानांना यामुळे मानसिक आणि आध्यात्मिक बळ मिळेल. आपल्या संस्कृतीमध्ये श्री काळभैरव आणि गणेश मंदिरात नग्नभैरव ही देवता रक्षणकर्ता म्हणून सज्ज असते. त्याचप्रमाणे ही बटालियन देशासाठी ऑपरेशन सिंदूर सह विविध महत्त्वाच्या घटनांमध्ये संरक्षण सज्जतेसाठी तयार करण्यात आली आहे. या बटालियनला देखील दगडूशेठ बाप्पा आशीर्वाद बळ देतील, असा विश्वास आहे.

**५५. अंगारकीनिमित्त 'दाक्षिणात्य' रचनेतील पुष्प आरास, फुलांमध्ये विविध देवतांच्या प्रतिमा**

अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला 'दाक्षिणात्य' पद्धतीची पुष्पआरास करण्यात आली. मंदिराच्या पायथ्यापासून ते कळसापर्यंत विविधरंगी फुलांनी मंदिर सजले. कळसावरील फुलांमध्ये विविध देवतांच्या प्रतिमा देखील साकारण्यात आल्या. चतुर्थीनिमित्त भाविकांनी पहाटेपासून गणरायाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक पार पडला. त्यानंतर सकाळच्या व दुपारच्या सत्रात गणेशयागाचे देखील आयोजन करण्यात आले होते. मंदिराच्या पुढच्या बाजूला फुलांमध्ये गजराजाच्या प्रतिमा साकारण्यात आल्या आहेत. तसेच पुष्प सजावटीकरिता यंदा देशी फुलांचा वापर करण्यात आला. यामध्ये झेंडू, शेवंती या फुलांचा प्रामुख्याने समावेश होता.

**५६. श्री गणेश गीतेतील 'भक्तियोगा'वर प्रवचनमाला**

भगवंताच्या भक्तिचे नेमके स्वरूप काय? भगवान कशाला भक्ती म्हणतात? याचे सविस्तर विश्लेषण मांडण्याकरिता आणि अधिकमासाच्या पावन पर्वातवर भगवान श्री गणेशांच्या भक्तीचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तीयोग गणशभक्तांसमोर मांडण्याकरिता प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले होते. यवतमाळ वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी श्री गणेश गीतेतील भक्तीयोगावर निरुपण केले. श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात दि. १७ ते २३ मे २०२६ दररोज सायंकाळी ६.३० ते ८ यावेळेत ही प्रवचनमाला झाली. भगवान गणेशांच्या सगुण साकार स्वरुप आणि विविध अवतारांच्या विस्मयकारी लीलांची गाथा म्हणजे श्री गणेश पुराण आहे. पुराणातील विविध कथांच्या आधारे, त्यातील कथनीय मूल्यांच्या आधारे, आपल्या जीवनाला सुंदर करण्याचा पुराण कथा श्रवण करणे हा राजमार्ग आहे. याद्वारे श्री गणेश नामाचा अद्वितीय महिमा, श्री गणेश गीतेतील कर्मयोग गणेशभक्तांसमोर मागील वर्षी प्रवचनमालांमध्ये उलगडण्यात आला होता. भगवान श्री गणेशांनी द्वापार युगातील श्रीगजानन अवतारामध्ये, माहिष्मती नगरीचे सम्राट महाराज वरेण्य यांना केलेला दिव्य उपदेश म्हणजे गणेश गीता. श्री गणेश पुराणाच्या क्रीडा खंडामध्ये हा उपदेश ग्रथित करण्यात आलेला आहे. भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारच्या गीता प्रचलित आहेत. गीता शब्दाचा अर्थच गायन करण्याची किंवा केलेली गोष्ट. माणूस गायन त्याच वेळी करू शकतो ज्यावेळी तो अत्यंत प्रसन्न, आनंदी अवस्थेत असतो. वेगळ्या शब्दात अशी अवस्था कायम टिकवण्याची भारतीय पद्धती आहे गीता. भक्तीयोगाच्या संदर्भाने भक्ती करायची म्हणजे नेमके काय ? आपण करतो ती भक्ती योग्य होत आहे का? आणि त्यामध्ये प्रगती होत आहे का? भक्तीचे नेमके फळ काय? या सर्व विषयांचे सविस्तर स्पष्टीकरण स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी केले.

**५७. अधिक मासा निमित्त 'शुक्ल यजुर्वेद घन पारायण'**

गणेश नामावली हवन, गणेश पुराण हवन यांसह सर्व मराठी महिन्यातील चतुर्थीव्रत कथा आणि धुंडीविनायक मास म्हणजेच अधिक मास कथा हवन 'दगडूशेठ' गणपती मंदिरात करण्यात आले. अधिक मास अर्थात धुंडीविनायक मासाच्या निमित्ताने मंदिरात 'शुक्ल यजुर्वेद घन पारायण' संपन्न झाले. वेदमूर्ती मिलिंद राहूरकर गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली दररोज सकाळी ९ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते सायं. ७ दरम्यान मंदिरात पारायण व हवन करण्यात आले. गाणपत्य संप्रदायामध्ये ज्योतिष शास्त्राशी संबंधित भगवान गणेशांचा अवतार म्हणजे श्री ढुंढिराज अवतार. महाराजा दिवोदास नामक राजाच्या उद्धारासाठी झालेला आणि भगवान श्री शंकरांच्या द्वारे पूजन संपन्न झालेला हा दिव्य अवतार. आजही काशी क्षेत्रामध्ये भगवान श्री विश्वनाथ यांच्या मंदिरासमोर त्यांनी पूजन केलेले भगवान ढुंढिराज विद्यमान आहेत. विश्वनाथाच्या दर्शनाच्या आरंभी त्यांच्या दर्शनाची, वंदनाची परंपरा आहे. त्यांच्या उपासनेचे विशेष महत्व असल्याने या महिन्याला गाणपत्य संप्रदायात ढुंढिराज मास म्हणतात. या काळात श्री गणेश विग्रहाची पूजा, श्री गणेशाना दुर्वार्चन, गणेश ग्रंथाचे पारायण, गणेश मंत्र जप याला विशेष महत्व आहे. त्यामुळे मंदिरात 'चतुर्वेद स्वाहाकार' आणि त्यानंतर 'शुक्ल यजुर्वेद घन पारायण' आयोजित करण्यात आले होते.

**५८. 'दगडूशेठ' गणपती यंदा गणेशोत्सवात वृंदावनमधील प्रेम मंदिरात होणार विराजमान**

सणस मैदानासमोरील हिराबाग कोठी येथील ट्रस्टच्या सजावट विभागात सजावटीचा शुभारंभ सोहळा यंदाचे कलादिग्दर्शक नितेश कुमार यांच्या हस्ते पार पडला.

प्रेम मंदिर मनमोहक पांढऱ्या संगमरवरी वास्तुकलेसाठी व उत्कृष्ट कोरीव कामासाठी प्रसिद्ध आहे. याशिवाय भव्य स्तंभ, प्रकाशमान घुमट आणि कृष्णलीलांचे दर्शन यांसाठी सुपरिचित असलेल्या या मंदिराची प्रतिकृती यंदा गणेशभक्तांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. नानाविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या मंदिराची प्रतिकृती सुमारे १०० फूट इतकी असेल. जिथे भक्ती प्रेम बनते आणि प्रेम देवत्व बनते या संकल्पनेवर आधारित ही भव्य प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. प्रतिकृतीच्या रचनेत संगमरवरी वास्तुकलेपासून प्रेरित भव्य दर्शन भाग असणार आहे. उत्तर भारतीय मंदिराच्या पारंपरिक रचनेचे प्रतिबिंब दर्शवणारी कलाकुसर केलेले स्तंभ आणि घुमट, रासलीला, गोवर्धन लीला, झुला यांसारख्या कृष्णलीला दर्शविणारे शिल्पपट देखील असणार आहेत. शोभिवंत फुलांची सजावट, पवित्र शुभचिन्हे आणि आकर्षक विद्युतरोषणाईमुळे सायंकाळनंतर हे मंदिर उजळून निघणार आहे.

भौतिकवाद आणि विभाजनाकडे वेगाने वाटचाल करणाऱ्या जगात प्रेम, भक्ती, सलोखा आणि श्रद्धा या मानवतेला एकत्र बांधणाऱ्या शक्तींचा मिलाफ प्रतिकृतीद्वारे मांडण्याचा प्रयत्न असणार आहे. प्रारंभी बुधवार चौकामध्ये भव्य कमान साकारण्यात येणार असून त्यावर आकर्षक नक्षीकाम पहायला मिळेल. मुख्य प्रतिकृतीच्या दोन्ही बाजूंना असलेल्या रनिंग मांडवावर कृष्णलीलेतील विविध प्रसंग साकारण्यात येणार आहेत. मंदिराच्या वर दर्शनी भागात राधा-कृष्णाची भव्य मूर्ती देखील असणार आहे. प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये अनेक भव्य खांब असून विविध मूर्ती देखील असणार आहेत. गाभारा व मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रींचे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक नितेश कुमार आणि ग्लिटरी इव्हेंट्स प्रा. लि. यांनी मंदिराच्या प्रतिकृतीचे काम केले आहे.

**५९. ६०० ज्येष्ठांना मोफत श्रवणयंत्र**

फडके हॉल येथे झालेल्या शिबीरात महाराष्ट्रातील तब्बल ६०० ज्येष्ठांना श्रवणयंत्र मोल्ड चे वाटप करण्यात आले. जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत हा उपक्रम सातत्याने सुरु असून महाराष्ट्राच्या विविध शहरांतून तसेच ग्रामीण भागातून हे ज्येष्ठ नागरिक शिबीरासाठी पुण्यात आले होते. पिनॅकल इंडस्ट्रीज, भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती आणि भारतीय कृत्रिम अंग निर्वाण निगम (ॲलिम्को) यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

**६०. १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम कामगिरी**

जय गणेश पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी - १२ वी च्या परीक्षेत उत्तम कामगिरी केली. योजनेतील ११ विद्यार्थ्यांनी दहावी आणि २३ विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन केले आहे. ट्रस्टने शैक्षणिक साहित्यासह इतरही गोष्टींच्या माध्यमातून दिलेल्या मदतीमुळे आणि गणरायाच्या आशीर्वादामुळे हे शक्य झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. योजनेतील अनेक विद्यार्थ्यांची आई ही घरकाम करते, कोणाचे वडील पेंटिंग करतात, कोण कारखान्यात काम करतात तर कोण बिगारी काम करतात. अशा घरच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या विद्यार्थ्यांनी हे यश मिळिवले आहे. मॉडर्न गर्ल्स हायस्कूलमध्ये शिकणारी समीक्षा भोसले ही विद्यार्थीनी ९४.४० टक्के गुण मिळिवले. तिला मर्चंट नेव्ही मध्ये करिअर करण्याची इच्छा आहे. समीक्षाचे वडील हयात नाहीत तर आई स्वयंपाकाची कामे करते. तरी देखील प्रतिकूल परिस्थितीत तिने यश मिळिवले आहे. मॉडर्न हायस्कूलमधील आदित्य दहिवलीकर याने ८६.६० टक्के गुण मिळवले. त्याला पीएसआय व्हायचे आहे. नूतन बालविकास मंदिर शाळेतील मृणाली सावंत हिने ८२.२० टक्के मिळवले. तिचे वडील बिगारी काम करतात. याशिवाय राधिका जाधव, ओंकार खळे, आदित्य मूर्टे, साईराज जाधव, अस्मय विधाते, किरण म्हेत्रे, हर्षदा गुजले, मंजुनाथ नवटक्के या विद्यार्थ्यांनी देखील उत्तम यश मिळवले आहे.

इयत्ता बारावीच्या परीक्षेत मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्समधील श्रुतिका होडे हिने कॉमर्स विभागातून ८३.१७ टक्के गुण मिळवले. तिला सीएमए होण्याची इच्छा आहे. स.प.महाविद्यालयातील समृद्धी शिंदे हिने सायन्स विभागातून ८१.१७ टक्के गुण मिळिवले. तिला डाटा ॲनेलिस्ट क्षेत्रात करिअर करायचे आहे. समृद्धी शिंदेचे वडील ड्रायव्हर आहेत.

याशिवाय बारावीमध्ये आर्यन काशिद, प्रतिक्षा भालेराव, अथर्व शिंदे, शिवाजी ढेबे, रोहन चोरडिया, सिद्धेश अडसूळ, पवन पोहनकर, साई जाधव, प्राची आलाटे, रेहान जमादार, स्नेहा तुरे, गौरी कांबळे, प्रिया लाद, साईराज माळोदे, अथर्व भुवड, श्रुती जगताप, दिव्या निवळकर, पूर्वा उपळकर, शुभम मुंडे, विक्रांत कळबंडे, वैष्णवी राऊत यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे.

**६१. माजी विद्यार्थी मेळावा, १०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान**

आज कौशल्याधारित शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. भारत २०४७ मध्ये विकसित देश करण्यासाठी तरुणाईला कौशल्याधिष्ठित शिक्षण देणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून 'दगडूशेठ' गणपती ट्रस्ट कार्यरत आहे, असे मत सीओईपी भाऊ इन्स्टिट्यूटचे चेअरमन डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी व्यक्त केले. जय गणेश विद्यार्थी पालकत्त्व योजना माजी विद्यार्थी मेळावा व विविध स्किलिंग कोर्सेस प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे करण्यात आले. यावेळी विजय भालेराव, राजाभाऊ कदम, ज्ञानदीप अकॅडमी चे महेश शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी १०० हून अधिक माजी विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. ट्रस्टतर्फे सुरु असलेल्या ७५ पेक्षा जास्त स्किलिंग कोर्सेसमधील १०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आरी वर्क, नेल आर्ट, फॅब्रिक पेंटिंग, मेहंदी, ब्युटिशियन यांसारख्या विविध कोर्सचा समावेश आहे. तरुणींना आत्मनिर्भर करण्याकरिता हे कोर्स उपयुक्त असून आत्मनिर्भर भारताकडे पुढचे पाऊल टाकण्याच्या दृष्टीने दगडूशेठ गणपती ट्रस्ट यामाध्यमातून खारीचा वाटा उचलत आहे. माजी विद्यार्थीनी साक्षी दगडेसह काही विद्यार्थिनींनी अनुभव कथन केले. विद्या अंबर्डेकर आणि अंकिता शिळीमकर यांनी सूत्रसंचालन केले.

**६२. गणेशभक्तांसाठी शनिवारवाडा-दगडूशेठ गणपती मंदिर मार्गावर मोफत पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहन सेवा**

श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांना उन्हाची, पावसाची किंवा ज्येष्ठांसाठी चालण्याची गैरसोय होऊ नये, तसेच त्यांचा मंदिरापर्यंतचा प्रवास अधिक सुलभ आणि आरामदायी व्हावा, या उद्देशाने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टला पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनाची देणगी देण्यात आली. शनिवार वाडा ते दगडूशेठ गणपती मंदिर मार्गावर ही सेवा मोफत मिळणार आहे. गणेशभक्तांच्या सेवेसाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टला 'एका शज्ञर मोबिलिटी' कडून हे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहन नुकतेच प्रदान करण्यात आले. सुधीर मेहता यांच्या कंपनीच्या वतीने हे वाहन ट्रस्टला सुपुर्द करण्यात आले. यावेळी 'एका शज्ञर मोबिलिटी'च्या सुनंदा मेहता, अरिहंत मेहता उपस्थित होते. या वाहनाचा वापर पहिल्या टप्प्यात शनिवारवाडा ते श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर या मार्गावर गणेशभक्तांच्या मोफत प्रवासासाठी करण्यात येणार आहे. त्यानंतर पुणे रेल्वे स्थानक, एसटी स्थानक आदी ठिकाणांहून बाहेरगावाहून येणाऱ्या गणेशभक्तांना मंदिरापर्यंत पोहोचविण्यासाठीही ही

सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**६३. माऊलींच्या मानाच्या अश्वांची 'दगडूशेठ' गणपतीला अनोखी मानवंदना**

माऊली माऊली, ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि जय गणेश... गणपती बाप्पा मोरया अशा गणेशभक्तांनी केलेल्या जयघोषाने झालेल्या भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करीत अनोखी मानवंदना दिली. अश्वांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती. यावेळी मंदिरात या अश्वांचे पूजन करण्यात आले. कर्नाटक बेळगावमधील अंकली येथून शितोळे सरकार यांच्या मालकीच्या या दोन अश्वांचे आगमन पुण्यामध्ये झाले. श्रीमंत उर्जितसिंह शितोळे (सरकार), श्रीमंत महादजी राजे शितोळे (सरकार) तसेच पुणेकर मोठया संख्येने उपस्थित होते. गेल्या काही वर्षांपासून हे अश्व मंदिराच्या सभामंडपात येऊन गणरायाला मानवंदना देत आहेत. यंदा देखील या अश्वांनी मंदिरात येत गणरायाचे दर्शन घेतले. ट्रस्टतर्फे वारी अंतर्गत मोफत रुग्णवाहिका सेवा, आरोग्य तपासणी, भोजन सेवा हरित वारी, स्वच्छता अभियान, अनेक उपक्रम राबविले जातात. त्या सर्व उपक्रमांची सुरुवात या कार्यक्रमाने होते.

**६४. 'गणेशोत्सवातील सजावटीचे उत्साहात वासापूजन**

आगामी १३४ व्या वर्षाच्या गणेशोत्सवानिमित्त वृंदावनमधील प्रेम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. त्या सजावटीचा श्रीगणेशा वासापूजनाने झाला. उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे आयोजित यंदाचे कलादिग्दर्शक नितेश कुमार, काळे मांडववाले उपस्थित होते. मंदिराची प्रतिकृती सुमारे १०० फूट उंच इतकी असेल. जिथे भक्ती प्रेम बनते आणि प्रेम देवत्व बनते या संकल्पनेवर आधारित ही भव्य प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रुंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये अनेक भव्य खांब असून विविध मूर्ती देखील असणार आहेत. गाभारा व मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रींचे दर्शन घेता येईल.

**६५. 'दगडूशेठ' तर्फे २७ हजार वारकऱ्यांची आरोग्य व नेत्र तपासणी**

जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे वारकऱ्यांसाठी आयोजित आरोग्य व नेत्र तपासणी शिबीरात २७ हजार ५६४ हून अधिक वारकऱ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच मंदिर परिसरात तब्बल २५ हजार वारकऱ्यांना सकाळचा नाश्ता व चहा देखील देण्यात आला. जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत ट्रस्टच्या आरोग्यसेवेच्या कार्यात वारकऱ्यांसाठी आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर हा एक भाग आहे. या आरोग्य शिबिरात डोळ्यांची तपासणी, ११ हजार ५०० भाविकांना चष्मे वाटप यांसह वारकऱ्यांना प्रवासादरम्यान येणाऱ्या विविध आरोग्यविषयक अडचणींची तपासणी करण्यात आली. अंगदुखी, डोकेदुखी, बीपी, शुगर यांसारख्या आजारांवर विनामूल्य औषध देखील देण्यात आली. अंगदुखी, पाठदुखीसाठी ॲक्युप्रेशर थेरपी, प्रथमोपचार देखील करण्यात आले. तसेच ज्यांना नेत्र शस्त्रक्रियेची आवश्यकता असेल, त्यांना विनामूल्य शस्त्रक्रिया करुन देण्यात येणार आहे. शिबीरात डॉक्टर व स्वयंसेवक मिळून २७५ जणांनी सहभाग घेतला.

शिबिरात सत्यसाई सेवा ऑर्गनायझेशन, तेजोमयी आय केअर, रेणुका नेत्रालय, सूर्य सह्याद्री हॉस्पिटल कसबा पेठ, सद्गुरू शंकर महाराज मठ अन्नछत्र समिती, सिल्व्हर बर्च मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, देशपांडे आय केअर कोथरूड पुण्यामध्ये पालख्यांचे आगमन होताना मंदिरासमोर पालख्यांवर पुष्पवृष्टी देखील करण्यात आली. बुंदीची पन्नास हजार पाकिटे वाटण्यात आली.

**६६. श्री गणेश गीतेतील 'भक्तियोगा'वर प्रवचनमाला**

भगवंताच्या भक्तिचे नेमके स्वरूप काय? भगवान कशाला भक्ती म्हणतात? याचे सविस्तर विश्लेषण मांडण्याकरिता आणि अधिकमासाच्या पावन पर्वातवर भगवान श्री गणेशांच्या भक्तिचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तियोग गणेशभक्तांसमोर मांडण्याकरीता प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले होते. यवतमाळ वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी श्री गणेश गीततील भक्तीयागावर निरुपण केले. श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात दि. १७ ते २३ मे २०२६ दररोज सायंकाळी ६.३० ते ८ यावेळेत ही प्रवचनमाला झाली. भगवान गणेशांच्या सगुण साकार स्वरुप आणि विविध अवतारांच्या विस्मयकारी लीलांची गाथा म्हणजे श्री गणेश पुराण आहे. पुराणातील विविध कथांच्या आधारे, त्यातील कथनीय मूल्यांच्या आधारे, आपल्या जीवनाला सुंदर करण्याचा पुराण कथा श्रवण करणे हा राजमार्ग आहे. याद्वारे श्री गणेश नामाचा अद्वितीय महिमा, श्री गणेश गीतेतील कर्मयोग गणेशभक्तांसमोर मागील वर्षी प्रवचनमालांमध्ये उलगडण्यात आला होता. भक्तियोगाच्या संदर्भाने भक्ती करायची म्हणजे नेमके काय? आपण करतो ती भक्ती योग्य होत आहे का? आणि त्यामध्ये प्रगती होत आहे का? भक्तीचे नेमके फळ काय? या सर्व विषयांचे सविस्तर स्पष्टीकरण स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी केले.

**६७. महाआरोग्य शिबिरात १८ हजार ६३१ जणांचा सहभाग**

मानव सेवेचे महामंदिर साकारत असताना रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगीकारून कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे विविध १३७ प्रकारच्या विविध तपासण्या करीत आयोजित मोफत महाआरोग्य शिबिरात १८ हजार ६३१ जणांची तपासणी व उपचार करण्यात आले. पुणे शहरासह राज्याच्या विविध भागातून आलेल्या रुग्णांच्या विविध तपासण्या करीत साहित्य व औषधे वाटप देखील करण्यात आले. याकरिता पुणे जिल्ह्यातील ९० रुग्णालये व संस्थांच्या प्रतिनिधींनी शिबिरात अखंड ९ तास सेवा दिली. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर आणि आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते झाले. यावेळी कसबा

विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाच्या डॉ. अंजली टिळेकर, डॉ.संजीव डोळे, डॉ. संदेश पटवर्धन, ट्रस्टतर्फे फिरता दवाखान्याचे लोकार्पणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते झाले. ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी व सहकाऱ्यांनी शिबिराच्या नियोजनात विशेष सहभाग घेतला. डॉ.रघुनाथ माशेलकर म्हणाले, प्रत्येकाच्या आरोग्याची चाचणी होणे आवश्यक आहे. या चाचण्या योग्य वेळेत झाल्या तर नंतरचे दुष्परिणाम टाळता येतील. विकसित, संतुलित, समृद्ध, सुविद्य, सक्षम भारत व्हावा, यासाठी अशा शिबिरांच्या माध्यमातून व रुग्णसेवेच्या माध्यमातून ट्रस्टचे सुरु असलेले काम आशादायी आहे. महाआरोग्य शिबीराकरिता सुमारे १५ हजार नागरिकांनी नोंदणी केली होती. शिबिरात हृदय आजार, किडनी, नेत्र आजार, दंत उपचार, स्त्री रोग, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, अपंगांना मोफत जयपूर फूट वाटप, रक्त तपासणी, रक्तदान शिबीर, ईएनटी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी उपचार, अस्थिरोग, विविध थेरपी, रेडिओलॉजी, श्रवण आणि स्पीच थेरपी हे उपचार विनामूल्य करून देण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग व पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा, याची माहिती देखील देण्यात आली. वर्षभरात ट्रस्टशी संलग्न विविध २२३ रुग्णालये आणि विविध संस्थांमधून आरोग्यसेवा दिली जात आहे. जय गणेश विद्यार्थी पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांना मोफत आरोग्य शिबीर व विविध शाळांमध्ये आरोग्य शिबीराच्या माध्यमातून देखील ही सेवा दिली जाते. ट्रस्टच्या एकूण १४ रुग्णवाहिका असून अखंडपणे २४ तास पुणे शहर पिंपरी चिंचवड व जिल्ह्यात विनामूल्य सेवा दिली जाते. तसेच महाराष्ट्रात डिझेल खर्चात सेवा दिली जात आहे. यामध्ये कान, डोळे, दंत तपासणी व्हॅन रुग्णवाहिकेचा देखील समावेश आहे. आता यामध्ये अंजली माशेलकर फाऊंडेशनच्या सहकार्याने फिरत्या दवाखान्याचा देखील समावेश झाला आहे.

### ६८. यशस्वी विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ आणि साहित्य वाटप

कार्यक्रम लेडी रमाबाई हॉल येथे संपन्न झाला. कार्यक्रमाला एमकेसीएलच्या कार्पोरेट व्यवस्थापन चे उदय पंचपोर, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, ज्येष्ठ शिक्षण तज्ञ डॉ.अ. ल. देशमुख, विजय भालेराव उपस्थित होते. यावेळी जय गणेश पालकत्व योजनेअंतर्गत शिक्षण घेतलेल्या योजनेतील माजी विद्यार्थिनी सीए गौरी खटावकर, फार्मासिस्ट अनिरुद्ध दोरगे आणि बी टेक झालेला सिद्धार्थ दहिभाते या योजनेतील माजी विद्यार्थ्यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

अनिरुद्ध दोरगे म्हणाला, इयत्ता दुसरी मध्ये असताना मी या योजनेअंतर्गत सहभागी झालो. या ट्रस्टने केवळ माझ्यातील विद्यार्थी घडविला नाही, तर मला एक चांगली व्यक्ती म्हणून घडण्यास मदत केली. त्यामुळे या ट्रस्टचा मी आयुष्यभर ऋणी राहील, असेही त्याने सांगितले. गौरी खटावकर म्हणाली, ट्रस्ट तर्फे राबविण्यात आलेल्या योजनेमुळे मला केवळ शैक्षणिक आधार मिळाला नाही तर भावनिक आधारही मिळाला. ट्रस्ट हा एक प्रकारे कुटुंब म्हणून काम करतो. मी सीए झाले त्यामध्ये महत्त्वाचा वाटा ट्रस्टचा आहे. ट्रस्टने जर माझ्यावर विश्वास दाखवला नसता तर मी सीए झाले नसते . मी ज्या प्रकारे सीए झाले त्याचप्रमाणे माझ्या हातूनही एखादा सीए घडावा हे माझे स्वप्न आहे. सिद्धार्थ दहिभाते म्हणाला, मी जे स्वप्न पाहिले होते त्या स्वप्नांना बळ देण्याचे काम दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने केले. हा केवळ एक ट्रस्ट नव्हे तो एक कल्पवृक्ष आहे, जो गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना आपल्या छायेमध्ये घेऊन त्यांना आधार देतो. हा आधार त्यांना आयुष्य घडविण्यासाठी मदत करतो आणि त्यांच्यामध्ये एक चांगला माणूस घडविण्यासाठी जी कौशल्य आवश्यक असतात ती कौशल्य त्यांना देतो त्यामुळे तो माणूस एक आदर्श व्यक्ती म्हणून घडू शकतो.

### ६९. पालखी सोहळ्याकरिता रुग्णवाहिका व पाण्याचे टँकर रवाना

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरू तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका यांच्या पालखी सोहळ्यासोबत वारक-यांच्या सेवेकरिता तीन सुसज्ज रुग्णवाहिका पुण्यातून रवाना झाल्या. याशिवाय वारक-यांच्या सेवेत पिण्याच्या पाण्याचे टँकर देखील पाठविण्यात आले. गणपती मंदिरासमोर रुग्णवाहिकेचे पूजन करुन या उपक्रमाचा शुभारंभ झाला. उपक्रमाचे यंदा ३७ वे वर्ष आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका पालखी सोहळ्यासोबत या रुग्णवाहिका असणार आहेत. ट्रस्ट आणि सहयोगी वैद्यकीय संस्थांतर्फे पालखी सोहळा ज्या ज्या ठिकाणी मुक्कामास असतो, तेथे फिरता दवाखाना देखील चालविला जातो. यामध्ये त्वचा रोग, कान नाक घसा, नेत्र तपासणी, रक्तदाब, शर्करा तपासणी अशा विविध तपासण्या करण्यात येतात. तसेच औषधोपचार विनामूल्य दिला जातो. हजारो वारकरी दरवर्षी या आरोग्य सेवेचा लाभ घेतात.

### ७० चातुर्मास कीर्तन महोत्सव

भक्तिमय वातावरणात 'दगडूशेठ' चातुर्मास कीर्तन महोत्सवाचा शुभारंभ झाला. १ ते ८ ऑगस्ट दरम्यान झालेल्या या महोत्सवाचा शुभारंभ नाशिक येथील वारकरी भूषण श्रीगुरु ह.भ.प.चैतन्य महाराज निंबोळे यांच्या कीर्तनाने झाला. जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सेंट्रल पार्क येथे रोज सायंकाळी ६ ते ८ चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवात समाजभूषण शांताराम महाराज निमन, अरुण पवार, उद्धव गोळे, वैभव महाराज साखरे, जयवंत चांदेरे, राधाकृष्ण गुरुजी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यंदा या महोत्सवाचे ४० वे वर्ष आहे . दररोज सायंकाळी ५.३० वाजता अनुक्रमे आळंदी येथील ज्ञानेश्वरी कंठभूषण ह.भ.प.ओंकार महाराज दुडे शास्त्री, आळंदी साधकाश्रम येथील ह.भ.प.यशोधन महाराज साखरे, पंढरपूर येथील संत नामदेव महाराज यांचे १६ वे वंशज ह.भ.प.केशव महाराज नामदास, डोंबिवली येथील श्रीमलंग गड येथील ऑनलाईन कीर्तन गुरुकुलाचे संस्थापक ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत, परभणी मानवत येथील वारकरीभूषण ह.भ.प. उमेश महाराज दशरथे आणि पंढरपूर येथील मानकोजी महाराज बोधले यांचे ११ वे वंशज ह.भ.प.डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या कीर्तनाचा आनंद श्रोत्याना मिळाला. शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी जगद्गुरु फाऊंडेशनचे संस्थापक जगद्गुरुकृपांकित ह.भ.प.डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर याचे काल्याचे किर्तन झाले. महोत्सवाचा समारोप रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी ह.भ.प. भावार्थ महाराज देखणे यांच्या भारुडाच्या कार्यक्रमाने झाला.

**७१. आषाढी वारी पालखी सोहळ्यात लाखो वारकऱ्यांची आरोग्यसेवा**

आषाढी वारीमध्ये संपूर्ण पायी प्रवासात तसेच प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी आरोग्यसेवा, मोफत औषध वाटप आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील करण्यात आली होती. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका यांच्या पालखी सोहळ्यासोबत वारकऱ्यांच्या सेवेकरिता तीन सुसज्ज रुग्णवाहिका होत्या. याशिवाय वारकऱ्यांच्या सेवेत पिण्याच्या पाण्याचे टँकर देखील होते. मोठ्या प्रमाणात डॉक्टर्स, औषधे व आरोग्यविषयक सेवा पालखी सोहळा समारोपापर्यंत विनामूल्य पुरविण्यात येत आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, फलटण, तरडगाव, माळशिरस, वाखरी येथे, संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात लोणी काळभोर, यवत, बारामती, बेलवाडी, इंदापूर, अकलूज, वाखरी येथे आणि संत सोपानकाका पालखी सोहळ्यात सोमेश्वरनगर, बारामती, लासुर्णे, अकलूज, भंडी शेगांव, वाखरी आदी ठिकाणी आरोग्यसेवा देण्यात आली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट आणि सहयोगी वैद्यकीय संस्थांतर्फे पालखी सोहळा ज्या ज्या ठिकाणी मुक्कामास असतो, तेथे फिरता दवाखाना देखील चालविला गेला. यामध्ये त्वचा रोग, कान नाक घसा, नेत्र तपासणी, रक्तदाब, शर्करा तपासणी अशा विविध तपासण्या करण्यात आल्या होता. या सेवेचा लाखो वारकऱ्यांनी लाभ घेतला.

**७२. वाल्हे येथे मुक्कामी वारकऱ्यांना महाप्रसाद**

पालख्या पंढरपूर कडे मार्गस्थ होत असताना वाल्हे मुक्कामी १५००० वारकऱ्यांना बाप्पांचा महाप्रसाद देण्यात आला पूर्णयुक्त तरुण मंडळाचे कार्यकर्ते आदल्या दिवसापासून वाल्हे येथे तयारी करत होते आणि दुसऱ्या दिवशी कार्यकर्त्यांनी महाप्रसादाचे वाटपही केले.

**७३. २१ दिवसांचा अतिरुद्र महायज्ञ वेदमूर्ती नटराज शास्त्री यांसह ६५ ब्रह्मवृंदांचा सहभाग**

केवळ धार्मिक विधी नाही, तर सामूहिक आध्यात्मिक जागरण असलेला सलग २१ दिवसांचा अतिरुद्र महायज्ञ २६ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान मंदिरात झाला. संपूर्ण विश्वात शांती व सद्भावना निर्मितीकरिता झालेल्या या अतिरुद्र महायागात तब्बल ६५ ब्रह्मवृंद सहभागी झाले होते. दररोज दुपारी १ ते सायंकाळी ७ यावेळेत मंदिरात हा महायाग झाला. अतिरुद्र महायागाचे हे ६ वे वर्ष आहे. रविवार, दि. २६ जुलै रोजी महासंकल्प, नांदी श्राद्ध, वैष्णव श्राद्ध, पुण्याह वाचन, महान्यास, गणेश अर्चना, रुद्र जप, गणेश याग, रुद्र होम, अरुणाप्रश्न यागाने अतिरुद्र महायज्ञास प्रारंभ झाला. त्यानंतर दररोज गणेशयाग, रुद्र होम, महण्यास मंत्रघोष होणार असून दुर्गा होम, स्वयंवर पार्वती होम, नक्षत्र होम, पुरुषसूक्त होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, मेधा दक्षिणा मूर्ती होम यांसह दररोज विविध धार्मिक विधी करण्यात आले. अतिरुद्र यज्ञ ही केवळ पूजा नसून, एक आध्यात्मिक ऊर्जा प्रक्षेपण आहे. वेदांनुसार, या यज्ञामुळे व्यक्ती, कुटुंब व जग यांच्यात संतुलन व शुद्धता येते. हा यज्ञ जेथे होतो तेथे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. मनुष्यातील चेतनापेशी उर्जित होतात आणि कार्यमग्नता वाढते. एक लघुरुद्र म्हणजे ११ ब्रह्मवृंदांनी ११ वेळा रुद्रपठण करणे, असे ११ लघुरुद्र म्हणजे १ महारुद्र आणि ११ महारुद्र म्हणजे १ अतिरुद्र होय. अतिरुद्राच्या या मोठ्या व्यापकतेमुळे वायुमंडल शुद्धधी होऊन सर्व जीवजंतू दूर होतात व सर्व आजारांपासून मुक्ती मिळते. ३३ कोटी देवता याग व हर्विद्रव्य वनौषधीसहित आहुती देऊन यागाची पूर्णाहुती झाली. गंगा, यमुना, इंद्रायणी, पंचगंगा, मुठा, अष्टविनायक येथील नद्या, ज्योर्तिलिंग नद्या, रामेश्वरम २१ कुंडांचे जल याकाळात वापरण्यात आले. तसेच २१ आयुर्वेदिक औषधी वापर होम-हवनाच्या वेळी करण्यात येत आहे. सर्व नद्यांच्या एकत्रित केलेल्या मंत्रोच्चारीत पाण्याचा श्रींना सहस्त्र धारा अभिषेक करण्यात आला.

**७४. राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा पारितोषिक समारंभ पिंपरी चिंचवड**

पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेचा बक्षीस समारंभ चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. महापौर रवी लाडगे, मोरया गोसावी चिंचवड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त मंदार महाराज देव, उपमहापौर शर्मिला बाबर, आमदार अमित गोरखे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, मान्यवर व परीक्षक मंडळ उपस्थित होते. तब्बल १४ लाख २० हजार रुपयांची बक्षिसे स्पर्धेमध्ये शहरातील २२५ गणेश मंडळांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी १८७ मंडळांना १४ लाख २० हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. भोसरीतील कै. दामूशेठ गव्हाणे मित्रमंडळास ५१ हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. पिंपरीतील सुवर्णयुग मित्रमंडळाला द्वितीय क्रमांकाचे ४५ हजार रुपयांचे बक्षीस, भोसरीतील समस्त गव्हाणे तालीम भोसले मंडळाला तृतीय क्रमांकाचे ३५ हजार रुपयांचे बक्षीस, पिंपळे गुरव येथील छत्रपती शिवाजी मित्रमंडळाला चौथ्या क्रमांकाचे ३० हजार रुपयांचे बक्षीस, तर आकुर्डीतील काळभोरनगर येथील समता मित्रमंडळाला पाचव्या क्रमांकाचे २५ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले. निगडीतील जय बजरंग तरुण मंडळ, प्राधिकरणातील जय हिंद मित्रमंडळ ट्रस्ट, भोसरीतील लांडगे तालीम मंडळ, पठारे लांडगे तालीम मित्रमंडळ, चिंचवडगाव येथील गांधी पेठ तालीम मित्रमंडळ, एसकेएफ मित्रमंडळ, काळभोरनगर येथील राष्ट्रतेज तरुण मंडळ या सात मंडळांना 'जय गणेश भूषण' पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

**७५. राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा पारितोषिक वितरण पुणे**

राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा पुणे शहर महापालिका क्षेत्र विभाग पारितोषिक वितरण समारंभ गणेश कला क्रीडा मंच येथे राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते पार पडला. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, सहा पोलीस आयुक्त संजय दराडे, ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार, परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. भोसले मार्ग भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकाविला. तर, हडपसरमधील नवरंग मित्र मंडळ ट्रस्टने द्वितीय, अरण्येश्वर तावरे कॉलनीतील एकता मित्र मंडळ ट्रस्टने तृतीय, एरंडवण्यातील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने चौथे तर नारायण पेठेतील संयुक्त प्रसाद मित्र मंडळाने पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. स्पर्धेत सहभागी झालेल्या १६५ मंडळे व ३५ शाळा असे एकूण २०० सहभागींपैकी १०० मंडळे व शाळांनी पारितोषिके मिळवली असून एकूण १४ लाख ९७ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली आहेत.

### ७६ श्रीमत दगडूशेठ बाप्पांच्या 'श्रीमंत' कॉफीटेबल बुकचे प्रकाशन

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या 'श्रीमंत' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन नुकतेच मंदिरात झाले. ट्रस्टच्या सामाजिक, धार्मिक, आरोग्य क्षेत्रातील कार्याचा विस्तृत आढावा यामध्ये घेण्यात आला असून ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. सुनीलभाऊ रासने, कोष्याध्यक्ष- श्री. महेशभाऊ सूर्यवंशी, वामन हरी पेठे ज्वेलर्सचे भागीदार आशिष पेठे, गौरी पेठे, आदिवेद ॲडव्हर्टायजिंग सर्जनशील संचालक व लेखक मिलिंद घैसास, कला संचालक स्वाती घैसास, आदिवेद ॲडव्हर्टायजिंग ने देखील या कार्यात विशेष सहभाग घेतला. या ग्रंथपुष्पाचे प्रायोजकत्व वामन हरी पेठे ज्वेलर्स यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

### ७७. कारगिल, जम्मू, अयोध्या व राजस्थानसह सीमावर्ती भागात होणार 'दगडूशेठ' गणपतीची प्रतिष्ठापना

सामान्य नागरिकांप्रमाणेच देशाच्या सिमेवर लढणाऱ्या सैनिक गणेश भक्तांसाठी कारगिल, जम्मू, अयोध्या व राजस्थानसह सीमावर्ती भागात श्रीं च्या मूर्ती देण्यात आल्या. नुकत्याच या तुकड्यांच्या सैनिकांना या मूर्ती मंदिरात सुपूर्द करण्यात आल्या असून देशाच्या सीमावर्ती भागात रवाना झाल्या आहेत. भारतीय लष्करातील २४, ५, १९, १ मराठा लाइट इन्फन्ट्री युनिटच्या सैनिकांना मूर्ती देण्यात आल्या. भारतीय सैनिक सिमेवर अहोरात्र पहारा देत असल्याने त्यांना पुण्यामध्ये गणेशोत्सवात सहभागी होण्यास येता येतेच असे नाही. त्यामुळे यंदा देखील भारतीय लष्करातील मराठा लाइट इन्फन्ट्री युनिटचे सैनिक कारगिल, जम्मू, अयोध्या आणि राजस्थानसह देशात विविध सीमावर्ती भागात गणेशोत्सवात श्रीं ची मूर्ती स्थापन करणार आहेत. सीमावर्ती भागात दगडूशेठ च्या श्रींची मूर्ती स्थापन करण्याची इच्छा या बटालियनच्या सैनिकांच्या वतीने व्यक्त करण्यात आली होती. ट्रस्टने सैनिकांच्या इच्छेला मान देऊन श्री ची हुबेहुब २ फुटी प्रतिकात्मक मूर्ती देण्याचे मान्य केले. त्यानुसार नुकत्याच या मूर्ती विविध ठिकाणी रवाना झाल्या आहेत. सलग १६ वर्षे हा उपक्रम सुरु असून बटालियनच्या संख्येत देखील वाढ होत आहे.

### ७८. दहीहंडी महोत्सव

बोल बजरंग बली की जय... च्या जयघोषात दहीहंडी कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुप दहीहंडी संघाच्या गोविंदांनी ७ थर लावून फोडली. शनिवारी रात्री ९ वाजून २२ मिनीटांनी चौथ्या प्रयत्नात दहीहंडी फोडण्यात गोविंदांना यश आले. विराज कांबळे या गोविंदाने हंडी फोडली. बेलबाग चौकाजवळ असलेल्या दहीहंडी उत्सवाच्या पारंपरिक जागेत जय गणेश प्रांगण येथे दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दहीहंडी उत्सव पाहण्याकरिता गोपाळ भक्तांनी मोठी गर्दी झाली होती. भव्य एलईडी स्क्रिनवरुन श्रीकृष्ण लीला दर्शन गोपाळभक्तांना झाले. कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुप पथकातील गोविंदाने हंडी फोडताच गोपाळ भक्तांनी एकच जल्लोष केला. दहीहंडी संघाला रुपये ५१ हजार आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सुरुवातीला सायंकाळी नादब्रह्म ढोल ताशा ध्वज पथक ट्रस्टच्या वादकांनी पारंपरिक वाद्यवादन करुन उपस्थितांना ठेका धरायला लावला. पुण्यासह इतर शहरांतून गोविंदा पथके दहिहंडी फोडण्याकरीता आली होती.

## ।। श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती आरती ।।

जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।
स्वीकार कर लों भक्तोंकी सेवा । जय गणेश देवा ।। धृ।।
जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।
जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।। धृ ।।

हे गजमुखधारी मूषक सवारी । तीनों जगत में ख्याती तुम्हारी ।।
रवि शशि नित सांज सवेरे । रवि शशि नित सांज सवेरे ।।
उतारें तेंरी आरती देवा । जयदेव जयदेव ।।
जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।
स्वीकार कर लों भक्तोंकी सेवा । जय गणेश देवा ।। धृ ।। १ ।।

जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।
जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।। धृ ।।

हे श्रेष्ठ सुंदर कृपालूदाता । सृष्टीनियंता हे एकदंता ।।
चरणों में तेरे जीवन समर्पण । चरणों में तेरे जीवन समर्पण ।।
तू मुक्तिदाता देवों के देवा । जयदेव जयदेव ।।
जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।
स्वीकार कर लों भक्तोंकी सेवा । जय गणेश देवा ।। धृ ।। २ ।।

जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।
जय गणेश दगडूशेठ गणपती देवा ।। धृ ।।

# वाटचाल देवमंदिराबरोबर मानवसेवेच्या महामंदिराकडे.....

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्टच्या वतीने सर्व भक्तांना विनम्र अभिवादन! यंदाच्या वर्षी सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश चतुर्थीच्या पुण्य दिवसापासून गणेशोत्सवाला प्रारंभ होत आहे. विलक्षण उत्साह, उत्कट आनंद, अत्यंत पवित्र आणि अखंड मंगलमय वातावरणात श्रींच्या उत्सवास सुरवात होते.



लोकमान्य टिळकांनी १३३ वर्षापूर्वी समाज प्रबोधनासाठी लावलेली सार्वजनिक गणेशोत्सवाची ही अमृतवेल अत्यंत वेगाने, विविध कटुगोड स्मृतींचा ठेवा जपत आपल्या भारतीय संस्कृतीचा मुकुटमणी ठरली आहे. गणेशोत्सवाचे आजचे विस्तारलेले स्वरूप या अमृतवेलीचा सुंदर सुगंध आहे.

या आठवणींमध्ये रमतानाच, 'दगडूशेठ गणपती उत्सवाकडे' आज पहायला लागले की दिसतं, आज केवळ देशातच नव्हे तर परदेशातही या गणपतीची महती पोहोचली आहे. सार्वजनिक गणपती असूनही मातीच्या गणपतीचं मंदिर असणारे दगडूशेठ हे देशातले एकमेव उदाहरण आहे. देशभरातून पुण्यात आलेला कोणताही गणेशभक्त आज ''दगडूशेठको जाना है'' असं रिक्षावाल्याला सांगितल्याशिवाय पुणे सोडत नाही ! दहा दिवसांच्या या सार्वजनिक गणेशोत्सवातून या मूर्तीचं माहात्म्य वर्षभर पाळलं जातं आणि त्यात भविष्यातही खंड पडणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

देशात स्वातंत्र्याची चळवळ सुरू होती. निराश झालेल्या समाजाला नवचेतना देण्यासाठी देशातले महान नेते प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. त्यामध्ये लोकमान्य टिळकांनी तर कोणतीच कसर ठेवली नव्हती. त्याच वेळी एक घटना घडली. एक ज्येष्ठ पुणेकर, कृष्णाजीपंत खासगीवाले मध्यप्रदेशात ग्वाल्हेरला गेले होते ते नेमके भाद्रपदात. तिथला सार्वजनिक गणेशोत्सव त्यांनी पाहिला. संपूर्ण समाजातली माणसे या निमित्ताने एकत्र जमलेली त्यांनी पाहिली आणि त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. 'लोकांच्या प्रबोधनासाठी यातून एक चांगले व्यासपीठ निर्माण होईल', असा विचारही त्यांच्या मनात तरळून गेला. या कार्यासाठी त्याच्यापुढे पहिले नाव आले ते लोकमान्य टिळकांचेच !

पुढे पुण्यात आल्यावर शालूकर बोळातले सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंत यांना भेटून त्यांनी आपला हा विचार सांगितला. 'माणूस माणसाला शिवत नाही, तर देव रस्त्यावर आणण्याची कल्पना कशी सहन करेल?' हाच प्रश्न त्यावेळी उपस्थित झाला. त्याच मनस्थितीत ते दोघे लोकमान्यांना भेटले आणि त्यांच्यापुढे सार्वजनिक गणेशोत्सवाचा प्रस्ताव ठेवला. विशेष म्हणजे लोकमान्यांनाही तो प्रस्ताव आवडला.

दगडूशेठ हलवाई हे समाजात वजन असणारे नगरशेठही उपस्थित होते. 'नगरशेठ' ही पदवी त्यांना ब्रिटिशांनी बहाल केली होती. गणपती उत्सवाचे सार्वजनिक रूप प्रथम लोकांना रूचणार नाही याची कल्पना असूनही सार्वजनिक गणेशोत्सवाचा निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला. तेव्हा पुण्यात कर्मठ विचारांची मंडळीही असल्याने लोकमान्यांनी सुरूवातीला पाच गणपती बसवायचे ठरवले. स्वखर्चाने मूर्ती, मंडप, सजावट, कनाती आणि उत्सव सुरु केला. हे करण्यासाठी १८९२ मध्ये येणाऱ्या भाद्रपद महिन्यातला गणेश चतुर्थीचा दिवस ठरवण्यात आला. सात दिवसांच्या गणेशोत्सवास पुण्यात तेव्हा अधिकृतपणे सुरूवात झाली.

टिळक एवढेच करून थांबले नाहीत तर केसरीच्या दुसऱ्या दिवशीच्या अग्रलेखात त्यांनी पुण्यातल्या आणखी लोकांनी पुढे येऊन या सार्वजनिक गणेशोत्सवास चालना द्यावी, असे आवाहनही केले. १८९३ पासून दगडूशेठ यांचा कोतवाल चावडीचा आणि बाहुलीच्या हौदापासचा गणपती त्यामुळेच सुरु झाला. या वर्षीपासूनच गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या दहा किंवा अकरा दिवसांच्या सार्वजनिक गणेशोत्सवालाही आपोआप सुरुवात झाली !

दगडूशेठ यांनी बसवलेल्या या गणपतीला तेव्हा बाहुलीच्या हौदाचा गणपती म्हणत. श्रीमंत दगडूशेठ गणपती हे नाव त्यानंतर बऱ्याच वर्षांनी रूढ झाले सार्वजनिक गणेशोत्सवाला तीन वर्ष होत नाहीत तोच पुण्यात १८९६ मध्ये प्लेगच्या साथीने थैमान घातले. यामध्ये दगडूशेठ यांचा मुलगा दगावला. त्याचा मानसिक धक्का सहन न झाल्याने तीन-चार महिन्यांत दगडूशेठही निवर्तले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि अमाप संपत्ती एवढेच मागे राहिलं आणि ती बघायला कुणी वारस नाही अशी परिस्थिती निर्माण झाली.

त्याच काळात हिमालयातून आलेले दैवी पुरुष श्री. माधवनाथ महाराज यांनी दगडूशेठांच्या पत्नीची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. दगडूशेठ यांच्या नावाने दत्ताचे मंदिर बांधा आणि एक मुलगा दत्तक घ्या, असा सल्लाही दिला. बाईंनी तो सल्ला मानला आणि गणपतीही गावच्या पेठेतल्या लोकांना दिला. १८९७ पासून ही परंपरा चालू झाली.

पुढे १९५२ मध्ये सुवर्णयुग तरूण मंडळातल्या पंचांनी तो ताब्यात घेऊन लोकमान्यांच्या विचारांच्या परंपरेत राहून सार्वजनिक गणेशोत्सवासाठी त्याला आणखी नवे स्वरूप दिले. पंच म्हणून ताब्यात घेताना त्यामध्ये व्यापारी आणि तरूण मुलेही होती. हा गणपती ताब्यात घेण्यात तात्यासाहेब गोडसे आणि त्यांचे सहकारी मामा रासने, शंकर सूर्यवंशी, बुवा रासने, रघुनाथ महाराज केदारी, दत्तोबा चव्हाण, लक्ष्मणराव जमदाडे, गजाननराव केदारी, निवृत्तीराव रायकर आणि बाळकृष्ण जमदाडे असे

अनेक जण होते.

नव्या उत्साहाने तेव्हा पुन्हा एकदा कामाला सुरूवात केली. या गणपतीसोबत तेव्हा ३०० रूपये तसेच सात भोकाचे पैसे आणि श्री च्या अंगावरची एक ४२ पदरी पंचधातूची कंठी तसेच लोखंडावर सोने लावलेली चार कडी असे दागिने होते. १९५२ मध्ये आमच्या गणपतीची वर्गणी अवघी ३५० रूपयांपर्यंत असे. ही वर्गणी वाढायला हवी, यासाठी बरेच प्रयत्न केले. आसपासच्या लोकांना भेटून त्यांना यामागची पार्श्वभूमी कथन केली आणि वर्गणी वाढवायचं आवाहन केले. पहिल्याच वर्षी ती ८०० रूपयांपर्यंत पोहोचली !

त्याचा एक परिणाम असा झाला की १९५२ ते ६७ या १५ वर्षात जमा होणारी वर्गणी पाच हजार रूपयांपर्यंत गेली ! मधल्या काळात पुण्यावर दोन संकटे आली होती. एक म्हणजे १२ जुलै १९६१ रोजी आलेला पानशेत पूर आणि १९६५ मध्ये मंडई परिसरात ऐन गणेशोत्सवात उद्‌भवलेली दंगल. श्री गणेशाच्या कृपेने या दोन्ही संकटांचे निवारण झाले.

जुलै महिन्यात पूर आल्याने पुण्याचे अतोनात नुकसान झाले. पण त्याचा थेट परिणाम गणेशोत्सवावर झाला नाही. किंबहुना लोकांच्या गणपतीच्या वर्गणीवरही विपरित परिणाम झाला नाही. मंडई परिसरात हसन नावाच्या एका कार्यकर्त्याने लघुशंका केल्यामुळे तणाव निर्माण झाला होता. पण मंडईकरांनी शांततेचे आवाहन केले. पोलिस बंदोबस्त आणि लोकांच्या सहकार्याने तो गणेशोत्सवही शांततेत पार पडला. त्या काळात शांततेसाठी कार्य ऑर्डरमध्ये सूट मिळाल्याने दगडूशेठ गणपतीचे विसर्जनही शांततेत झाले. संध्याकाळी सहाच्या आत म्हणजे दिवेलागणीपूर्वी पुण्यातल्या सर्व मंडळांच्या गणेशमूर्तीचं विसर्जन झाल होत. विशेष म्हणजे तेव्हाही पुण्यात सुमारे दोन हजार सार्वजनिक गणेशमंडळ होती!

**१९६७ चा अमृतमहोत्सव!**

दगडूशेठ गणपतीला १९६७ मध्ये ७५ वर्ष पूर्ण होत असल्यामुळे त्यानिमित्त आदर्श उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असणाऱ्या विचारांचे व्यासपीठ म्हणूनच वैचारिक प्रेरणा देणारे कार्यक्रम, व्याख्यान, शाहिरी मैफिली, देशभक्तीपर गीतांचे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले. स्वातंत्र्यात पदार्पण होऊन २० वर्ष झाल्यामुळे प्रबोधनाचे व्यासपीठ तसेच धार्मिक, सांस्कृतिक आणि वैचारिक असा त्रिसूत्री भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला होता. विशेष म्हणजे सुवर्णयुग तरूण मंडळाने कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन वर्गणी जमा करण्याचं उद्दिष्ट हे २५ हजार रूपये ठेवले होते.

प्रत्येक कार्यकर्त्याने १०० रूपये असे मिळून १५ हजार रूपये जमा केले. व्यापाऱ्यांची बैठक बोलवून अमृतमहोत्सवी उत्सवाची कल्पना त्यांच्यापुढे ठेवली. आम्ही कार्यकर्त्यांनी जमा केलेली रक्कमही त्यांच्यापुढे ठेवली आणि त्यामध्ये किती भर घालता येईल याची विचारणा केली. या परिसरातल्या काका हलवाई यांच्याकडे ही सभा भरली आणि त्यांनी उर्वरित दहा हजार रूपये उभे केले.

या अमृतमहोत्सवी वर्षात तात्या गोडसेंच्या नेतृत्त्वात त्यांचे सहकारी सर्वश्री. अप्पा सूर्यवंशी, आप्पा रासने, मामा रासने यांनी तत्कालीन सर्वच पक्षांमधल्या विद्वानांची व्याख्याने आयोजित केली होती. त्यामध्ये कम्युनिस्ट पक्षाचे नेते भाई डांगे, जनसंघाचे रामभाऊ म्हाळगी, समाजवादी पक्षाचे एस. एम. जोशी तसेच नानासाहेब गोरे आणि काँग्रेसचे यशवंतराव चव्हाण या सर्वच नेत्यांनी 'दगडूशेठ' च्या विचार मांडले. संस्कृतचे गाढे अभ्यासक पं. वसंत गाडगीळ यांनी गणेश यज्ञयाग केला. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये अनेक दिग्गजांचे गायन, वादन आणि नृत्याचे कार्यक्रम रस्त्यावर आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे १९६७ चा तो अमृतमहोत्सवी सोहळा अनेक अर्थांनी गाजला!

७५ वर्षांची गणेशाची मूर्ती बदलण्याचा अनेकांचा आग्रह होता. यामागे कारणही तसेच होते. मूर्ती जुनी होती तसेच तिचा एक हात तुटायला आला होता. अशी भंगलेली मूर्ती उत्सवासाठी नको म्हणून तिचं विसर्जन करून नवी दुसरी मूर्ती तयार करण्याचे ठरवण्यात आले.

१९६७ च्या उत्सवाचे उपाध्यक्ष डॉ. बाळासाहेब परांजपे तेव्हा मेडिकल कॉलेजात होते. त्यांच्याकडे नागेश शिल्पी हा मातीचे अवयव करून देणारा कारागीर होता. ही कला तो वडील शंकरप्पा शिल्पी यांच्याकडून शिकला असल्याचे चौकशी केल्यावर समजले. नागेश आणि शंकरप्पांनी कॉलेजच्या संमेलनाला तेव्हा नटराजाची सर्वांगसुंदर मूर्ती तयार करून दिली होती.

शंकरप्पा हे कर्नाटक शैलीचे कलावंत असल्यामुळे त्यांची गाठ घेऊन दगडूशेठ उत्सवासाठी नवी मूर्ती तयार करणार का, याची आम्ही विचारणा केली. सोबत जुन्या मूर्तीचा फोटोही दिला. सुरूवातीला एक फुटाची मूर्ती तयार करण्याचे सांगण्यात आले. त्याप्रमाणे या मूर्तीचे व्हिडिओ चित्रण करण्यात आले, ते मोठ्या पडद्यावर मंडळातल्या ज्येष्ठांना दाखवण्यात आले आणि त्यांच्याकडून ओके घेतल्यानंतर मगच नव्या मूर्तीची ऑर्डर देण्यात आली.

दक्षिणेकडे वाढलेल्या शंकरप्पांनी त्यावेळी कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशातल्या तिरूपती, बालाजी आणि चामुंडेश्वर अशा मूर्तीची महती ऐकली होती. या मूर्तीच्या पोटात सिध्द केलेलं यंत्र बसवले असल्याचे त्यांनी सांगितले. असे यंत्र पोटात असणाऱ्या मूर्ती भारतात जागृत देव म्हणून सर्वमान्य असतात असेही सांगितले. त्यानुसार आम्हीही मूर्ती तयार करतानाच तिच्या पोटात गणेश यंत्र बसवण्याचे ठरवले.

योगायोगाचा भाग म्हणजे तेव्हा ५२ वर्षांनी एक सूर्यग्रहण येत होतं. ताम्रपटावर हे यंत्र तयार करताना ते पाण्यात ठेऊन मंत्रपठण, होमहवनाचे सोपस्कार करून मागच्या बाजूने ते मूर्तीच्या पोटात बसवले. मागचा भाग पुन्हा लिंपून हा विधी पार पाडला. पुढचे बारा महिने विविध धार्मिक विधी आणि रूद्रांमधून यंत्राचे पावित्र्य राखले गेले. १९६८ मध्ये विधीपूर्वक त्याची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तेव्हापासून हिंदू धर्मातले सर्व नियम पाळून आतापर्यंत धार्मिकविधी न चुकता होतात.

सोन्याचा मुकुट, दोन्ही कान, दात, गळ्यातले दागिने, हातांमधली कमळं, मोदक आणि पीतांबर यांच्यासाठी सोन्याचा वापर अनेक गणेशभक्तांच्या देणगीतून यापूर्वी झाला आहे. काही गणेशभक्त दगडूशेठ गणपतीतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठीही आर्थिक अथवा वस्तू स्वरूपात मदत करतात.

ज्या जागेवर दगडूशेठ गणपतीचा सार्वजनिक उत्सव मोठ्या दिमाखात साजरा होतो, ती कोतवाल चावडीची जागा गेल्या शंभर वर्षाहून अधिक काळ होम-हवन, जप-जाप्य, मंत्रजागर, अथर्वशीर्ष यांनी पावन झाली आहे. तो या जागेचाच एक चमत्कार आहे. त्यानंतर दीड लाख रूपये वर्गणी गोळा झाली. तेव्हापासून आम्ही वर्गणी घेणं बंद केल. त्याऐवजी गणेशोत्सवापूर्वी आम्ही पत्र प्रसिध्द करतो. त्यामध्ये सहकुटुंब येऊन श्री चे दर्शन, प्रसाद आणि आशीर्वाद घ्यावा असे आवाहन करतो. तसेच यथाशक्ती जे शक्य असेल ते गणपती उत्सवासाठी द्यावे असे आवाहन करतो. पैसे दिले

असतो. कोणापाशी पैसे न मागताही सार्वजनिक गणपती उत्सवातून कोट्यवधी रुपये जमा होतात हे देशातले एकमेव उदाहरण आहे! श्रीगणेशाच्या मातीच्या मूर्तीचे दगडूशेठ ट्रस्टचे मंदिर हेही आज देशातले एकमेव मंदिर आहे. ज्या लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये रस्त्यावर सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रचली त्याचीच ही परिणती आहे. सुमारे अडीच कोटी रुपये खर्चून बुधवार पेठेतल्या या मंदिराचे सन २००३ मध्ये विस्तारीकरण करण्यात आले. मंदिराचा गाभारा सुंदर नक्षीकाम केलेला असून सकाळी सहा ते रात्री बारापर्यंत तो भक्तांसाठी खुला असतो. या मातीच्या गणपतीपुढे उंदिरही आहे. अनेक भक्त त्या उंदराच्या कानात बोलताना दिसतात. मी त्यातल्या एकाला विचारले, तुम्ही उंदराशी का बोलता? तेव्हा मला मिळालेले उत्तरही मोठे गंमतीशीर होते. या भक्तांच्या म्हणण्यानुसार मूषक हे श्रीगजाननाचं वाहन आहे. त्याच्या कानात सांगितले तर तो निरोप थेट गणपतीपर्यंत पोहोचतो! आपली कामे हमखास होतात, अशी त्यांची श्रध्दा आहे.

४० वर्षापूर्वी पुण्यातल्या सार्वजनिक गणपतींची संख्या दोन हजारांच्या आसपास होती. १९६५ मध्येही पुण्यातली मिरवणूक टिळक पुतळ्यापासून सुरू होत असे. ती मंडईकडून, दगडूशेठ हलवाई मंडळाकडून बुधवार पेठेत जात असे. तिथून ती अप्पा बळवंत चौक, कुंटे चौक, जयहिंद चौक, फडतरे चौक आणि आजच्या कुमठेकर रस्त्याने ट्रेनिंग कॉलेजवरून लकडी पुलाशी जात असे. तेव्हा विसर्जन मिरवणुकीचा मार्ग लक्ष्मी रोड नव्हता. कारण नगरकर तालमीचा मंडप रस्त्यावर असे. त्यानंतर मात्र लक्ष्मी रोडचा संपूर्ण वापर मिरवणुकीसाठी होऊ लागला.

मानाच्या गणपतींची क्रमवारीही ठरली तशीच पाळली गेली. मानाच्या पहिल्या पाच गणपतीमध्ये कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, केसरी वाडा हे सकाळी असणारे तर शेवटच्या तीन गणपतींमध्ये भाऊ रंगारी, अखिल मंडई मंडळ आणि दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जनाने या उत्सवाची अधिकृत सांगता होत असे.

मानाच्या गणपतीचा वाद खूप जुना आहे. १९१० मध्ये मिरवणुकीच्या आरंभस्थानी म्हणजे आजच्या टिळक पुतळ्यापाशी यावर बराच वाद झाला होता. त्यावेळी लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरूंगात होते. हा वाद मिटावा म्हणून पुण्यात आलेल्या ब्रह्मगिरी महाराजांनी आजच्या मानाच्या गणपतींचा क्रम ठरवला. जिजामातेने बसवलेल्या कसबा गणपतीला पहिला मान दिला, तर शेवटचा दगडूशेठ गणपतीला मिळाला !

सन १९४० पासून अगदी १९७८ पर्यंत विसर्जन मिरवणूक रात्री संपत असे. सुरूवातीला ती आठपर्यंत चाले नंतर मध्यरात्रीपर्यंत दगडूशेठ हलवाईचा विद्युतरोषणाई केलेला रथ पाहून मगच लोक घरी जायचे. सध्या स्पर्धा वाढू लागल्यामुळे आणि पोलिस तसंच सरकारी यंत्रणा याबाबत कोणताही हस्तक्षेप करत नसल्यामुळे या गोष्टीचाच फायदा अनेक लोक घेऊ लागले म्हणून ही मिरवणूक रखडते.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदय ते दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयापर्यंतची वेळ विसर्जनासाठी असते, असे आपले शास्त्र सांगते. तरी दुसऱ्या दिवशी पौर्णिमा सुरू झाली तरीही ती चालूच राहते. हे चुकीचे आहे. ही आपल्या शास्त्राच्या दृष्टीने अमंगल वेळ आहे. अशा अनुचित प्रकारांना आळा बसण्यासाठी आम्ही विसर्जन स्पर्धेचे आयोजन केले तरी त्याचा काही उपयोग झाला नाही.

८० लाख वस्ती असणाऱ्या पुण्यात ही अडचण त्यामुळेच अधिक जाणवते. आज मिरवणुकीसाठी चार हजाराहून अधिक गणपती आहेत. त्यामुळेच विसर्जनाची वेळ पाळता येत नाही. त्यापैकी अडीच हजार गणपती मंडळ शहरातल्या मध्यवस्तीत आहेत. मुंबईत २७ ठिकाणांहून सार्वजनिक गणेश मंडळ विसर्जनासाठी समुद्रापर्यंत जाऊ शकतात. पुण्यात मात्र एकच नदी असून गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यासाठी असणारे पर्यायही खूप कमी आहेत. पुण्यातला लक्ष्मी रोड सोडून सिंहगड रोडने विठ्ठलवाडीकडून विसर्जनासाठी येण्यास कुणी तयार होत नाही. त्यामुळे मुठा नदीवर लकडीपूल भागात सर्वात जास्त गर्दी आणि ताण निर्माण होतात. सरकार आणि गणेश महामंडळानेच आता हा प्रश्न सोडवला पाहिजे.

मिरवणुकीत इतर अनुचित प्रकार होते. वर्गणी न देणाऱ्याला मिरवणुकीच्या वेळी पाण्याने भिजवले जाई. तर १९३७-३८ मध्येही अंधश्रध्दा वाढवणारे खेळ या मिरवणुकीतून चालत. त्यामध्ये लिंबू टाकून त्यावर जादूगार जादू घालत आणि समोरचा माणूस खोटा बेशुध्द पडे. आज मात्र स्पीकरच्या भिंती आणि त्यांचे जीवघेणे आवाज यावर नियंत्रण यायला हवे असे वाटते.

दगडूशेठ गणपतीसाठी करण्यात येणाऱ्या रोषणाईचा हेतूही विचारपूर्वक ठरवण्यात आला आहे. देशभरात कलाकुसरींनी युक्त असलेली विपुल मंदिरे तसेच प्रासाद आहेत. ती पाहणे सर्वांनाच जमत नाही. ज्याच्याकडे पैसा आहे तो इंग्लंड अमेरिकेला जातो, तोही सौंदर्यस्थळंच पाहतो ज्यांना या वास्तू पाहण्याची इच्छा असूनही पैशाअभावी ते शक्य होत नाही असेही असंख्य लोक असतात. हे प्रासाद आणि मंदिर बसल्या जागी बघता येतील यासाठी आम्ही आतापर्यंत मदुराई, तिरूपती, कोल्हापूरच्या अंबाबाईच मंदिर, बडोदा, जयपूरचा हवामहल यांच्या भव्य प्रतिकृती तयार केल्या.

**शताब्दी महोत्सव १९९२**

**दगडूशेठ मंडळाच्या शताब्दीला आम्ही थेट बिकानेरचा राजवाड्याचा सेट सणस ग्राऊंडवर उभारला होता!**

१९९२ मध्ये हा भव्य सोहळा तीन कोटी रूपये खर्च करून सलग ५७ दिवस आयोजित केला होता. त्यामध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि वैचारिक कार्यक्रमांची रेलचेल होती. हा सोहळा देशभर गाजला. तेव्हापासून दगडूशेठ गणपती लोकांच्या गळ्यातला ताईत नव्हे तर कोहिनूर हिरा ठरला. महाराष्ट्रातले अनेक राजकीय नेते तसंच दिग्गज कलावंतांचे दगडूशेठ गणपती हे श्रध्दास्थान आहे.

एकीकडे धार्मिक परंपरा जोपासत असतानाच दुसरीकडे दीनदुबळ्यांच्या डोळ्यांमधले अश्रू पुसण्यासाठीही आम्ही सतत प्रयत्नशील असतो. यातूनच मानवतेचे महामंदिर उभारण्याचा आमचा मानस आहे. देहविक्रय करणाऱ्या देवदासींच्या मुलांना चांगले संस्कार मिळावेत यासाठी कोंढवा परिसरात बालसंगोपन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्यातल्या हजार मुलांचे पालकत्व ट्रस्टने घेतले आहे. तिथे मुलांचे शिक्षण, राहणे तसेच भोजनाचीही विनामूल्य सोय करण्यात आली आहे. बाजीराव रस्त्यावरच्या पूना नाइट स्कूलला देणगी देऊन तिथे कष्टाळू आणि गरजू तरूणांसाठी रात्रशाळाही काढली आहे. या शाळेची मुले गुणवत्ता यादीमध्येही झळकतात!

कोंढव्यात तरूणांसाठी एक औद्योगिक प्रशिक्षण केंद्रही सुरू करण्यात आले असून दरवर्षी २०० विद्यार्थी त्याचा लाभ घेतात. तिथे टर्नर, फिटर तसेच इतर पूरक अभ्यासक्रमही शिकवले जात असून त्यासाठी दगडूशेठ ट्रस्टने ८० लाख रूपये खर्च केले आहेत. पुणे-सिंहगड रस्त्यावर वीटभट्टी कामगारांसाठी दगडूशेठ गणपती नगराची स्थापना १९८५ मध्ये केली.

वृध्दांसाठी एक कोटी रूपये खर्चून पिताश्री वृध्दाश्रमही कोंढव्यात बांधला आहे. याशिवाय डोंगराळ, दुर्गम भागात फिरते दवाखाने, तसेच गरिबांना अन्नधान्य, साबण, तेल, उटणे देऊन दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठीही उपक्रम राबवले जातात. सुवर्णयुग बँकेच्या मदतीने आर्थिक सेवा, तसेच सुवर्णयुग स्पोर्ट्‌स क्लबच्या माध्यमातून कबड्डी–खोखो आणि इतर भारतीय खेळांना प्राधान्य देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते.

संपूर्ण महाराष्ट्रात सध्या एक लाखाच्या आसपास सार्वजनिक गणपती बसतात आणि त्यांच्यातून दरवर्षी सुमारे दहा हजार कोटी रूपयांचा निधी जमतो. यातून आगामी काळात लोकांचे अनेक प्रश्न सोडवण्यास ते वापरले तर त्यातून सामाजिक प्रश्न सोडवण्याची एक मोठी चळवळच उभी राहील.

जलसंवर्धन चळवळीसाठी जय गणेश व्यासपीठ तयार करून ३५० गणेश मंडळे या उपक्रमात सहभागी झाली आहेत. कार्यकर्त्यांनी व्हॉटसअपवर 'जयगणेश व्यासपीठ' असा ग्रुप तयार करुन ही जलसंवर्धनाची चळवळ लोकांपर्यंत पोचवली आहे. गाळ काढण्याचे काम प्रत्यक्षात सुरु आहे. या उपक्रमाची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली असून राज्यातील धरणांमधील गाळ काढण्याचा निर्णय एप्रिल २०१७ च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. हे लोकसहभागाचे यश आहे. त्याच प्रमाणे केंद्र सरकारने देखील हा प्रोजेक्ट मॉडेल प्रोजेक्ट म्हणून स्वीकारला आहे. त्यामुळे देशातील सर्वच धरणांमधील गाळ भविष्यात काढला जाऊन पाणीसाठा वाढू शकेल. आपल्या देशाचा हा समृध्द नैसर्गिक वारसा जपण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. आपणही या अभियानात सहभागी व्हा आणि गणरायाच्या या निसर्गाधिष्ठित स्वरुपाची पूजा करुयात.

**जय गणेश हरितवारी :**

देहू–आळंदी ते पंढरपूर हा वारीचा मार्ग हिरवागार करण्याचा संकल्प ट्रस्टने केला असून जय गणेश हरितवारी अभियानाचा शुभारंभ देहू आणि वाल्हे येथील पालखी तळावर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करुन झाला. जय गणेश निसर्ग संवर्धन अभियान : ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्रामध्ये ५० लाख झाडे लावण्याचा संकल्प आम्ही केला आहे. याचा शुभारंभ प्रथम देहू –आळंदी ते पंढरपूर या वारीमार्गावर वृक्ष लावून केला आहे. या जय गणेश निसर्ग संवर्धन अभियांनाअंतर्गत ५० लाख वड, पिंपळ, चिंच, कडूनिंब अशी देशी झाडे लावण्यात आली आहेत. आपल्या देशाचा हा समृध्द नैसर्गिक वारसा जपण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. आपणही या अभियानात सहभागी व्हा आणि गणरायाच्या या निसर्गाधिष्ठित स्वरुपाची पूजा करुयात. यामध्ये दोन्ही पालखी सोहळा प्रमुख व इतर वृक्षप्रेमी अनेक संघटना यांचे सहकार्य लाभत आहे. चला या सर्व कार्याचे अधिष्ठान असलेल्या गणरायांचे दर्शन घेऊया आणि पुढील कार्याची प्रेरणा मिळवूया. गणपती बाप्पा मोरया मंगलमुर्ती मोरया!!

**जय गणेश ! जय गणेश !! जय गणेश !!!**

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे**

## सर्व गणेश भक्तांचे मन:पूर्वक आभार !

पुणे शहरातील गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी पर्यंत चालणारा गणेशोत्सवाचा आनंदमयी सोहळा कुठलाही अनुचित प्रकार न घडता श्रध्देने व भक्तीभावाने, उत्साहाने, पुण्यनगरीच्या वैभवात व किर्तीत भर घालणारा असा पार पडला त्याबद्दल सर्व गणेशभक्त व गणेश मंडळांचे कार्यकर्ते यांना धन्यवाद !

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने यंदा सादर केलेला पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम यादेखाव्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. गतवर्षी प्रमाणे यंदाही संपूर्ण विसर्जन मिरवणुकीस होणारा विलंब, भक्तांचे ताटकळणे व अनंत चतुर्दशी ऐवजी पितृपक्षात होणारे विसर्जन टाळण्यासाठी आम्ही अनंत चतुर्दशी दिवशी दुपारी ४ वाजता विसर्जन मिरवणुकीत सामिल झालो, या निर्णयास सर्व गणेशभक्तांनी, गणेश मंडळांनी, पोलीस प्रशासनाने सहकार्य केले.

राज्य महोत्सवः– गणपती उत्सवास महाराष्ट्र शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला, याबद्दल राज्य शासनाचे विशेष आभार.

उत्सवा निमित्ताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उप–मुख्यमंत्री, त्यांचे सहकारी, खासदार, आमदार, पालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, सह. पोलीस आयुक्त, पुणे पोलीस, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, होमगार्डसब, खाजगी सुरक्षा रक्षक, स्वयंसेवी संस्था, सर्व वर्तमानपत्रे आणि प्रसार माध्यमे, कला दिग्दर्शक, विद्युत रोषणाईकार, लाऊडस्पिकर असोसिएशन, बँका, सर्व प्रिंटर्स, बी.एस.एन.एल. व इतर दूरसंचार कंपन्या, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. पुणे, शासकीय अधिकारी, कर्मचारी, अग्नीशामक दल, पाटबंधारे विभाग, रेल्वे प्रशासन, एस.टी. महामंडळ आणि पी.एम.पी.एम.एल., केबलचालक, नारळ व्यापारी, श्रमजिवी, मेट्रोरेल, फोटो–व्हिडिओग्राफर्स, ढोल–ताशापथक, मंडळांचे कार्यकर्ते, लाखो भाविक, ब्रह्मवृंद, या सर्वांचे उत्सवा दरम्यान बहुमोल सहकार्य मिळाले, सफाई कामगारांनी सर्व रस्ते त्वरीत स्वच्छ करुन पर्यावरणाचे रक्षण केले

बाप्पांच्या वैभवशाली विसर्जन मिरवणुकीच्या रथाला विनामूल्य सेवा म्हणून बैल जोडी देणारे गणेशभक्त श्री. नीलेशशेठ पांडुरंग तरवडे, श्री. सुनीलशेठ मारणे, श्री. पृथ्वीशेठ खुटवड, श्री. अतुल खाटपे, श्री. निखिल कोरडे, श्री. कृष्णा बालवडकर, श्री. आशिष वाडकर या सर्वांप्रति आम्ही आभारी आहोत, कृतज्ञ आहोत,

**धन्यवाद, जय गणेश !**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट, पुणे
सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे

# सैषा गणेश विद्या!

भगवान श्री गणेशांचे नितांत सुंदर, अत्यंत भावगर्भ आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गणेश भक्त प्रिय रचना म्हणजे श्री गणेश अथर्वशीर्ष.

श्री गणेश अथर्वशीर्षाच्या अर्थनिर्धारणामध्ये ज्या स्थानी अत्यंत शांतपणे चिंतन करणे आवश्यक आहे अशा काही जागा म्हणजे, त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यमबं आणि सैषा गणेश विद्या!

या प्रत्येक शब्दावर, वाक्यावर अनेक अभ्यासकांनी अनेक प्रकारे विवेचन केलेले आहे. मात्र ते अनेकदा पृथकब स्वरूपातील म्हणजे वेगवेगळे आहे. त्यांच्यातील अंतर संगती समजून घेऊन जेव्हा आपण या सगळ्या गोष्टींचा सलग विचार करू तेव्हा आपल्यासमोर श्री गुरु कृपेने जो अर्थ प्रगट होतो तो खरोखरच अंतर्मुख करणारा असतो. रोमांचित करणारा देखील.

विज्ञान शब्दाचा आपल्या डोक्यात जो इंग्रजी भाषेतील सायन्स हा अर्थ आहे तो अथर्वशीर्षकारांना कुठेही अपेक्षित नाही. त्यांच्या काळात या अर्थाने तो शब्दच रूढ नव्हता. मग विज्ञान शब्दाचा नेमका अर्थ काय?
त्यासाठी आरंभी समजून घ्यावा लागेल ज्ञान या शब्दात तेथे अपेक्षित असलेला अर्थ. पंच ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून ज्याचे ज्याचे आकलन होऊ शकते त्याला शास्त्राने ज्ञान म्हटले आहे. अर्थात ज्ञान शब्दाचा तो एक अर्थ आहे. पण येथे तोच अपेक्षित आहे. मात्र पंच ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून बाह्य जगतातील सगुण, साकार गोष्टींचाच आस्वाद घेता येतो. मोरयाचा नाही. बाह्य स्वरूपात ज्ञानेंद्रियांनी ज्या ज्या गोष्टींचे ज्ञान होते त्या सगळ्यामध्ये देखील मोरयाच नटलेला आहे या अर्थाने तो ज्ञानमय आहे पण विज्ञान शब्द म्हणताना हे ज्ञान गळून पडणे असा वि उपसर्गाचा अर्थ अपेक्षित आहे. अर्थात बाह्य सगुण, साकार गळून पडल्यानंतर जे अंतरंगी अनुभवाला येणारे स्वयंप्रकाशित, निर्गुण ,निराकार तत्व ते विज्ञान. मोरयाच्या त्या स्वरूपाकडे अथर्वशीर्षकार विज्ञान शब्दातून अंगुली निर्देश करतात.



विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड, वणी

सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति या वाक्याचा देखील आमचे पूज्य गुरु महाराज एक वेगळा अर्थ सांगायचे. सामान्यपणे हे सर्व जग तुझ्या आधारे प्रत्ययाला येते असा अर्थ तर आहेच पण 'हे सर्व जग तुझ्याकडे परत येत आहे' हा श्री गुरुप्रदत्त अर्थ. सर्व जगाची निर्मिती तुझ्यामुळेच झालेली असल्याने विलय देखील तुझ्या ठिकाणीच होणार. त्यामुळे हे सर्व जग तुझ्याकडे परत येत आहे असा अर्थ ते यासाठी सांगायचे की त्यातूनच मग भूमिरापोनलो.... पासून तर त्वमब गुणत्रयातीतः ! पर्यंत एक सुंदर संगती लागते. ज्या टप्प्याने ते सर्व निर्माण होत आले त्याच्या विरुद्ध दिशेने, वेदांत शास्त्रातील परिभाषा वापरायची तर अपवाद न्यायाने हे सर्व तुझ्या ठिकाणी परतत आहे.

या स्वरूपात गुणत्रयातीत आणि सोबतच त्याच स्वरूपातील म्हणून कालत्रयातीत, देहत्रयातीत आणि अवस्थात्रयातीत यांचे वर्णन केल्यावर पुढे येणारे महत्त्वपूर्ण वर्णन म्हणजे, त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् येथे सामान्यपणे मूलाधार शब्दाचा संबंध आला की त्याच्या आधारे मूलाधार चक्र आणि अनुषंगिक स्वरूपात सप्तचक्रांचा विचार मांडला जातो. मात्र थोडा विचार करायला हवा की सर्व निरूपण ज्ञानमार्गाचे चालू असताना, भूमी पासून गुणत्रयापर्यंतचा विचार आलेला असताना अचानक ज्ञानमार्गाचा त्याग करत योगमार्गाचा उल्लेख येईल कशासाठी? बरे तो यापूर्वी कुठे आला नाही आणि नंतरही. मग मध्येच चक्राचे वर्णन कशासाठी ? त्यातही मूलाधार चक्र हे जसे मोरयाचे स्थान सांगितले तसेच गाणपत्य संप्रदायात सहस्रार चक्रामध्ये मोरयाचे स्थान वर्णिले आहे. ते सोडून केवळ मूलाधारातील स्थानाचे वर्णन कशासाठी करतील ?

मग प्रश्न निर्माण होतो की मूलाधारचा नेमका अर्थ काय ? तर लक्षात घ्या गुणत्रयाच्या मागे आहे मूलमाया. तिला या सगळ्याचा मूल आधार या अर्थाने मूलाधार असे म्हटले. त्या मूलाधार असणाऱ्या मायेमध्ये अर्थात तिच्याही पेक्षा सूक्ष्म स्वरूपात, माया संचालक चैतन्य रूपात हे मोरया आपण तिच्या आत स्थित आहात म्हणून आपण आहात मूलाधारस्थित.

मूलमायेच्या आत स्थिर काय? तर परब्रह्म. निर्गुण, निराकार परमात्मा तत्व. ओंकार ब्रह्म. मोरयाच्या त्याच परम वास्तव स्वरूपाला वेगवेगळ्या पद्धतीने श्री अथर्वशीर्षकार भगवान गणकाचार्य अधोरेखित करीत आहेत.

त्यासाठी मूलाधारस्थित शक्तीत्रयात्मक स्वरूपापर्यंत सर्व वर्णन केल्यानंतर ते योग्यांच्या ध्यानाचे वर्णन सांगत आहेत.

वेगळ्या शब्दात आत्तापर्यंत जे सांगितले ते सर्व सिद्धांत स्वरूपात होते आता योगी त्याचे प्रात्यक्षिक करतात हे त्यांना सांगायचे आहे. आत्तापर्यंत सांगितले तो श्रवणाचा भाग होता आता मननाचा विषय मांडायचा आहे.

मननाचा विषय आला की पुढचा शब्द येतो मंत्र. मननाच्या माध्यमातून जो तारुण नेतो तोच मंत्र. त्या मंत्र स्वरूपात त्यांनी श्री गणेश एकाक्षरी महामंत्राचा विचार केलेला आहे.

मंत्र हा श्री गुरुंनी शिष्याला देण्याचा विषय असल्याने त्यांनी स्पष्ट शब्दात मंत्र सांगितलेला नाही. त्यामुळेच गणादिं पूर्वमुच्चार्य.... किंवा गकारः पूर्वरूपम् .... अशा दोन पद्धतीने त्यांनी नेमका कोणता मंत्र सिद्ध होतो ते सूत्रबद्ध स्वरूपात वर्णन केले.

या वर्णनातील सगळ्यात महत्त्वाची समाप्तीची रचना म्हणजे नादः संधानम् संहिता संधिःम्

अर्थात या वेगवेगळ्या गब , अ, मब इत्यादी सर्व नादांचा एकत्रित विचार केल्यानंतर जी संहिता संधी म्हणजे एकरूपता प्राप्त होते ती समजून घेण्याचा विषय आहे.

नाद शब्द म्हणताना केवळ या वर्णांचा ध्वनी एवढाच अर्थ नव्हे तर नाद या शब्दाचा शास्त्राला अपेक्षित असणारा अर्थ आपोआप डोळ्यासमोर येतो तो म्हणजे ओंकार. ओंकार नाद असाच शब्द शास्त्राने वापरलेला आहे. ओंकारामध्ये देखील अ,उ,मब या वर्णांच्या उच्चारानंतर जो अनुचार,

अनाहत नाद प्रगटतो तोच नाद गब , अ, मब या वर्ण समूहाच्या म्हणजे एकाक्षर महामंत्राच्या उच्चारानंतर देखील तसाच प्रगटतो.

श्री गणेशांचा एकाक्षरी महामंत्र आणि ओंकार नाद हाच त्या दोघांना जोडणारा संधी आहे अशा स्वरूपात या दोघांचे एकरूपत्व समजून घेतले तर आणि तरच मोरयाला म्हणजे मोरयाच्या ओंकार ब्रह्म रूपाला समजून घेता येते.

यालाच अथर्वशीर्षकारांनी वापरलेला शब्द म्हणजे सैषा गणेश विद्या !

येथे गणेश विद्या शब्दांमध्ये कोणत्या एखाद्या विशिष्ट विद्येचा किंवा अनेक जण लावतात त्या पद्धतीने अक्षर विज्ञान इत्यादीचा काहीही संबंध नाही. योग्यांच्या ध्यानाचा विचार करताना वर्णमालिकेचा किंवा अक्षरांचा इतका बाळबोध विचार तेथे चिंतनाचा विषय होण्याचे कारणच नाही.

विद्या शब्दाचा अर्थ आहे जाणून घेण्याची पद्धती. भगवान श्री गणेशांना यथार्थ रीतीने जाणून घेण्याची पद्धती म्हणजे त्यांचे ओंकार ब्रह्मत्व. हीच गणेश विद्या. अर्थात याच रूपात त्यांना खऱ्या अर्थाने जाणून घेता येते. ओंकार म्हणजेच श्रीगणेश. श्री गणेश म्हणजे ओंकार.

आद्य, वेद प्रतिपाद्य, स्वसंवेद्य, आत्मरूप असणाऱ्या ओंकार ब्रह्माला, देवा तूची गणेशु ! म्हणणारी माऊलींची भूमिका किंवा अकारतो ब्रह्मा, उकार तो विष्णू असे म्हणत परमेश्वरांना देखील ओंकाराच्या एकेका मात्रेच्या स्वरूपात वर्णन करीत ऐसे तिन्ही देव जेथोनी उत्पन्न ! तो हा गजानन मायबाप! म्हणणाऱ्या जगद्गुरु तुकोबारायांपर्यंत सगळ्यांना मोरयाचे हे जे ओंकार ब्रह्म स्वरूप वर्णन करायचे आहे ते समजून घेण्याची पद्धती म्हणजे गणेश विद्या. त्यासाठी श्री गणेश अथर्वशीर्षकारांनी वापरलेले शब्द – सैषा गणेश विद्या !

**विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड, वणी मो. नं. ९८२२६४४६११**

## श्री नग्नभैरव ते नमः

भगवान श्री गणेशाची कार्यकारी शक्ती आणि त्यांचे मानसपुत्र म्हणजे भगवान श्री नग्नभैरव. भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक देवतेची एक कार्यकारी शक्ती वर्णन केलेली असते. तिला भैरव शक्ती असे म्हणतात. भगवान श्री शंकरांची कालभैरव नावाची शक्ती आणि श्रीजगदंबेची श्री झंपटनाथ नावाची शक्ती आपल्याला ऐकून माहिती असते. गाणपत्य संप्रदायात भगवान श्री गणेशांचे भैरव म्हणून श्री नग्नभैरव यांचे वर्णन केलेले आहे.

त्यांचे अतुलनीय वैभव समजून घेण्यापूर्वी हा शब्दच अतीव चिंतनीय आहे. त्यामध्ये नग्न आणि भैरव असे दोन शब्द आहेत. नग्न शब्दाची शास्त्रकारांनी दिलेली व्याख्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. मायावस्त्रविहीनोयं स नग्न इति उच्यते ! अर्थात ज्यांचे मायारूपी वस्त्र गळून पडलेले असते त्यांना नग्न असे म्हणतात. अर्थात अत्यंत शुद्ध, पवित्र, आवरणहीन, अवधूत अवस्थेला नग्न असे म्हणतात. भगवान श्री नग्नभैरव यांचे स्वरूप असेच असल्याने त्यांच्या नावात त्या शब्दाचा उल्लेख आहे.

दुसरा शब्द आहे भैरव. त्या शब्दात देखील दोन शब्द एकत्र आहेत. भय आणि रव. संस्कृत साहित्यामध्ये वेगवेगळ्या आवाजांसाठी वेगवेगळे शब्द दिलेले आहेत. चालताना पायांचा जो आवाज येतो त्याच्यासाठी शब्द आहे रव. पदरव असा शब्द आपण ऐकलेला असेल. तर भय म्हणजे भीती. अर्थात ज्यांच्या केवळ पायाच्या आवाजाला ऐकून त्यांच्या भीतीने या चराचरातील सर्व शक्ती अगदी ईश्वर, महेश्वर देखील आपली कामे निमूटपणे करतात त्या सर्व शक्तिमान चैतन्याला भैरव असे म्हणतात.



## क्षेत्रपाल : श्री नग्नभैरव

**।। अथ श्रीनग्नभैरवराज स्तोत्र ।।**

श्रीगणेशाय नमः श्रीनग्नभैरवराजाय नमः। (श्लोकअनु.)

श्रीनग्नभैरवा देवा, नमस्कार असो तुला । कृपा करूनि रक्षावा, दयाळा दास आपुला ।।१।।
प्रचंड भीमरूपा हे भैरवा परमेश्वरा । सुटतो ऐकुनी कंप, त्वद्रवा करमेश्वरा ।।२।।
वज्रदेहा कृपासिंधो, अधर्मिष्ठां भयप्रदा । धष्ठिा रक्षिसीं प्रें वारूनी सर्व आपदा ।।३।।
गाणेशांचा प्राणसखा, एकला तूंचि बा खरा । रक्षिसी पुढतीं मागें, मायसा स्वीय लेकरां ।।४।।
श्रीभूस्वानंद सत्क्षेत्रीं, मुख्याधिष्ठान शोभलें । परंतु गाणपत्यार्थ चित्त सर्वत्र लोभलें ।।५।।
सप्रेमें नाचसी देवा । गणेशानाग्रि जेधवां । देहभान न तें राहे, मोद हा वाढतो नवा ।।६।।
अट्टाहासरवें देवां, दानवा कांपरे भरे । नग्नभैरव हे कानी, एकतां धृति ना उरे ।।७।।
सर्वमायाविहीना हे, सर्वमाया–प्रचालका । सर्वांतर्यामिगा देवा, रक्षिं या दीनबालका ।।८।।
भुक्तिमुक्तिप्रदा स्वामिन् धनधान्यविवर्धना । योगींद्रपाला नमितों पाव रे दुष्टमर्दना ।।९।।
त्वद्भीतीने विश्व सारें भयभीतचि वर्ततें । त्वत्पादनिष्ठ गणती भवसिंधूसि गर्त ते ।।१०।।
कृपाळा भैरवा पाव, नाव आम्हांसि या भवीं । तुझी कृपा एक मात्र, आम्हां दीनां सदा हवी ।।११।।
स्तविती स्तोत्रराजें या, जे तुला करुणाघना । तयातें लेश ना होती भैरवेश्वर यातना ।।१२।।
अनुष्टुप् वृतिं पहिलें रत्न श्रीनग्नभैरवा । अर्पि अंकुशधारी हा, करूनी करुणा–रवा ।।१३।।

।। जय जय गणराज समर्थ ।। ।। इति श्रीनग्नभैरवराजार्पणमस्तु ।।

।। श्रीस्वानंदेशार्पणमस्तु ।।

# श्रीक्षेत्र मोरगावची मोक्षदायी द्वारयात्रा

अष्टविनायक यात्रेत श्री क्षेत्र मोरगावचे महत्त्व अनन्य आहे. या यात्रेचा प्रारंभ मोरगावच्या मयूरेश्वर दर्शनाने होतो आणि मयूरेश्वराच्या दर्शनानेच यात्रा पूर्णत्वास जाते. धर्मशास्त्रात पापक्षालनासाठी व्रताचरण सांगितले आहे. व्रताचरणाने ज्या पापाचे क्षालन होत नाही, ते तीर्थक्षेत्री जाण्याने होते आणि तीर्थक्षेत्री घडलेल्या पापाचे क्षालन श्री मयूरेश्वर क्षेत्राच्या (मोरगाव) येथील द्वारयात्रेत होते.

**द्वारयात्रेचे स्वरूप**

मोरगाव क्षेत्रातील श्री मयूरेश्वराच्या चार दिशांना ही द्वारयात्रा होते. पूर्व दिशेला धर्ममंडप, दक्षिण दिशेला अर्थमंडप, पश्चिमेला काममंडप आणि उत्तरेला मोक्षमंडप अशी धर्म, अर्थ, काम, मोक्ष अशी चतुर्विध पुरुषार्थ प्रदान करणारी ही द्वारयात्रा आहे. प्रत्येक दिशेच्या द्वारावर तीन, तीन टप्प्यांमध्ये विभागणी केली आहे. प्रत्येक स्थानावर विविध देवतांची स्थाने वर्णिली आहेत. यातील पहिल्या टप्प्यात गर्भागार, दुसऱ्या टप्प्यात देवागार, तर तिसऱ्या आणि अंतिम टप्प्याला क्षेत्रागार असे म्हणतात.

**पूर्व द्वार : धर्ममंडप (द्वार देवता : भगवान विष्णू)**

पूर्व द्वाराला श्री मयूरेश्वराच्या नजीक देवी बुद्धीचे मंदिर आहे. देवी बुद्धीचे दर्शन घ्यावे. त्यापुढे क्षेत्रपाल श्री नग्न भैरवांचे स्थान येते. मयूरेश्वर क्षेत्रातील प्रत्येक गोष्ट ज्यांच्या इच्छेने घडत असते, त्या भगवान श्री नग्न भैरव यांचे येथे पूजन करावे. नंतर भगवान विष्णू लक्ष्मीचे मंदिर आहे. धर्म देवता भगवान विष्णूंना धर्माचरण क्षमतेची प्रार्थना करून पूर्व द्वाराची यात्रा संपन्न करावी आणि परत श्री मयूरेश्वराच्या मंदिरात यावे.

**दक्षिण द्वार – अर्थमंडप (द्वार देवता : भगवान शंकर)**

या दिशेच्या द्वार यात्रेला अर्थमंडप असे वर्णिले असून पहिल्या टप्प्यावर श्री मयूरेश्वराचे गण असलेल्या श्री मोद आणि श्री प्रमोद यांचे स्थान आहे. मोरयाच्या आठ गणांचे प्रतिनिधीरूपात श्री मोद व श्री प्रमोद येथे स्थापित आहेत. दुसऱ्या टप्प्याला भगवान श्री नीळकंठेश्वर आणि नंतरच्या तिसऱ्या टप्प्याला श्री भगवान शंकर आणि देवी पार्वतीचे मंदिर आहे. अमृत मंथनामध्ये भगवान शंकरांनी प्राशन केलेल्या विषामुळे होणारा दाह कोणत्याही उपायांनी शमेना तेव्हा त्यांनी या स्थानी येऊन मयूरेश्वराची आराधना केली आणि मयूरेश्वराच्या कृपेने दाह शमन झाला. अर्थमंडपाची द्वारयात्रा शिवपार्वती दर्शनाने पूर्णत्वास जाते आणि पुन्हा श्री मयूरेश्वराचे दर्शन घ्यावे.

**पश्चिम द्वारः काममंडप (द्वार देवताः भगवती आदिशक्ती)**

या दिशेच्या द्वारयात्रेला काममंडप असे वर्णिले आहे. याच्या पहिल्या टप्प्याते देवी सिद्धीचे स्थान आहे. भगवती सिद्धी हे भगवती बुद्धीच्या तुलनेत दूर अंतरावर आहे. यात भगवान सांगत आहेत की जो सिद्धीशी जवळीक साधून आहे तो माझ्यापासून दूरच रहाणार. त्यानंतर पुढे भगवान श्री कृत्तिवासेश्वर आहे, हे भगवान श्री शंकरांचे स्थान असून क्रोधावर नियंत्रण ठेवण्यासाठी या स्थानाचे दर्शन घ्यावे. तिसऱ्या टप्प्याला भगवती आदिशक्तीचे स्थान आहे, तिथे श्री मदन आणि रतौ तिच्या पोबत विराजमान आहेत. चारही द्वारांच्या रचनेत पश्चिम द्वार म्हणजे काममंडप सर्वाधिक दूर अंतराचे द्वार आहे.

**उत्तर द्वार : मोक्षमंडप (द्वार देवता : भगवान सूर्य)**

या दिशेच्या द्वारयात्रेला मोक्षमंडप असे वर्णिले आहे. याच्या पहिल्या टप्प्याला श्री देवी योगिनी आणि महायोगिनी अशा दोन योगिनींचे मंदिर आहे. योगिनी म्हणजे सिद्धी आणि महायोगिनी म्हणजे बुद्धी. योग शब्दाचा अर्थ जुळणे. मानवी जीवनाची परण कल्याणकारी अवस्था शेवटी श्री भगवान मयूरेश्वरांशी जुळणे हीच असू शकतात. त्यानंतर दुसऱ्या टप्प्याला श्री भीमेश्वराचे मंदिर आहे. हे सुद्धा भगवान शंकराचे स्थान असून, अहंकारावर नियंत्रण मिळविण्याकरीता श्री भीमेश्वराचे दर्शन घ्यावे.

ही द्वारयात्रा प्रतिपदा ते चतुर्थी अशी करण्याची परंपरा आहे. यात माघ, ज्येष्ठ आणि भाद्रपद मासास विशेष महत्त्व आहे. मोरगावी चार दिवसांच्या पायी द्वार यात्रेकरिता वास्तव्याची व्यवस्था असून, सध्याच्या धावपळीच्या काळात एका दिवसामध्ये वाहनाने देखील द्वार यात्रा करण्याची सोय स्थानिक मोरगाववासीयांनी उपलब्ध करून दिली आहे. या प्रकारे द्वारयात्रा करून श्री गणेशाची भक्ती भाविकांमध्ये वृद्धिंगत व्हावी, अशी माझ्यासारख्या गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांची भावना आहे.

महेश सूर्यवंशी, कोशाध्यक्ष, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट



# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे

वर्ष ६ वे

## अतिरुद्र महायज्ञ सहभाग ७५ ब्रह्मवृंद पौरोहित्य : वेदमूर्ती नटराज शास्त्री

संपूर्ण विश्वात शांती व सद्‌भावना निर्मितीकरिता अतिरूद्र स्वाहाकार करण्यात येतो. अतिरुद्र यज्ञ ही केवळ पूजा नसून, एक आध्यात्मिक ऊर्जा प्रक्षेपण आहे. हा यज्ञ जेथे होतो तेथे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. मनुष्यातील चेतनापेशी उर्जित होतात आणि कार्यमग्नता वाढते. एक लघुरुद्र म्हणजे ११ ब्रह्मवृंदांनी ११ वेळा रुद्रपठण करणे, असे ११ लघुरुद्र म्हणजे १ महारुद्र आणि ११ महारुद्र म्हणजे १ अतिरुद्र होय. असा हा अतिरुद्र महायज्ञ गेली पाच वर्षे श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरात समाजाच्या कल्याणासाठी करण्यात येतो.

| दिनांक | वार | अतिरूद्र महायज्ञ |
|---|---|---|
| २५/०७/२६ | शनिवार | महासंकल्प, नांदी श्राद्ध, वैष्णव श्राद्ध, पुण्याह वाचन, महान्यास, गणेश अर्चना, रूद्र जप, गणेश याग, रूद्र होम, नवग्रह होम. |
| २६/०७/२६ | रविवार | गणेश याग, रूद्र होम, अरूणाप्रश्न याग |
| २७/०७/२६ | सोमवार | गणेश याग, रूद्र होम, पुरुषसूक्त होम |
| २८/०७/२६ | मंगळवार | गणेश याग, रूद्र होम, दुर्गा होम |
| २९/०७/२६ | बुधवार | गणेश याग, रूद्र होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, विष्णू सहस्त्रनाम अर्चना |
| ३०/०७/२६ | गुरुवार | गणेश याग, रूद्र होम, मेधा दक्षिणा मूर्ती होम, पार्वती स्वयंवर होम |
| ३१/०७/२६ | शुक्रवार | गणेश याग, रूद्र होम, महालक्ष्मी होम श्री सूक्त |
| ०१/०८/२६ | शनिवार | गणेश याग, रूद्र होम, नवग्रह होम |
| ०२/०८/२६ | रविवार | गणेश याग, रूद्र होम, अरुणाप्रश्न याग |
| ०३/०८/२६ | सोमवार | गणेश याग, रूद्र होम, पुरुषसूक्त होम |
| ०४/०८/२६ | मंगळवार | गणेश याग, रूद्र होम, दुर्गा होम |
| ०५/०८/२६ | बुधवार | गणेश याग, रूद्र होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, विष्णू सहस्त्रनाम अर्चना |
| ०६/०८/२६ | गुरूवार | गणेश याग, रूद्र होम, मेधा दक्षिणा मूर्ती होम, पार्वती स्वयंवर होम |
| ०७/०८/२६ | शुक्रवार | गणेश याग, रूद्र होम, महालक्ष्मी होम श्री सूक्त |
| ०८/०८/२६ | शनिवार | गणेश याग, रूद्र होम, नवग्रह होम |
| ०९/०८/२६ | रविवार | गणेश याग, रूद्र होम, अरूणाप्रश्न याग |
| १०/०८/२६ | सोमवार | गणेश याग, रूद्र होम, पुरुषसूक्त होम |
| ११/०८/२६ | मंगळवार | गणेश याग, रूद्र होम, दुर्गा होम |
| १२/०८/२६ | बुधवार | गणेश याग, रूद्र होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, विष्णू सहस्त्रनाम अर्चना |
| १३/०८/२६ | गुरूवार | गणेश याग, रूद्र होम, मेधा दक्षिणा मूर्ती होम, पार्वती स्वयंवर होम |
| १४/०८/२६ | शुक्रवार | ३३ कोटी देवता याग, हविर्द्रव्य वनौषधीसहित पूर्णाहुती |







# अभ्यासिकेतून यशस्वी झालेले अधिकारी

| क्र. | नाव | मिळालेले पद / इतर माहिती | वर्ष |
|---|---|---|---|
| १ | कविता श्रीपाद कुलकर्णी | सोलापूर येथे महसूल खात्यात | २०१२ |
| २ | गणेश बाळासाहेब नेवसे | न्यू इंडिया इंशुरन्स, मुंबई -ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर | २०१३ |
| ३ | सचिन वाघमारे | इंडियन बँक, नाशिक - असि. मॅनेजर | २०१३ |
| ४ | वैभव कदम | सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर -मुंबई | २०१३ |
| ५ | किशोर दिलीप इधाते | बँक ऑफ इंडिया-पुणे | २०१४ |
# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे -४११००२

## ताळेबंदपत्रक

## दि. ३१.३.२०२५ ते दि. ३१.३.२०२६

| ३१.३.२०२५ रुपये | पैसे | जिंदगी व मालमत्ता येणी | रुपये | पैसे | ३१.३.२०२६ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| **१,७८,२४,६८६** | ९५ | **बँकेतील शिल्लक** | | | **३,८३,४२,१९०** | ०५ |
| ३६,८०० | ०० | ट्रस्ट – अखेरची रोख शिल्लक (भवन+सदन) | | | ७०,६५४ | ०० |
| ४२१ | ०० | पिताश्री वृध्दाश्रम रोख शिल्लक | | | ३४८ | ०० |
| ३४० | ०० | बालसंगोपन केन्द्र रोख शिल्लक | | | ३४० | ०० |
| २१९ | ०० | आय.टी.सी रोख शिल्लक | | | ३२७ | ०० |
| **१०,४४,३२,६४५** | ०० | **गुंतवणूक** | | | **२३,३७,९७,७४२** | ०० |
| ५,५०,००,००० | ०० | सुवर्णयुग सह.बँक – मुदत ठेव | १३,२५,००,००० | ०० | | |
| १,११,३४८ | ०० | पुणे ज़िल्हा मध्य.सह.बँक – मुदत ठेव | १,२९,५९७ | ०० | | |
| ९७,४२,९४५ | ०० | बँक ऑफ बडोदा–मुदत ठेव | ४,४३,६४,६१९ | ०० | | |
| २,७१,५४,६३२ | ०० | कोटक महिंन्द्रा बँक– मुदत ठेव | १,८४,०८,२७८ | ०० | | |
| ४२,८७,१८९ | ०० | आय.डी.एफ.सी.फर्स्ट बँक– मुदत ठेव | ४५,७४,६६५ | ०० | | |
| ८१,१६,५३१ | ०० | आय.सी.आय.सी.आय बँक– मुदत ठेव | २,२८,००,०८३ | ०० | | |
| – | | एच.डी.एफ.सी. बँक– मुदत ठेव | १,१०,००,००० | ०० | | |
| २०,००० | ०० | सुवर्णयुग सह.बँक भाग दाखले | २०,००० | ०० | | |
| – | | गौतम कॉ.ऑप. हौसिंग सोसायटी भाग दाखले | ५०० | ०० | | |
| | | | | | | |
| १४,२८,४९७ | ०० | डिपॉझिटस | | | ४०,७६,०६० | ०० |
| ५५,६५,०८,७५१ | ०० | संस्था मिळकत | | | ५५,७०,३१,२३१ | ०० |
| १९२,९७,२०,५१७ | ०० | श्रींचे सुवर्ण/चांदी/हिरे अलंकार | | | ३१०,६२,३१,७५३ | ०० |
| २,६०,२१,७६७ | ०० | डेड स्टॉक खाते (मालमत्ता/ वाहन) | | | ३,०८,८५,५७३ | ०० |
| १,३१,६२७ | ०० | अनामत खाते (अॅडव्हान्स/सेवक उचल/वैद्य.विमा) | | | १६,७०,३९० | ०० |
| ३४,६०,१०४ | ०० | व्यापारी येणी | | | १०,२४,२२३ | ०० |
| २६,०६,८७४ | ०० | टी.डी.एस. व टी सी.एस.येणे खाते | | | ३८,८५,०४१ | १० |
| २०,३०,१६५ | ०० | मुदत ठेव व्याज येणे | | | ९०,४२,१३३ | १० |
| १,३२,४०५ | ०० | मशिनरी व एक्वीपमेंटस | | | १,१२,५४४ | ०० |
| | | | | | | |
| **२६४,४३,३५,८१८** | ९५ | **एकूण** | | | **३९८,६१,७०,५५०** | ०५ |

श्री. अमोलराव केदारी
सहचिटणीस

श्री. अक्षयराव गोडसे
उत्सव प्रमुख

श्री. उत्तमराव गावडे
विश्वस्त

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे -४११००२

## उत्पन्न - खर्च पत्रक

## दि. ३१.३.२०२५ ते दि. ३१.३.२०२६

| ३१.३.२०२५ | | उत्पन्न तपशिल | ३१.३.२०२६ | |
|---|---|---|---|---|
| रुपये | पैसे | | रुपये | पैसे |
| | | **श्री उत्सवातील जमा** | | |
| ४.४५.१०,२६७ | ०० | श्री उत्सव देणगी निधी | ४.०९.८३.४१४ | १२ |
| १.४५.८१,५३७ | ०० | श्री उत्सव पेटी निधी | १.५१.११.५०१ | ०० |
| ६१.१५.८१९ | ०० | श्री समर्पित उत्सव श्रीफळ देणगी | ८८.६५.०७५ | ०० |
| | | | | |
| | | **श्री चे मंदिरातील जमा** | | |
| ८.०५.६१.६१८ | ६५ | श्री मंदिर अभिषेक निधी | ११.५३.४०.७०२ | ४६ |
| १२.११.१८.१७७ | ०० | श्री मंदिर पेटी निधी | १४.५२.२१.५१३ | ०० |
| १.३४.४७.२१८ | १० | श्री समर्पित मंदिर श्रीफळ देणगी | १.३४.३०.४६० | ०० |
| ५.८५.४७.१३७ | ४७ | श्री दर्शन पास निधी | ८.१२.५६.१४४ | ४८ |
| | | | | |
| **१,६१,७२,३४४** | १७ | **इतर जमा** | **२,७७,११,२५७** | ८७ |
| ५.१३.१२.८०३ | ०० | **समर्पित सोने,चांदी व हिरे अलंकार** | ५.५२.०५.८६१ | ०० |
| | | | | |
| - | | **चालू वर्षातील तोटा** | - | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| **४१,६३,८८,५२२** | ११ | **पुढील पानावर बेरीज चालू** | **५१,१२,२२,०८७** | ७३ |

Examined & found correct Subject
to our report of ever date.

| श्री. सुनिलराव रासने<br>अध्यक्ष | श्री. माणिकराव चव्हाण<br>उपाध्यक्ष | डॉ.श्री. रामचंद्र परांजपे<br>उपाध्यक्ष | श्री. महेशराव सूर्यवंशी<br>कोषाध्यक्ष | श्री. हेमंतराव रासने<br>सरचिटणीस | श्री. अमोल सी. दातार आणि असो.<br>चार्टर्ड अकौंटंट |
|---|---|---|---|---|---|

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे -४११००२

## उत्पन्न – खर्च पत्रक

## दि. ३१.३.२०२५ ते दि. ३१.३.२०२६

| ३१.३.२०२५ | | खर्च तपशिल | ३१.३.२०२६ | |
|---|---|---|---|---|
| रुपये | पैसे | | रुपये | पैसे |
| ४.४८.७१.९५७ | ०० | श्री चा गणेशोत्सव सोहळा खर्च | ४,६४,७६,८६१ | ०० |
| ३.०४.८१.०८६ | ५० | श्री मंदिर व्यवस्थापन खर्च | ४,००,८६,८२३ | ८८ |
| १.६२.७५.२७७ | ९४ | श्री चा मंदिर खर्च | १,८६,३१,५९५ | ९२ |
| ४१.०९.२९० | ०० | मंदिर सजावट खर्च | ३५,८४,२४८ | ०० |
| २.६४.४०० | ०० | वार्षिक विद्युत रोषणाई खर्च (मंदिर) | ४,२८,६६० | ०० |
| ४५.११.२९८ | ०० | वार्षिक मंडप खर्च (मंदिर) | ६६,८१,३४५ | ०० |
| ४.४६.३५.५११ | ०० | सेवक वेतन (कार्यालयीन,मंदिर,आयटीसी,बालसंगोपन,रुग्णवाहिका) | ४,९७,८२,८४६ | ०० |
| २४.६१.९३५ | ०० | कर्मचारी बोनस खर्च | ३३,९१,९३६ | ०० |
| २५.४३.७९९ | ०० | प्रॉव्हिडंट फंड कॉन्ट्रीबिशन | २९,१८,३२५ | ०० |
| – | | ई.एस.आय.सी. कॉन्ट्रीबिशन | ५१,४०३ | ०० |
| – | | कर्मचारी ग्रॅच्युटी खर्च | १,३०,००,००० | ०० |
| ५२.११.१८२ | ०० | जय गणेश विद्यार्थी पालकत्व योजना खर्च | ४३,११,७४१ | ०० |
| २.८४.६९.७५२ | ०० | जय गणेश ससून रुग्णसेवा अभियान खर्च | २,५१,६३,२९३ | ४८ |
| ३४.५६.४१० | ५० | पिताश्री वृध्दाश्रम व्यवस्थापन खर्च | ३३,५०,५४१ | ७८ |
| ६.९९.१६० | ७० | बालसंगोपन केन्द्र व्यवस्थापन खर्च | ८,६२,५४४ | ०० |
| १.८९.००९ | ५० | आय.टी.सी व्यवस्थापन खर्च | ३,०९,०१८ | ३० |
| २.०७.९२७ | ०० | वाहन व्यवस्थापन खर्च | २,२९,९५४ | ८५ |
| ६२.२४.७७३ | ०० | विमा खर्च | ६९,७२,२८५ | ०० |
| १९.१८.७०६ | ०० | शिवजयंती उत्सव खर्च | १६,०८,०६१ | ०० |
| ६६.७१.०४९ | ०० | संगीत महोत्सव खर्च | ७०,९२,८०७ | ०० |
| ८.०२.१८९ | २८ | जय गणेश आपत्ती निवारण अभियान खर्च (टँकर सेवा व इतर) | ३,१७,५२१ | ७४ |
| २६.६४.०३४ | ०० | चातुर्मास प्रबोधन किर्तन सोहळा खर्च | ७,३७,३८४ | ०० |
| ३९.०७.५१२ | ८४ | म.रा.वि.मं. वीज वापर भाडे | ५२,४७,८०४ | ०० |
| २.६९.४८६ | ०० | टपाल व दूरध्वनी खर्च | १,७९,८९६ | ०० |
| ६.१६.५३२ | ०० | प्रोफेशनल/ऑडिट /लिखाण/मुल्यांकन फी इ. | ५६,९९,४२७ | ०० |
| ८२.२१६ | ०० | पुणे म.न.पा.कर (मिळकतकर/पाणी बिल) | १,११,२३५ | ०० |
| १.०६.४५३ | ६३ | बँक चार्जेस | १,१८,५१४ | ३१ |
| **२१,१६,६७,९४७** | **८९** | **पुढील पानावर बेरीज चालू** | **२४,७३,४६,०८८** | **२६** |

Examined & found correct Subject to our report of ever date.

श्री. सुनिलराव रासने
अध्यक्ष

श्री. माणिकराव चव्हाण
उपाध्यक्ष

डॉ.श्री. रामचंद्र परांजपे
उपाध्यक्ष

श्री. महेशराव सूर्यवंशी
कोषाध्यक्ष

श्री. हेमंतराव रासने
सरचिटणीस

श्री. अमोल सी. दातार आणि असो.
चार्टर्ड अकौंटंट

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे -४११००२

## उत्पन्न - खर्च पत्रक

## दि. ३१.३.२०२५ ते दि. ३१.३.२०२६

| ३१.३.२०२५ | | उत्पन्न तपशिल | ३१.३.२०२६ | |
|---|---|---|---|---|
| रुपये | पैसे | | रुपये | पैसे |
| ४१,६३,८८,५२२ | ९९ | मागील पाना वरून बेरीज | ५१,१२,२२,०८७ | ७३ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| ४१,६३,८८,५२२ | ९९ | एकूण | ५१,१२,२२,०८७ | ७३ |

Examined & found correct Subject to our report of ever date.

श्री. सुनिलराव रासने
अध्यक्ष

श्री. माणिकराव चव्हाण
उपाध्यक्ष

डॉ.श्री. रामचंद्र परांजपे
उपाध्यक्ष

श्री. महेशराव सूर्यवंशी
कोषाध्यक्ष

श्री. हेमंतराव रासने
सरचिटणीस

श्री. अमोल सी. दातार आणि असो.
चार्टर्ड अकौंटंट

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे -४११००२

## उत्पन्न – खर्च पत्रक

## दि. ३१.३.२०२५ ते दि. ३१.३.२०२६

| ३१.३.२०२५ | | खर्च तपशिल | ३१.३.२०२६ | |
|---|---|---|---|---|
| रुपये | पैसे | | रुपये | पैसे |
| **२१,१६,६७,९४७** | **८९** | **मागील पाना वरून बेरीज** | **२४,७३,४६,०८८** | **२६** |
| १४.७७.७३८ | ५० | कार्यालयीन खर्च (भवन+सदन+आयटीसी+धनकवडी इ.) | ५६.१३.५२५ | ५० |
| २०,१९,८६६ | ०० | रूग्णवाहिका खर्च(पेट्रोल.डिझेल,मेंटेनन्स,भत्ते,इ.) | १६,१०,०९१ | १५ |
| १,५३,४८१ | ०० | लेखन सामुग्री, टंकलेखन, झेरॉक्स इ. | २,०३,१७१ | ०० |
| ४०,५१,०४६ | ०० | छपाई खर्च (अहवाल.पावती पुस्तके,फ्लेक्स इ.) | ५२,२५,६३२ | ०० |
| ५४.४४.७५० | ०० | दुरुस्ती व देखभाल खर्च (मंदिर,भवन,सदन.आयटीसी,फर्निचर.जनरेटर.संगणक इ.) | २८.१०.०४८ | ०० |
| ४१,५७.२४९ | ०० | ॲप.वेबसाईट व प्रसार माध्यम खर्च(फेसबुक,युट्युब.इन्स्टाग्राम,व्टिटर इ.) | ७२.४१,२८३ | ०० |
| १०.४७.५०० | ०० | व्हिडिओ.शुटींग्ज फोटो खर्च (इतर कार्यक्रम) | ११.०६,७४० | ०० |
| ६०,०४,५५२ | ०० | अभिषेक महावस्त्र व्यवस्था खर्च | ९३,४५,२४५ | ०० |
| १६.४७.०४८ | ०० | जाहिरात खर्च (प्रेस/इलेक्ट्रॉनिक मिडिया) (इतर जाहिरात) | १८,३५.६८४ | ०० |
| १,८८,४६५ | ०० | वाहतूक व हमाली खर्च | ४,२२.८०७ | ०० |
| ११.८५.४९३ | ०० | सजावट विभाग – ग्राऊंड भाडे व इतर खर्च | ८.४६.८६१ | ०० |
| ३६,१४२ | ०० | सोने व चांदी आटणी, अलंकार /प्रभावळ दुरुस्ती पॉलिश. घडणावळ,मजूरी इ. | ७.४४,४०३ | ०० |
| ८.७०.१३८ | ०० | दहिहंडी उत्सव खर्च | ३.७६,६५३ | ०० |
| २०,००,९०७ | ०० | पंढरपूर वारी उपक्रम खर्च (मोफत औषधोपचार, सेवा, भोजन. मंडप इ.) | २६,९२,४९३ | ०० |
| ३५.९७,४५२ | ०० | राष्ट्रीय गणेशोत्सव पारितोषिक स्पर्धा खर्च | ४१.५८,०४५ | ०० |
| १३,१६,१४६ | ०० | इतर देणगी | १.१६,३२.५७८ | ०० |
| १.८८.२५६ | ०० | इतर खर्च | १०.८३.११६ | ०० |
| ३.९२,११.१०१ | ०० | घसारा / झीज | ३,७१,७२.२६९ | ०० |
| – | | आरंभीचा शिल्लक माल | – | |
| **१३,०१,२३,२३६** | **६०** | **चालू वर्षातील जमा / वाढ** | **१६,९६,५४,४५८** | **८२** |
| | | | | |
| **४१,६३,८८,५२२** | **९९** | **एकूण** | **५१,१२,२२,०८७** | **७३** |

Examined & found correct Subject
to our report of ever date.

| श्री. सुनिलराव रासने<br>अध्यक्ष | श्री. माणिकराव चव्हाण<br>उपाध्यक्ष | डॉ.श्री. रामचंद्र परांजपे<br>उपाध्यक्ष | श्री. महेशराव सूर्यवंशी<br>कोषाध्यक्ष | श्री. हेमंतराव रासने<br>सरचिटणीस | श्री. अमोल सी. दातार आणि असो.<br>चार्टर्ड अकौंटंट |
|---|---|---|---|---|---|

| आचार संहिता | महाराष्ट्र गणेशोत्सव महामंडळ<br>गणेशोत्सव मंडळांना महामंडळाचे विनम्र आवाहन | अंमलात आणा |
|---|---|---|

# ४० कलमी आचारसंहिता

## खालील आचारसंहिता अंमलात आणा

- महाराष्ट्रात एकाच मुहूर्तावर सर्व ठिकाणी श्रीगणेशाची स्थापना करा.
- गणेशोत्सवाची आरती सकाळी व सायंकाळी ८ वाजता अशी एकाच वेळी करा.
- हा उत्सव हिंदू धर्माचा आहे.
- उत्सवात भक्तांच्या भावनांचा आदर राखा.
- अभिमानाने सांगा – आम्ही हिंदू आहोत.
- सिनेसंगीत, पाश्चात्य संगीत, रोंभासोंभा, ब्रेकडान्स वगैरेसारखे ओंगळ स्वरुप बदला.
- भक्तिगीते, भारतीय कर्णमधुर संगीत लावा.
- कर्णकर्कश्श आवाजावर नियंत्रण ठेवा.
- उत्सव काळात कृपा करुन मद्यपान वर्ज्य करा.
- उत्सव काळात जुगारासारखे प्रकार कृपया बंद ठेवा.
- आपल्या उत्सवास राष्ट्रीय स्वरुप द्या.
- उत्सव संपूर्ण धार्मिक स्वरुपात साजरा करा.
- सबंध महाराष्ट्रात गणेशोत्सव समाजाभिमुख करा.
- सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करा.
- गणेशोत्सव लोकशिक्षणाचे व जनजागरणाचे प्रभावी माध्यम आहे.
- मानवसेवेचे व्रत अंगिकारा.
- दीन, दुबळे, दु:खी व अपंग, आर्थिकदृष्ट्या कमकुवत, विधवा, परित्यक्ता यांना मदत करा.
- समाजहिताचे प्रकल्प हाती घ्या.
- महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा व पुरातन मंदिरांचा जीर्णोध्दार करा.
- आपल्या भागातील मंदिरांचे पावित्र्य राखा व प्रसन्नता ठेवा,स्वच्छता राखा.
- उत्सवकाळात समाजप्रबोधनाचे देखावे उभारा.
- उत्सव काळात कुणाचीही मने दुखवू नका.
- गणेशोत्सवाच्या लोकवर्गणीतून अतिवृष्टी/ पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त अभागी महिला तसेच पीडित रुग्णांकरिता मदत करा.
- सर्व समाजाला बरोबर घेऊन उत्सव साजरा करा.
- विसर्जन शांततेने, शिस्तीने करा.
- विसर्जन मिरवणूक शास्त्राप्रमाणे सूर्योदयापूर्वी संपवा.
- विसर्जनातील हिडीस व विडंबनात्मक प्रकार बंद करा.
- पवित्र वातावरणात मिरवणुकीची शान वाढवा.
- सर्वांना आनंद देणारा उत्सव साजरा करा.
- मिरवणुकीत वर्गणीदार माता, भगिनी, प्रतिष्ठित नागरिक यांना सहभागी करा.
- सर्वांना आदराची वागवणूक द्या.
- विद्यार्थ्यांकडून अथर्वशीर्षाची आवर्तने रोज पहाटे करवून घ्या.
- राष्ट्रगुरु लोकमान्य टिळक व छत्रपती शिवराय यांचे फोटो उत्सवाच्या मंडपात लावा.
- श्री संत ज्ञानेश्वरमहाराज व श्री संत तुकोबाराय यांची भगवी पताका मंडपावर लावा.
- उत्सव काळात अशोभनीय प्रथा / प्रकार बंद करा.
- श्रीगणेश या आपल्या आराध्य देवतेचे पावित्र्य राखा.
- आपले मंडळ मानवसेवेचे कायमस्वरुपी मंदिर करा.
- आपल्या भागात व्यायामशाळा सुरु करा.
- गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका सुरु करा.
- व्यक्तीपेक्षा समाज, समाजापेक्षा राष्ट्र मोठे आहे, याचे भान ठेवा.
- माणसापेक्षा देव मोठा आहे, याची जाणीव राहू द्या.
- प्रतिकूल परिस्थिती असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारा.
- झाडे लावा, झाडे जगवा, निसर्ग संवर्धन करा.
- पाणी वाचवा, काटकसरीने वापरा, भूजल संधारणासाठी प्रयत्न करा.

# मंदिरातील धार्मिक सेवा (ई-सेवा)

**विशेष नोंद : सकाळी ७.०० ते ८.०० ही वेळ आरतीची असल्याकारणास्तव या वेळेत अभिषेक पूजा करण्यात येत नाही. कृपया नोंद घ्यावी.**



**गणेश याग**



**सत्यविनायक पूजा**



**भोग सेवा**



**दैनंदिन अभिषेक**

| अ.क्र. | श्रींच्या धार्मिक सेवा | शुल्क | वेळ सकाळी |
|---|---|---|---|
| १ | दैनंदिन अभिषेक (स्वहस्ते) | रू.२५१/- | सकाळी ६ ते ७ व स. ८ ते सायं.६ पर्यंत |
| २ | श्रीगणपती सूक्त अभिषेक | रू.५०१/- (दर मंगळवार) | सकाळी ६ ते ७ व स. ८ ते सायं.६ पर्यंत |
| ३ | शिशु पूजन | रू.५०१/- | सकाळी ६ ते ७ व सायं.६ |
| ४ | सत्यविनायक पूजा (दर शुक्रवारी) | रू.११००/- | सकाळी ६ ते ७ व शुक्रवार स.९ ते दु.१ विनायकी चतुर्थी दुपारी ३ ते सायंकाळी ६ |
| ५ | संकष्टी चतुर्थी महाअभिषेक | रू.२१००/- | पहाटे ५ ते दुपारी ३ |
| ६ | अंगारकी चतुर्थी महाअभिषेक | रू.३१००/- | सकाळी ८ ते दुपारी १२ |
| ७ | श्री गणेश कुंकुम अर्चना (शनिवार व रविवार) | रू.३०१/- | सकाळी ६ ते ७ स.८ ते सायं.६ पर्यंत |
| ८ | सहस्त्रावर्तन पूजा (दर बुधवार, विनायकी चतुर्थी) | रू.६००१/- | बुधवार स.९ ते दु.१२ विनायकी दु. १२ ते ३ |
| ९ | गणेशयाग (मंगळवार, संकष्टी चतुर्थी, विनायकी चतुर्थी, | रू.२१०००/- | स. ८ ते दु.१२ |
| १० | श्रीं ची दैनंदिन हार सेवा | रू.२१००/- | |
| ११ | श्रीं ची भोग सेवा (फळ सेवा) | रु.३१००/- | |
| १२ | श्रीं ची दैनंदिन पोषाख सेवा | रू.३१००/- | |
| १३ | संकष्टी चतुर्थी, विनायकी चतुर्थी श्रींची पोषाख सेवा | रू.६०००/- | |
| १४ | तोरण सेवा(मंदिराचा दर्शनी भाग) (मंगळवार, संकष्टी चतुर्थी, विनायकी चतुर्थी,अंगारकी चतुर्थी) | रू.१५०००/- | |
| १५ | मंदिर ध्वज सेवा (मासिक) | रू.९०००/- | |
| १६ | वैयक्तिक (स्वतत्र) गणेशयाग | रू.३५०००/- | |
| १७ | मोगरा उत्सव पुष्पसेवा | रू.३०००००/- | |
| १८ | संकष्टी गणेशयाग संकल्प | रू.५०१/- | |
| १९ | अंगारकी गणेशयाग संकल्प | रू.५०१/- | |
| २० | सहस्त्रावर्तन संकल्प दर बुधवार,विनायकी चतुर्थी | रू.५०१/- | |
| २१ | विनायकी गणेशयाग संकल्प | रू.५०१/- | |
| २२ | मंगळवार गणेशयाग संकल्प | रू.५०१/- | |

# मंदिराच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त संगीत महोत्सव २०२६

**मंगळवार दि. १९ मार्च ते सोमवार दि. २३ मार्च २०२६**

स्थळ: नु. म. वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, बाजीराव रोड, पुणे.

कार्यक्रम वेळ: सायंकाळी ५ ते ६

| दिनांक | वार | कलाकार | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १९/०३/२०२६ | गुरुवार | पद्मश्री भिकल्या लाडक्या थिंडा आणि तारपा पथक | तारपा वादन आणि नृत्य |
| २०/०३/२०२६ | शुक्रवार | पंडित उपेंद्र भट आणि सहकारी | गुरु गणेश |
| २१/०३/२०२६ | शनिवार | खंडेराव मुळे आणि सहकारी | स्वरयात्रा |
| २२/०३/२०२६ | रविवार | नटरंग अकादमी, पुणे | त्रिपुण्ड |
| २३/०३/२०२६ | सोमवार | स्वरप्रज्ञा पं. मिलिंद रायकर आणि यज्ञेश रायकर | व्हायोलिन जुगलबंदी |

कार्यक्रम वेळ: रात्री ७ ते १०

| दिनांक | वार | कलाकार | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १९/०३/२०२६ | गुरुवार | श्रीधर फडके आणि समूह | फिटे अंधाराचे जाळे |
| २०/०३/२०२६ | शुक्रवार | नंदेश उमप आणि ७५ कलाकार | नंदेश वत्सला विठ्ठल उमप प्रस्तुत 'मी मराठी' |
| २१/०३/२०२६ | शनिवार | कुणाल गांजावाला | लाईव्ह इन कॉन्सर्ट |
| २२/०३/२०२६ | रविवार | राणी वर्मा, वंदना गुप्ते, भारती आचरेकर, शैला दातार, सावनी दातार, निलाक्षी पेंढारकर, दीपिका जोग आणि हृदया दातार. निवेदक- सुनील बर्वे | माणिक वर्मा फाउंडेशन निर्मित 'अमृताहुनी गोड' |
| २३/०३/२०२६ | सोमवार | पं. हृदयनाथ मंगेशकर व सहकारी | भावसरगम |

आपले नम्र

'श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट' व 'सुवर्णयुग तरूण मंडळ'

पार्किंग व्यवस्था: छोटी नु. म. वि. प्रशाला, प्रभात टॉकीज समोर

'गुढी पाडवा' आणि 'हिंदू नूतन वर्षाच्या' मंगलमय शुभेच्छा!

प्रवेश विनामुल्य

## संगीत महोत्सव

### चैत्र शुध्द प्रतिपदा - मंदिर वर्धापन दिन

गणपती बाप्पा हे १४ विद्या आणि ६४ कलांचे अधिपती आहेत. या सर्व विद्या आणि कला या बाप्पांच्या उपासनेचा महामार्ग आहेत. या चराचरात प्रथम ज्या शब्दाचा, सूरांचा गुंजारव प्रगटला तो म्हणजे 'ॐकार' या ॐकारापासून पंचमहाभूते, पंच तन्मात्रा, सृष्टीतील सर्व जीव म्हणजेच ८४ लक्ष योनी अवतरल्या. मनुष्य ही भगवंताची शेवटची अद्धितीय कलाकृती. या मनुष्याला पाच ज्ञानेंद्रिये आणि ५ कर्मेंद्रिये लाभली आहेत या उपर मन, बुध्दी, चित्त, अंहकार आणि स्व असे स्तर आहेत. या स्व च्या जाणिवेपर्यंतचा म्हणजेच ॐकारापर्यंतचा मनुष्याचा प्रवास संगीत साधनेच्या माध्यमातून देखील केला जातो. भगवान गणेशांपर्यंत पोहोचण्याची जी अनेक माध्यमे आहेत त्यातीलच एक संगीत साधना. या अनुषंगाने बाप्पांच्या मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त म्हणजेच गुढीपाडवा ते रामनवमी असा संगीत महोत्सव ट्रस्टच्या वतीने आपण आयोजित करत असतो. गेल्या तीन वर्षांपासून संगीत महोत्सव आपण गुढीपाडव्यापासून ५ दिवसांचा करत आहोत.

या माध्यमातून संगीत क्षेत्रातील कलाकारांना बाप्पांची संगीत सेवा करण्याची संधी मिळते. भारतीय शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, नाटय संगीत, लोककला, कथ्थक नृत्य अविष्कार, ताल वाद्य इत्यादी माध्यमातून आपले भारतीय संगीत अधिकाधिक रसिकांपर्यत पोहचण्याचे कार्य ट्रस्टच्या वतीने सातत्याने सुरू आहे. या महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकार व रसिक श्रोत्यांचे आम्ही आभारी आहोत.

## चातुर्मास कीर्तन महोत्सव

गणेशोत्सव हे समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. या अनुषंगाने श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजणिक गणपती ट्रस्टच्या माध्यमातून आषाढी एकादशीनंतर चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सव आयोजित करत होतो. यापूर्वी ह.भ.प. वैकुंठवासी बाबा महाराज सातारकर यांची ३० दिवस संत वाङमयावर प्रवचने आणि एकादशीला कीर्तन आयोजित करीत होतो. त्यांच्या पश्चात ही परंपरा महाराष्ट्रातील नामवंत प्रतिभाशाली कीर्तनकारांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची ही परंपरा ट्रस्टच्या माध्यमातून जोपासली आहे. वारकरी संप्रदायाने जतन केलेली संतांची समाज प्रबोधनाची परंपरा श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्टने ४ दशके जोपासली आहे. यामध्ये ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, अमृतानुभव, हरिपाठ, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, यांचे संत वाङमयाचे ज्ञान प्रबोधन व कीर्तनाच्या माध्यमातून ट्रस्टच्या वतीने प्रतिवर्षी या चातुर्मास महोत्सवाच्या कार्यक्रमाद्वारे पोहोचविण्याचे कार्य अखंड सुरू आहे.

**जय गणेश !! रामकृष्ण हरी ।।**






# चातुर्मास कीर्तन महोत्सव

शनिवार, दि. १ ऑगस्ट ते रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६
वेळ : सायं ५.३० ते रात्री ८.३० पर्यंत

| वार | दिनांक | कीर्तन |
|---|---|---|
| शनिवार | १-८-२०२६ | श्रीगुरु ह. भ. प. चैतन्य महाराज निंबोळे (नाशिक) वारकरी भूषण |
| रविवार | २-८-२०२६ | ह. भ. प. ओंकार महाराज दुडे शास्त्री (आळंदी) ज्ञानेश्वरी कंठभूषण |
| सोमवार | ३-८-२०२६ | ह. भ. प. केशव महाराज नामदास (संत नामदेव मंदिर, पंढरपूर) संत नामदेव महाराज यांचे १६ वे वंशज |
| मंगळवार | ४-८-२०२६ | ह. भ. प. यशोधन महाराज साखरे (साधकाश्रम, आळंदी) |
| बुधवार | ५-८-२०२६ | ह. भ. प. डॉ. जयवंत महाराज बोधले (पंढरपूर) मानकोजी महाराज बोधले यांचे ११ वे वंशज |
| गुरुवार | ६-८-२०२६ | ह. भ. प. उमेश महाराज दशरथे (मानवत, परभणी) गाथामुर्ती, वारकरीभूषण |
| शुक्रवार | ७-८-२०२६ | ह. भ. प. जयेश महाराज भाग्यवंत (डोंबिवली) संस्थापक - ऑनलाइन कीर्तन गुरुकुल, श्रीमलंग गड |
| शनिवार | ८-८-२०२६ | जगद्गुरुकृपांकित ह. भ. प. डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर (पुणे) संस्थापक - जगद्गुरू फाऊंडेशन [काल्याचे कीर्तन ] |
| रविवार | ९-८-२०२६ | ह. भ. प. भावार्थ महाराज देखणे (पुणे) केंद्र सरकारचा उस्ताद बिस्मिल्ला खान युवा पुरस्कार २०२४, भारूड कलेसाठी प्राप्त [ भारूड] |



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे
व्यवस्थापन : सुवर्णयुग तरुण मंडळ

सेंट्रल पार्क, डेक्कन, पुणे

सर्वांसाठी प्रवेश

## भाविकांकरिता मंदिरातील व्यवस्था

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पा कोट्यवधी भाविकांचे परम श्रध्दा स्थान आहे.

या बाप्पांच्या दर्शनासाठी पुण्यातून, महाराष्ट्रातून तसेच देशातून व जगभरातून दररोज सुमारे ३० ते ३५ हजार भाविक दर्शनासाठी येतात. मंगळवार, शनिवार व रविवारी भाविकांची संख्या ५० ते ६० हजारांवर जाते. संकष्टी व अंगारकी चतुर्थीला ही भाविक संख्या २ ते ३ लाखांवर जाते येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम दर्शन व्यवस्था व्हावी या करिता ट्रस्टच्या वतीने चोख अशा व्यवस्था करण्यात आल्या आहेत.

१) भाविक आपलेदर्शन ट्रस्टच्या वेबसाईटवरून बुक करू शकतात. ह्या भाविकांकरिता दर्शनासाठी गेट नं. १ व गट क्र. ४ येथून मंदिरात जाण्याची सोय उपलब्ध आहे.

२) जे भाविक थेट मंदिरात दर्शनाला येतात त्यांच्या करिता गेट क्र.३ येथून दर्शनाची व्यवस्था आहे.

३) जेष्ठ नागरिक, दिव्यांग भाविकांकरिता गेट क्र.१ व गेट क्र. ४ येथून थेट मंदिरात जाण्याची व्यवस्था आहे.

४) भाविकांकरिता चप्पल स्टॅड, बॅग काउंटर, फिडींग रूम, वॉशरूम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, व्हिलचेअर, प्रथमोपचार या सर्व व्यवस्था मंदिर परिसरात उपलब्ध आहेत.

५) गेट क्र. ३ येथून आलेल्या सर्व भाविकांकरिता दर्शन रांगेत रेलींग, सुरक्षा चेकींग, शेंदूर पात्र, महालक्ष्मीमाता दर्शन, नग्नभैरव दर्शन, मंदिर सभापंडपात प्रवेश केल्यावर, गाभाऱ्यात बाप्पांचे दर्शन चांदीच्या बाप्पांची मूर्ती, त्याच्या डाव्या बाजूला देवीसिध्दीमाता, उजव्या बाजूला देवी बुध्दीमाता त्यांच्या पुढे त्यांचे पुत्र श्रीलक्ष आणि श्री लाभ अशा संपूर्ण गणेश परिवाराचे दर्शन घडते

६) मान्यवर भाविकांकरिता दर्शनासाठी सभा मंडपात स्वतंत्र जागेची व्यवस्था केलेली आहे जेणे करून सामान्य भाविकांची दर्शनरांग बंद न करिता सतत सुरू राहते

७) भाविकांना मंदिरात स्वहस्ते अभिषेक करण्याची व्यवस्था सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आरतीच्या वेळा सोडून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे दर मंगळवार, संकष्टी व विनायकी चतुर्थीला गणेशयागाला बसण्याची सोय आहे.

दररोज नित्य अभिषेक, मंगळवारी गणेशसुक्त अभिषेक, बुधवारी सहस्त्रआवर्तने शुक्रवारी सत्यविनायक पूजा, लहान बाळांसाठी शिशुपूजन अशा पूजा व्यवस्था मंदिरात करण्यात आल्या आहेत. याची सर्व माहिती मंदिरात तसेच ट्रस्टच्या वेबसाईटवर ई-सेवेच्या माध्यमातून उपलब्ध आहे.

- भाविकांकरिता, बाप्पांना पोषाख सेवा, फळांची भोग सेवा, हार सेवा, तोरण सेवा, ध्वज सेवा, संकल्प पूजा या सर्व सुविधा उपलब्ध आहेत.
- भाविकांच्या सुरक्षेकरिता सुरक्षारक्षक, सी सी कॅमेरे, बॅगज स्कॅनर, मेटल डिटेक्टर, पोलीस संरक्षण या व्यवस्था आहे.
- पार्किंगकरिता मंदिराच्या पुढे पुणे महानगर पालिकेचे मंडई येथे पार्किंग उपलब्ध आहे.
- भाविकांकरिता श्री गणेशांचा अतिशय आवडता नैवेद्य 'पंचखाद्य मोदक प्रसाद' ट्रस्टच्या काउंटरवर उपलब्ध आहेत.
- भाविकांना देणगी देण्याकरिता पेमेंटच्या सर्व सुविधा काउंटरवर उपलब्ध आहेत. समर्पित वस्तू स्वीकारण्याची देखिल व्यवस्था करण्यात आली आहे.

## मंदिरातील धार्मिक विधी

**ब्रह्मणस्पति सूक्त अभिषेक :**

भगवान श्री गणेशांचे सर्वांत प्रिय असे ऋग्वेदात वर्णन केलेले सूक्त म्हणजे ब्रह्मणस्पति सूक्त होय. या सुक्ताद्वारे दररोज मंदिरात बाप्पांना पहाटे ५ ते ६.३० अभिषेक करण्यात येतो.यामध्ये ५ वेळा ब्रह्मणस्वती सूक्त म्हटले जाते.

**दैनंदिन नित्य अभिषेक (स्वहस्ते) :**

बाप्पांच्या मंदिरात भाविकांकरिता दररोज नित्य अभिषेक करण्याची व्यवस्था केलेली आहे. या अभिषेकास १ ते २ व्यक्ती बसू शकतात. एक अभिषेक बॅच २० ते २५ मिनीटांची असतो यामध्ये संकल्प, १ अथर्वशीर्षाचा बाप्पांना अभिषेक, बाप्पांचे पूजन व आरती यांचा समावेश असतो. दिवसाला ४०० अभिषेक होत असतात. भक्तांना प्रसादासोबत १ देशी रोप देखील दिले जाते. जय गणेश वृक्ष गणेशा प्रसाद हा पर्यावरणपूरक उपक्रम श्रध्देला सेवेची जोड देऊन अवाहन सुरु आहे. वर्षाला मंदिरात २ लाख अभिषेक होतात.

**गणेश सूक्त अभिषेक (मंगळवार) :**

मंदिरात दर मंगळवारी भक्तांकरिता गणेश सूक्त अभिषेक करण्याची व्यवस्था केलेली आहे. हा अभिषेक नित्य अभिषेकांना सारखाच असून यात ५ वेळा गणेश सूक्ताचे पठण होत असते. मंगळवारी भक्तांची अभिषेकास विशेष गर्दी असते.

**श्री गणेश सहस्त्रावर्तने (बुधवार व विनायकी चतुर्थी):**

मंदिरामध्ये प्रत्येक बुधवार आणि विनायकी चतुर्थीला श्री गणेश सहस्त्रावर्तन पूजा भक्तांच्या सोयीकरिता केलेली आहे. प्रत्येक भक्ताला घरी अशाप्रकारच्या पूजा करता येत नाहीत म्हणून मंदिरात ट्रस्टने ही व्यवस्था केलेली आहे. या पूजेमध्ये १० ब्रह्मवृंद सहभागी असतात. यामध्ये भक्तांचा संकल्प, एक हजार अथर्वशीर्ष पठण करण्यात येते. आरती .... भक्तांना प्रसाद देण्यात येतो. या पूजेला साधारणतः २ ते २:३० तास लागतात.

**गणेश याग : (मंगळवार, संकष्टी चतुर्थी, विनायकी चतुर्थी)**

गणेश भक्तांच्या सोयीसाठी बाप्पांच्या मंदिरात प्रत्येक मंगळवार, संकष्टी चतुर्थी, विनायकी चतुर्थी, अंगारकी चतुर्थी, गणेश जयंती, गुढीपाढवा, अक्षय तृतीया, दसरा, दिवाळी अशा महत्वाच्या सण वारांना 'गणेश याग ' आयोजित करण्यात येतो. भक्ताला त्याच्या सोयीच्या तारखेला गणेश याग मंदिरात करावयाचा असल्यास त्याची आगाऊ नोंदणी करून त्या भक्ताला त्या दिवशी गणेशयागाची विशेष व्यवस्था करण्यात येते.

गणेश यागाला साधारणतः ३ ते ४ तासाचा कालावधी लागतो. गणेश यागाची वेळ सकाळी ८ ते १२ अशी असते. यागाची शुल्क भरून नोंदणी करायची असते. ज्या भाविकांना प्रत्यक्ष गणेश यागाला येता येत नाही त्यांच्यासाठी संकल्प करण्याची स शुल्क व्यवस्था करण्यात आली आहे.

**सत्यविनायक पूजा : शुक्रवार**

मंदिरामध्ये भगवान श्री गणेशांचे आवडते व्रत सत्यविनायक पूजा दर शुक्रवारी भक्तांच्या सोयीकरिता आणि बाप्पांचे माहात्म्य भक्तांपर्यंत पोहचविण्याकरिता या सत्यविनायक पूजेचे आयोजन दर शुक्रवारी मंदिरात करण्यात येते. गणेश पुराणानुसार सत्ययुगामध्ये भगवान शंकर देवी पार्वती मातेस तथा भगवान विष्णूंनी सुदाम्यास हे व्रत सांगितले व त्याचे माहात्म्य सर्वांना समजले. ब्रह्मा, विष्णू, महेश आदि शक्ती, सूर्य हे सर्व पंचेश्वर, देवता, ऋषीमुनी सत्यविनायकाचे व्रत करून निर्विघ्न झाल्याचा उल्लेख आपल्याला धर्मशास्त्रात आढळतो. यानुसार भक्तांच्याकरिता ही सत्यविनायक पूजा दर शुक्रवारी आयोजित करण्यात येते.

**मंदिरात येणारे भक्त :**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पांचे राज्यात, देशात तसेच जगभरात अनेक भक्त आहेत. मंदिरामध्ये दररोज साधारणतः३० ते ३५ हजार भक्त बाप्पांच्या दर्शनाला येत असतात. मंगळवार, शनिवार, रविवारी ही संख्या साधारण ५० हजारांच्यावर पोहचते. संकष्टी चतुर्थीला भक्तांची संख्या २ ते ३ लाख होते. गणेशोत्सवा दरम्यानच्या काळात सुमारे १.५ ते २ कोटी भक्त बाप्पांच्या दर्शनास येतात असा अनुभव आहे. मंदिरात दर महिन्याला साधारण १२०० ते १५०० परदेशी भाविक भेट देत असतात. विविध देशांमधून येणाऱ्या या परदेशी भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या सर्व येणाऱ्या भक्तांसाठी सुलभ विनामूल्य आणि सशुल्क अशी व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शन रांग, सुरक्षा रक्षक, बॅग स्कॅनर, हॅण्ड मेटल डिटेक्टर, डोअर फ्रेम डिटेक्टर, पोलीस कर्मचारी अशी सर्व व्यवस्था भक्तांकरिता सुरक्षेसाठी करण्यात आली आहे.

**यास्तव महाराष्ट्र शासनाने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला पर्यटनाचा व तीर्थक्षेत्राच्या 'अ' दर्जा प्रदान केला आहे.**

## ।। संकटनाशन महागणपति स्तोत्रम् ।।

### ।। श्री गणेशाय नमः।।

नारद उवाच।
प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम्।।
भक्तावासं स्मरेन्नित्यमायुः कामार्थसिद्धये ।।१।।

प्रथमं वक्रतुंडं च एकदंतं द्वितीयकम्।।
तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ।।२।।

लंबोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च ।।
सप्तमं विघ्नराजेंद्रं धूम्रवर्णं तथाष्टमम् ।।३।।

नवमं भालचंद्रं च दशमं तु विनायकम् ।।
एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम् ।।४।।

द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः
न च विघ्न-भयं तस्य सर्वसिद्धि-करं प्रभो ।।५।।

विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनं ।।
पुत्रार्थी लभते पुत्रान् मोक्षार्थी लभते गतिम् ।।६।।

जपेद् गणपतिस्तोत्रं षडभिर्मासैः फलं लभेत् ।।
संवत्सरेण सिद्धिं च लभते नात्र संशयः ।।७।।

अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत् ।।
तस्य विद्या भवेत् सर्वा गणेशस्य प्रसादतः ।।८।।

।। इति श्रीनारदपुराणे संकटनाशनं नाम महागणपतिस्तोत्रं संपूर्णम् ।।

## मानवसेवेच्या महामंदिराकडे...

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| **आपत्कालीन मदत**<br>पूर, महापूर, दुष्काळ, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ शासन, व्यक्ती, संस्था यांना आर्थिक सहकार्य.<br>(लातूर, कोयना भूकंप, महाराष्ट्रातील दुष्काळ अशा आपत्ती काळात मुख्यमंत्री फंडास ५१ लाख रुपयांचा निधी) | १२.१२.१९६७ |
| **शिवजयंती व्याख्यानमाला**<br>लोकजागृती व वैचारिक प्रबोधन यांसाठी व्याख्यानमाला. | ०५.०८.१९६८ |
| **सुवर्णयुग सहकारी बँक**<br>सामाजिक व आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठीची बँक. | ०२.१०.१९७३ |
| **श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टची स्थापना** | २६.१०.१९७७ |
| **वैद्यकीय मदत**<br>ह्रदयशस्त्रक्रियांसाठी, तसेच कॅन्सर रुग्णांकरिता दररोज पाच रुग्णांना प्रत्येकी २५,००० रुपयांची मदत. | २१.०५.१९७९ |
| **राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा**<br>सार्वजनिक गणेशोत्सवातील विधायकतेला प्रोत्साहन आणि पाठबळ देण्यासाठी गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना उद्युक्त करणे आणि त्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवणे. | १०.०९.१९८३ |
| **संगीत महोत्सव**<br>आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक, वादक, नर्तक यांचा प्रतिवर्षी गुढीपाडवा ते रामनवमी असा विनामूल्य संगीत महोत्सव. | ०२.०४.१९८४ |
| **चातुर्मास प्रवचन**<br>प्रतिवर्षी चातुर्मासात एक महिना ह.भ.प. बाबामहाराज सातारकर यांची प्रवचने. | १९.०७.१९८४ |
| **गणपतीनगर**<br>पुण्यात सिंहगड रस्त्यावरील वीटभट्टी कामगारांच्या १०० कुटुंबीयांसाठी घरकुले.<br>**बाल संगोपन केंद्र** | १३.०७.१९८५ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| देवदासींच्या निराधार, निराश्रित १०० बालकांसाठी पुण्यात कोंढवा परिसरात विनामूल्य शिक्षण, भोजन, निवास, समुपदेशन, संस्कार वर्गांची सोय. कागद, काच, पत्रा वेचणाऱ्या महिला भगिनींच्या २५ मुलांचे पालकत्व. | २०.१०.१९८५ |
| **पोलिओ निर्मूलन मोहीम**<br>पुणे जिल्ह्यातील दुर्ग व डोंगरी भागांतील आदिवासींच्या लसीकरणासाठी, औषधोपचारांसाठी फिरते दवाखाने. | २५.०३.१९८९ |
| **रुग्णवाहिका सेवा**<br>पुणे महापालिकेच्या हद्दीतील रुग्णांसाठी विनामूल्य रुग्णवाहिका महापालिकेच्या हद्दीबाहेरील गावांसाठी किंवा जिल्ह्यांसाठी फक्त डिझेल खर्चात रुग्णवाहिका | १८.०६.१९९० |
| **सुवर्णयुग स्पोर्ट्स क्लब**<br>आंतरराष्ट्रीय दर्जाच्या महिला कबड्डीपटू घडविण्याकरिता महिला कबड्डी संघ. | १७.१०.१९९१ |
| **आषाढी वारी वारकरी सेवा**<br>पंढरपूर आषाढी वारीतील वारकऱ्यांना फिरत्या रुग्णवाहिकेद्वारे मोफत औषधोपचार सेवा, वारकऱ्यांकरिता मोफत नेत्रतपासणी आणि चष्मेवाटप. | १६.०७.१९९२ |
| **रात्र महाविद्यालय**<br>पुण्यात सरस्वती मंदिर, कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी आणि बारावीचे रात्र महाविद्यालय. | ०१.०८.२००० |
| **पिताश्री वृद्धाश्रम**<br>पुण्यात कोंढवा येथे वृद्ध माता-पित्यांसाठी निवाऱ्याची व्यवस्था (अल्पोपाहार, भोजन, व्यायाम, वैद्यकीय तपासण्या आदींसह) | २५.०५.२००३ |
| **औद्योगिक प्रशिक्षण केंद्र**<br>ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांसाठी पुण्यात कोंढवा येथे केंद्र व राज्य सरकार मान्यता प्राप्त केंद्र. | ०१.०८.२००४ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| **श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचे विस्तारीकरण** | २२.१०.२००४ दसरा |
| **कुष्ठरोग निवारण**<br>कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसन कार्यासाठी वाहून घेतलेल्या संस्थांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढून त्यांचे कामकाज सुरळीत करणे आणि त्याद्वारे कुष्ठरोग निर्मूलनाच्या कार्याला हातभार लावणे. | मार्च २००७ |
| **ज्ञानवर्धन अभियान**<br>पुणे शहरातील प्रतिकूल परिस्थिती असलेल्या ५०० गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अभियान (शालेय साहित्य, फी, संस्कार वर्ग, समुपदेशन, मोफत वैद्यकीय सेवा, विमा संरक्षण आदी उपक्रम) | २०.०६.२०१० |
| **गणेश उत्सव विमा संरक्षण**<br>उत्सव कालावधीमध्ये पुणे शहरातील नागरिकांच्या संरक्षणासाठी ५० कोटी रुपयांचा विमा. घातपात, बॉंबस्फोट, हवाई हल्ला यासारख्या धोक्याच्या गोष्टी टाळण्यासाठी १० हजार नागरिकांना प्रत्येकी पाच लाख रुपये विमा संरक्षण. | १०.०९.२०१० |
| **शौर्य गौरव पुरस्कार**<br>भारतीय सैन्य दलातील शहीद जवानांच्या वीरमाता किंवा | २९.०१.२०११ |
| **ई-लर्निंग सुविधा**<br>पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ६५ शाळांधील विद्यार्थ्यांकरिता संगणकाच्या माध्यमातून प्रोजेक्टरद्वारे संपूर्ण शालेय अभ्यासक्रम शिकविण्याची सुविधा. | ०५.०८.२०११ |
| **शुद्ध पाण्याची व्यवस्था**<br>गामीण भागातील दूषित पाण्याची समस्या लक्षात घेता सुमारे २६ शाळांध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी जागतिक पेटंट घेतलेले शुद्ध पाण्याचे उपकरण. | ०५.०८.२०११ |
| **व्होकेशनल ज्युनिअर कॉलेज**<br>भारताच्या औद्योगिक विकासाच्या वाढीकरिता लागणारे कुशल तंत्रज्ञ बनविण्याकरिता अकरावी आणि बारावीसाठी कॉलेज. | ०९.०९.२०११ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| **मंदिर व परिसर**<br>मंदिरापासून एक किलोमीटर परिघापर्यंत मंदिर आणि नागरिकांच्या विमा संरक्षण संरक्षणासाठी वार्षिक पाच कोटी रुपयांच्या विम्याचे संरक्षण. | ०२.१२.२०११ |
| **गणपती सदन**<br>पुण्यात मंदिराच्या मागील बाजूला असलेल्या गणपती सदनात विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक संकुल विनामूल्य क्लासेस, अभ्यासिका, संस्कारवर्ग, संगणक प्रशिक्षण वर्ग, समुपदेशन आदी. | १९.०२.२०१२ |
| **आपत्ती निवारण अभियान**<br>पूर, दुष्काळ, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्ती किंवा संकटांचा मुकाबला करण्यासाठी प्रत्यक्ष मदतकार्य, समाजकार्य किंवा अन्य स्थायी स्वरूपाच्या कार्यात सहभाग घेणे किंवा ट्रस्टच्या पुढाकारानेच ते कार्य उभे करणे. | १९.०४.२०१३ |
| **रुग्ण सेवा अभियान**<br>रुग्णालयात दाखल होणाऱ्या अठराशे रुग्णांकरता दोन वेळचं भोजन, चहा, नाश्ता पुरवणे. दाखल रुग्णांच्या नातेवाइकांकरता ससूनच्या आवारात राहण्याची व्यवस्था. त्यांच्यासाठी अल्प दरात भोजन व्यवस्था. ससून प्रशासनानं सुचवलेल्या वॉर्डचे नूतनीकरण. महिला व मुलांसाठीच्या वॉर्डची नव्याने उभारणी. | ३०.०८.२०१३ |
| **निसर्ग संवर्धन**<br>संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू तुकाराम महाराज अभियान यांच्या पालखी मार्गावर वृक्षारोपण करून वारीच्या वाटांवरील पांथस्थांना दिलासा देणे. पालख्यांच्या मुक्कामांच्या ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी प्रचार-प्रसार करणे. या दृष्टीने हरितवारी आणि निर्मलवारी हे उपक्रम राबवून त्यात सक्रीय सहभाग घेणे. | २६.०८.२०१४ |
| दिवेघाट सासवड पालखी महामार्गावर ह.भ.प. श्री बाबामहाराज सातारकर यांच्या शुभहस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ | २७.०८.२०१४ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| खडकवासला धरणातील गाळ काढण्याचे काम सुरू 'जय गणेश ' जलसंवर्धन अभियान' ३०० गणेशोत्सव मंडळांचा सहभाग | २४.०५.२०१५ |
| ससूनमधील नूतनीकरण केलेल्या ५ गरोदर महिलांच्या वॉर्डसचे लोकार्पण | १९.०५.२०१६ |
| निर्मलवारी! पालखी मार्गावरील मुक्कामाची गावे पालखी प्रस्थानानंतर स्वच्छ करण्याचा निर्णय पालखी सोहळा समिती, सेवा सहयोग संख्या, चोपदार फाऊंडेशनचा व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचा संयुक्त निर्णय | ३०.०६.२०१६ |
| गणपती बीजमंत्र जप यज्ञ सोहळा (१ कोटी पंचवीस लाख जप) | १३.०६.२०१७ |
| जय गणेश हरित वारी वृक्षारोपण शुभारंभ देहूत, ५० लाख वृक्ष लावण्याचा संकल्प | १५.०६.२०१७ |
| आळंदी ते पंढरपूर पालखी मार्ग वृक्षारोपण जय गणेश हरित वारी वाल्हे पालखी तळ | २३.०६.२०१७ |
| शतकोत्तर रौप्य मोहत्सव शुभारंभ : गुरूपौर्णिमा | २०१८ |
| ससून किचन मध्ये रोटी मेकिंग अत्याधुनिक मशीन लोकार्पण – इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट तर्फे २५ व्या वर्धापन दिनानिमित्त भेट | ०२.०४.२०१९ |
| श्री मंदिरात श्री गणेश परिवार स्थापना भगवती देवी सिद्धी, भगवती देवी बुद्धी, गणेशपुत्न लक्ष आणि लाभ तसेच भगवान श्री नग्नभैरव यांची चांदी मूर्ती स्थापना | २५.०१.२०२० |
| कोरोना मदत कार्य (धान्यकोट, सॅनीटायझर वाटप, लसीकरण मदत | |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| कोविड मदत केंद्र स्थापना<br>मनसंवाद हेल्पलाईन, कोरोना काळातील मानसिक तणावमुक्तीसाठी | एप्रिल २०२०<br>२३.०७.२०२० |
| सहा मराठा बटालियनचे कर्नल विनोद पाटील यांनी ६ मराठा बटालियन काश्मिर सीमेवर असताना गुरेज सेक्टरमध्ये एक कायमस्वरूपी मंदिर त्यांच्या कॅम्पमध्ये बांधले. त्या मंदिरात दगडूशेठ बाप्पाची मूर्ती स्थापन करण्यात आली आहे. | २०१९ – २० |
| १८ मार्च २०२० ला राज्य सरकारने लॉकडाऊन जाहीर केला. त्यानंतर २३ मार्चला २०२० केंद्र सरकारने देशभर लॉकडाऊन जाहीर केले. त्यावेळी मंदिरेही दर्शनासाठी बंद करण्यात आली होती. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. उद्धवजी ठाकरे व उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांनी घेतलेल्या ऑनलाइन मिटिंगमध्ये ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे यांनाही आमंत्रित केले होते. | २२.३.२०२१<br>२० ते ३० ऑगस्ट २०२१ |
| **एकंदरीत त्यावेळच्या परिस्थितीचा आढावा घेऊन आणि करोनाच्या संकटाचे गांभिर्य लक्षात घेऊन ट्रस्टने उत्सव मंदिरातच साजरा करण्याचा निर्णय घेतला आणि १२७ वर्षे कोतवाल चावडी येथे उत्सव साजरा करण्याची परंपरा खंडित केली.** | |
| भाद्रपद चतुर्थीला श्री मंगलमूर्तीची विधीवत स्थापना मंदिरात करण्यात आली. नित्यपूजा उपचार. महाआरती, गणेशयाग, सहस्त्रावर्तन, मंत्रजागर, सत्यविनायक पूजा असे सर्व कार्यक्रम मंदिरात झाले. अनंत चतुर्दशीला मंदिरातील हौदात बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. | |
| **बाप्पांचे घरबसल्या दर्शन** : (ऑगमेंटेड रिॲलीटीच्या माध्यमातून बाप्पांचे लाईव्ह दर्शन पोहोचले)<br>करोनामुळे बाप्पांच्या दर्शनाला कोणालाही मंदिरात जाऊन दर्शन घेण्यासाठी | |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| परवानगी नव्हती. या आपत्ती काळातही बाप्पांचे दर्शन घरबसल्या भाविकांना घेता यावे यासाठी ट्रस्टचे पारगे फोटो स्टुडिओचे श्री अजय पारगे आणि श्री ऋग्वेद देशपांडे यांनी ऑगमेंटेड तंत्रज्ञानाने बाप्पांचे दर्शन घेणे शक्य केले. याचा लाभ केवळ पुण्यातील किंवा महाराष्ट्रातील नव्हे तर जगभरातील ६० देशातील भाविकांनी घेतला. या अनोख्या उपक्रमाची दखल घेतल **पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्रजी मोदी यांनी खास प्रशस्तीपत्र देऊन ट्रस्टचा गौरव केला.** | |
| करोनाच्या साधारणत सतरा महिन्याच्या काळात मंदिर बंद होते. तरीही ट्रस्टने ससूनमधील रूग्ण व अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी अशांना १४ लाख ४० हजार भोजन थाळ्या वितरीत केल्या. यात ससूनमधील रूग्णांच्या हजार ते दीड हजार नातेवाईकांचाही समावेस आहे. या काळात ट्रस्टच्या १० रूग्णवाहिकांनी रूग्णांच्या ने-आण करण्यासाठी एकूण ७४ हजार ३६१ फेऱ्या केल्या. १ हजार ७६८ रूग्णांना दवाखान्यात प्रवेश मिळवून दिला. अनेकांना उपचार खर्चात सवलत मिळवून दिली. २९५ रूग्णांना प्लाझमा मिळवून दिला. कोव्हीडने सर्वसामान्यांच्या बसलेली भिती घालवून त्यांना मानसिक आधार देण्यासाठी तज्ञांच्या मदतीने मनसंवाद ही हेल्पलाईन सुरू केली. ट्रस्टच्या एसटीडी बूथ येथे करोना मदत केंद्र सुरू केले. २७२ अधिक मंडळांच्या कार्यकत्यांनाही जय गणेश व्यासपीठच्या माध्यामातून आपत्तीकाळात मदतीसाठी रस्त्यावर उतरवले. श्रीवत्स संस्थेला ६० किलो गहू, ५० किलो तांदुळ, तूरडाळ- मूगडाळ- उडीदडाळ प्रत्येकी १५ किलो यासह जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या. मंदिर परिसरातील भटक्या प्राण्यांनाही रोज दूध देण्यात येत होते. कासेवाडीतील १००० कुटुंब, ग्रामीण आदिवासी आणि शहरातील कागदकाचपत्रा गोळा करणारी अशी एकूण ६०० कुटुंब, शंभरपेक्षा जास्त तृतीयपंथीय, पोतराज समाजातील ७० कुटुंब या सर्वांना एक महिनाभर पुरेल इतके धान्य दिले. दृष्टीहिन बांधवांनाही मदत दिली. भारती रूग्णालयासह काही रूग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना भोजनाचे किट दिले. | २२.०३.२०२० ते ३१.०८.२०२१ |
| गणेश गीत गायन स्पर्धा श्री गणेशाची नवी गीते समोर यावी, हा उद्देश | २०.०८.२०२१ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| मंदिरात हार्ट टेस्ट मशीन सुविधा - हृदयविकाराचा झटका आल्यास त्वरित उपचार देणारे मशीन | २५.१०.२०२१ |
| वृक्ष गणेशा प्रसाद गणपतीला अभिषेक करणाऱ्या भक्तांना मिळणार प्रसादरूपी रोप | ०२.०४.२०२२ |
| गाणपत्य विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद पुंड शास्त्री यांच्या सहकार्याने श्री गणेश अथर्वशीर्ष अभ्यासक्रम सुरू | ११.०५.२०२२ |
| ससून चपाती मशीन भेट व लोकार्पण -गणेशभक्त सतीश मराठे यांचा पुढाकार | १३.०६.२०२२ |
| ट्रस्टने केलेल्या सुवर्णपाळण्यात गणेशजन्म सोहळा २ किलो २८० ग्रॅम सोने | ०५.०१.२०२३ |
| **ट्रस्टच्या अध्यक्षपदी माणिकदादा चव्हाण यांची निवड** | १५.०९.२०२२ |
| श्री गणेश गीता निरूपम अभ्यासक्रम शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरू | मे २०२३ |
| **नेत्र तपासणी मोबाईल व्हॅन लोकार्पण** | ०४.०५.२०२३ |
| **पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी दगडूशेठ मंदिरात श्रींना अभिषेक व आरती** | ०१.०८.२०२३ |
| श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टचा ऐतिहासिक निर्णय प्रथमच दु. ४ वा. विसर्जन मिरवणुकीत सामील. | २८.०९.२०२३ |
| ट्रस्टच्या नियोजित धार्मिक, सामाजिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच मानवसेवेच्या उपक्रमांसाठी पुणे - सातारा रस्त्यावर | २३.०७.२०२४ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| शिवापूर टोलनाक्याजवळ गट नंबर १६८ मौजे वारवडी, ता. पुरंदर येथे ३६ एकर जागा घेतली. | |
| मोफत रक्ततपासणी केंद्र प्रारंभ १४ प्रकारच्या विनामूल्य तपासणी धनकवडी | ०४.०१.२०२४ |
| थायलंड फुकेत प्रति 'दगडूशेठ' मंदिर – गणपती बाप्पा मूर्ती पूजन, मिरवणूक व प्रस्थान | ३०.१०.२०२४ |
| गणेश भक्त श्री. ज्ञानेश भाटवडेकर यांनी कार्ला, ता. मावळ, येथील गट क्र. ७१ ही २.५ एकर जमीन देणगी म्हणून दिली. त्या जमिनीत भाताची लावणी करण्याात आली. | २१.०३.२०२५ |
| **बालाजीनगर मोफत आरोग्य सेवा केंद्र**<br>मोफत नेत्र तपासणी (मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया), रक्त तपासणी | ०१.०१.२०२४ |
| **मोफत दंत तपासणी व्हॅन**<br>ट्रस्टच्या वतीने पुणे शहर तसेच पुणे जिल्ह्यातील नागरिकांची व शालेय विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी व त्या माध्यमातून विविध दंत उपचार | ०४.१२.२०२४ |
| **मोफत आरोग्य सेवा केंद्र**<br>हिराबाग कोटी येथे मोफत आरोग्य सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात रक्त तपासणी, दंत तपासणी, डोळे तपासणी, रक्तदाब तपासणी, हृदय ईसीजी तपासणी, आयुर्वेदिक उपचार, ॲक्युप्रेशर थेरपी,ॲक्युपंक्चरथेरपी, फिजीओथेरपी उपचार, मोफत औषधोपचार | १९.०४.२०२६ |
| **मोफत श्रवणक्षमता तपासणी व्हॅन**<br>ट्रस्टच्या वतीने शहराच्या विविध ठिकाणी मोफत श्रवणक्षमता तपासणी शिबिर व त्या माध्यमातून गरजू नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना मोफत श्रवणयंत्र वाटप | १९.०४.२०२६ |

| उपक्रमाचे नाव / उद्देश | प्रारंभ वर्ष |
|---|---|
| **मोफत फिरता दवाखाना व्हॅन**<br>श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट आणि अंजनी माशेलकर फांऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत फिरता दवाखाना व्हॅनच्या माध्यमातून एआय मशीनद्वारे फुल बॉडी चेकअप | २३.०५.२०२६ |

## गणेश पूजनात वापरण्यात येणाऱ्या २१ पत्री

| | | |
|---|---|---|
| १. मधु–मालती | ८. आघाडा | १५. अर्जुन सादडा |
| २. माका | ९. शमी किंवा सोन्दड | १६. विष्णुक्रांता / शंखपुष्पी |
| ३. बेल | १०. केवडा | १७. डाळिंब |
| ४. दुर्वा | ११. डोरली | १८. मरवा |
| ५. बोर | १२. कण्हेर | १९. पिंपळ |
| ६. धोत्राक | १३. आपटा | २०. जाई |
| ७. तुळस | १४. रूई किंवा मंदार | २१. हादगा |





॥ ॐ गं गणपतये नमः ॥

॥ आर्शिर्वचनम् ॥

आमंत्रक सद्भक्त, ..................

सुमंगल शुभाशीश !

अपार भावभक्तीत भिजलेलं, काळजातल्या श्रध्देने सजलेलं, आयोजित शुभकार्याचं आपलं अगत्याचं आमंत्रण प्राप्त झालं.

मी, शिव-गौरीनंदन, पाशांकुशधर श्रीमंत दगडूशेठ गणपती, ऋध्दी, सिध्दी आणि माझ्या समस्त प्रिय गणांसह कार्यस्थळी असणार आहे, वधू वराच्या उमलत्या सहजीवनावर मांगल्याचा वर्षाव करण्यासाठी !

घेऊन येणार आहे आनंदाचं आकाश, धन्यतेची धरती, समृध्दीचा सागर,....सौख्य-समाधानाचा दरवळता जीवनसुगंध. प्रदान करणार आहे मानव सेवेची उदंड कार्यक्षमता आणि दहा दिशांच्या कलशातून देणार आहे अक्षय साफल्याचं अमृतमय शुभवरदान !

शुभकार्यम् निर्विघ्नम् भवतु !! कल्याणमस्तु !!!

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई**
**सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे**

'गणपती भवन', २५०, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ | 'गणपती सदन', १३२, बुधवार पेठ, पुणे - ४११००२
दूरध्वनी : कार्यालय : २४४७ १२२२, २४४३ ०५२७ | दूरध्वनी : २४४९२०००, २४४९८९८९
Website : www.dagdushethganpati.com Email : contact@dhgt.in

**गणेश भक्तांनी श्रध्देने बाप्पांना दिलेल्या लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेसाठी ट्रस्टच्या वतीने विवाह सोहळयानिमित्त खास बाप्पांचे आशीर्वाद पत्र भक्तांना पाठविण्यात येते.**

## -: ✻ जय गणेश रुग्णसेवा अभियान ✻ :-
## वार्षिक शिबिर आयोजित २०२५-२०२६

१) ज्येष्ठ नागरिक मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर-४ ऑक्टोबर २०२५

२) वय ० ते ६ वर्षे मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर-३१ जानेवारी २०२६

३) ज्येष्ठ नागरिक मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर - ३० जानेवारी २०२६

४) दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव आणि उपकरणे वाटप शिबीर-
२५ जाने २०२६ ते ३१ जाने २०२६

५) दिव्यांग व्यक्तींना मोफत काठ्या वाटप (हिंद दी चादर) खारघर,
मुंबई-२८ फेब्रु २०२६ आणि २९ फेब्रु २०२६

६) दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम स्वयंचलित हात वाटप शिबीर-
१५ फेब्रुवारी २०२६

७) जागतिक होमिओपॅथी दिन कार्यक्रम- १० एप्रिल २०२६

८) ज्येष्ठ नागरिक मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर-१३ एप्रिल २०२६

९) मोफत आरोग्य सेवा केंद्र शुभारंभ (हिराबाग कोठी) १९ एप्रिल २०२६

१०) महा-आरोग्य शिबीर - २३ मे २०२६

११) ज्येष्ठ नागरिक मोफत श्रवणयंत्र वाटप शिबीर-१९ जून २०२६

१२) पुणे मुक्कामी पालखी शिबीर - १० जुलै २०२६

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट पुणे**
**जय गणेश रुग्णसेवा अभियान अंतर्गत संस्थेस मोफत वैद्यकीय सेवा**
**देणाऱ्या रुग्णालयांची नावे खालीलप्रमाणे**

१) सूर्या सह्याद्री हॉस्पिटल कसबा पेठ पुणे.
मोफत ह्रदय आजार/कॅन्सर आजार शस्त्रक्रिया व उपचार.

२) देवयानी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल कोथरुड पुणे
मोफत ह्रदय आजार विविध शस्त्रक्रिया.

३) मणिपाल हॉस्पिटल बाणेर पुणे.
(७००० रुपये मध्ये पेट सीटी स्कॅन सुविधा.)

४) रुबी हॉल क्लिनिक पुणे
मोफत लहान मुलांच्या ह्रदय शस्त्रक्रिया / रेडीएशन/पेट सीटी स्कॅन

५) जहांगीर हॉस्पिटल पुणे
लहान मुलांच्या मोफत ह्रदय शस्त्रक्रिया.

६) सिल्व्हर बर्च मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सिंहगड रोड पुणे.
मोफत ह्रदय आजार/अस्थिरोग शस्त्रक्रिया/किडनी स्टोन/प्रोस्टेट ग्रंथी

७) इनलॅक्स बुधरानी हॉस्पिटल कोरेगाव पार्क पुणे
वय वर्ष ० ते १८ असलेल्या मुलांची मोफत ह्रदय शस्त्रक्रिया.

८) आदित्य बिर्ला मेमोरीयल हॉस्पिटल चिंचवड पुणे
मोफत कॅन्सर रेडीएशन/माफक दरात पेट स्कॅन / लहान मुलांच्या शस्त्रक्रिया.

९) भारती हॉस्पिटल रीसर्च सेंटर धनकवडी पुणे
मोफत ह्रदय आजार/कॅन्सर आजार/किडनी स्टोन/प्रोस्टेट ग्रंथी सर्जरी.

१०) ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे.
मोफत विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया.

११) एम्स हॉस्पिटल रीसर्च सेंटर औंध पुणे
मोफत ह्रदय आजार शस्त्रक्रिया.

१२) डॉ. डी वाय पाटील हॉस्पिटल पिंपरी पुणे
आरोग्य शिबिरासाठी मोफत वैद्यकिय पथक

१३) इंद्रायणी हॉस्पिटल रीसर्च सेंटर आळंदी रोड पुणे
मोफत कॅन्सर आजार रेडीएशन.

१४) सरदार वल्लभभाई पटेल हॉस्पिटल, गोळीबार मैदान समोर पुणे
मोफत जनरल आणि खुबा प्रत्यारोपण, हर्निया सर्जरी.

१५) क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटर पुणे.
शासकीय दरात रक्त तपासणी, एम आर आय, सीटी स्कॅन, एक्सरे, सोनोग्राफी.

१६) संचेती हॉस्पिटल शिवाजीनगर पुणे
आरोग्य शिबिरासाठी वैद्यकीय पथक.

१७) सत्यसाई सेवा ऑर्गनायझेशन पुणे मोफत नेत्र आजार विविध शस्त्रक्रिया.

१८) तेजोमयी आय केअर सेंटर कर्वेनगर पुणे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया.

१९) व्हीजन नेक्सट आय केअर सेंटर बोपोडी पुणे मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रिया.

२०) लायन्स क्लब ऑफ कात्रज पुणे मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया.

२१) रेणुका नेत्रालय पुणे मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया.

२२) सूर्योदय फाऊंडेशन मुंबई (पदमश्री अनुराधाताई पौडवाल) मोफत श्रवणयंत्र वाटप सुविधा.

२३) पिनॅकल इंडस्ट्रीज लिमिटेड पुणे मोफत कृत्रिम अवयव उपकरणे वाटप सुविधा.

२४) सिंहगड दंत महाविद्यालय वडगाव बुद्रक पुणे मोफत दंत उपचार सुविधा.

२५) अंजनी माशेलकर फाऊंडेशन पुणे मोफत विविध प्रकारच्या तपासण्या सुविधा.

२६) ऑरा स्माईल डेंटल सेंटर मोफत दंत तपासणी व उपचार.

२७) आय आय एम एस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बाणेर पुणे मोफत विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया.

२८) लोपामुद्रा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल शंकरशेठ रोड पुणे ५० टक्के सवलत दरात महिला प्रसूती सुविधा.

२९) ॲलीम्को कंपनी दिल्ली

९० प्रकारचे दिव्यांग उपकरणे साहित्य वाटप सुविधा.

३०) भारती विद्यापीठ ऑडीओमॅट्री स्पीचथेरपी विभाग कर्णबधिरांसाठी श्रवण क्षमता तपासणी मोफत सुविधा

३१) भारती विद्यापीठ नर्सिंग विभाग.
आरोग्य सेवा केंद्रात व शिबिरासाठी मोफत नर्सिंग वैद्यकीय पथक सुविधा

३२) अपोलो हॉस्पिटल शंकर शेठ रोड पुणे माफक दरात पेट स्कॅन व सर्जरी सुविधा

३३) आपुलकी हॉस्पिटल बाणेर पुणे
७५०० रुपये मध्ये पेट स्कॅन आणि अन्य तपासणी माफक दरात सुविधा

३४) कदम डायग्नोस्टीक सेंटर हिराबाग पुणे

७५०० रुपये मध्ये पेट स्कॅन सुविधा
३५) एन एम डायग्नोस्टीक सेंटर
९००० रुपये मध्ये पेट स्कॅन तपासणी
३६) स्पेक्ट लॅब बावधन पुणे माफक दरात पेट स्कॅन व अन्य तपासणी सुविधा
३७) सह्याद्री स्पेशालिटी हॉस्पिटल हडपसर पुणे
९००० रुपये मध्ये पेट स्कॅन तपासणी
३८) इनाली फाउंडेशन तळेगाव दाभाडे पुणे कृत्रीम स्वयंचलित हात वाटप सुविधा.
३९) उप संचालक आरोग्य सेवा पुणे मंडळ गणेशोत्सवात मोफत आयसीयू बेड सुविधा.
४०) गोळिवलकर मेट्रोपोलिक्स लॅब भांडारकर रोड
५० टक्के सवलत दरात सर्व तपासणी सुविधा.
४१) विघ्नहर्ता पॅथलॅब पुणे
५० टक्के दरात रक्त तपासणी सुविधा,
४२) अलायन्स क्लब ऑफ पुणे
मोफत नेत्र तपासणी/शस्त्रक्रिया / चष्मे वाटप सुविधा.
४३) ईटीग्रेटेड कॅन्सर रीसर्च सेंटर वाघोली पुणे मोफत कॅन्सर आजार सर्जरी उपचार
४४) एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय हडपसर पुणे मोफत नेत्र तपासणी आणि विविध नेत्र आजार शस्त्रक्रिया
४५) पटवर्धन क्लिनिक पर्वतीगाव पुणे
मोफत ओपीडी आणि शस्त्रक्रिया करिता फिटनेस सर्टीफिकेट सुविधा.
४६) ए.एस.जी आय हॉस्पिटल शिवाजीनगर पुणे आरोग्य शिबिरात मोफत नेत्र तपासणी सुविधा.
४७) देशपांडे आय केअर सेंटर कोथरुड पुणे
मोफत नेत्र तपासणी आणि नेत्र आजार शस्त्रक्रिया.
४८) पुणे मनपा आरोग्य विभाग.
आरोग्य वर्धिनी केंद्र/आपला दवाखाना प्रकल्प सुविधा
४९) ज्युपिटर हॉस्पिटल बाणेर पुणे
लहान बालकांच्या मोफत काक्लियर इंप्लांट सर्जरी सुविधा
५०) सिंबायोसिस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल लवळे पुणे
मोफत जनरल सर्जरी सुविधा
५१) स्व. नाना पालकर स्मृती चिकित्सालय येरवडा पुणे
मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रिया सुविधा
५२) अथश्री आयुर्वेद चिकित्सालय पुणे
मोफत आयुर्वेदीक उपचार ओपीडी
५३) श्री विश्वहित आयुर्वेदीक चिकिसालय पुणे
मोफत आयुर्वेदीक उपचार
५४) लोकमान्य हॉस्पिटल एस बी रोड पुणे
लहान मुलांच्या मोफत हृदय शस्त्रक्रिया
५५) संजीवन होमिओपॅथिक क्लिनिक पुणे
मोफत होमिओपॅथिक उपचार सुविधा
५६) गॅलेक्सी आय केअर हॉस्पिटल जंगली महाराज रोड
मोफत नेत्र आजार शस्त्रक्रिया
५७) मोफत ॲक्युप्रेशर व ॲक्युपंक्चर सुविधा.
डॉ आशिष राठी (आरोग्य सेवा केंद्र हिराबाग कोठी)
५८) निर्मय आयुर्वेदा सेंटर धनकवडी पुणे
मोफत ॲक्युप्रेशर फिजिओथेरपी सुविधा.
५९) मॉर्डन कॉलेज ऑफ फिजिओथेरपी शिवाजीनगर पुणे
फिजिओथेरपी मोफत सुविधा
६०) फर्ग्युसन कॉलेज ऑफ फिजिओथेरपी शिवाजीनगर पुणे
फिजिओथेरपी मोफत सुविधा
६१) हेल्थ होरीजन डायनोस्टीक शिवाजीनगर पुणे
आरोग्य शिबिरात मोफत रक्त तपासणी
६२) श्रीमती काशिबाई नवले हॉस्पिटल नऱ्हे, पुणे
मोफत विविध जनरल सर्जरी
६३) पर्वती जनरल ॲक्सिडेंट हॉस्पिटल पर्वतीगाव पुणे
सवलतीच्या दरात अस्थिरोग शस्त्रक्रिया
६४) बॉडीफाय बिईंग वेलनेस सेंटर
अत्याधुनिक यंत्र द्वारे मोफत ॲक्युप्रेशर उपचार
६५) बाळासाहेब देवरस हॉस्पिटल कोंढवा रोड पुणे
माफक दरात वैद्यकिय उपचार सुविधा
६६) डायग्नोपेन डायग्नोस्टीक सेंटर पुणे
माफक दरात सर्व तपासण्या

६७) अॅकॉड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मोशी पुणे
मोफत हृदय आजार शस्त्रक्रिया
६८) ओरा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अंबेगाव बुद्रक, कात्रज
५० टक्के सवलत दरात सर्जरी
६९) गिरीराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बारामती पुणे
मोफत विविध हृदय आजार सर्जरी
७०) सद्‌गुरू शंकर महाराज मठ
अन्नछत्र वैद्यकीय समिती धनकवडी
आरोग्य शिबिरात मोफत वैद्यकीय पथक
७१) महावीर आय हॉस्पिटल कॅम्प पुणे
मोफत नेत्र आजार शस्त्रक्रिया
७२) शांतीबन पॅरालिसिस केअर सेंटर पुणे
५० टक्के सवलत दरात पॅरालिसिस उपचार
७३) प्लॅटीनम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल वारजे माळवाडी पुणे
मोफत एन आयसीयु बेड सुविधा.
७४) विस्डम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बाणेर पुणे
मोफत विविध हृदय शस्त्रक्रिया सुविधा
७५) युनिवर्सल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल कसबा पेठ पुणे
मोफत विविध प्रकारच्या जनरल सुविधा.
७६) कृष्णा हॉस्पिटल, पौड रोड कोथरुड पुणे
मोफत डायलिसिस सुविधा
७७) शाश्वत हॉस्पिटल कर्वेनगर पुणे
मोफत डायलिसिस सुविधा
७८) संजीवनी हॉस्पिटल उत्तमनगर पुणे
मोफत नेत्र आजार शस्त्रक्रिया
७९) संजीवनी ब्लड बँक भोसरी पुणे
५० टक्के सवलत दरात रक्त पिशवी
८०) एम जे डायलिसिस सेंटर कोथरुड पुणे
मोफत डायलिसिस सुविधा
८१) वेट फॉर पेट्स पुणे पाळीव जनावरांचे
मोफत उपचार

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट, पुणे**
**जय गणेश रुग्णसेवा अभियान**
**मोफत आरोग्य सेवा केंद्र विशेष सहकार्य व देणगीदार**

१) आरोग्य विभाग, मनपा पुणे.
**(आयुष्यमान भारत योजना)**

२) डॉ. अंबरीश दरक सर
**(संचालक व्हीजन नेक्स्ट आय केअर, पुणे) आय चेकअप मशिन**

३) क्रस्ना डायग्नोस्टिक, पुणे
**मोफत रक्त तपासणी सुविधा**

४) पिनॅकल इंडस्ट्रिज लि, पुणे
**ऑडिओमेट्री व्हॅन सेटअप**

५) पिनॅकल इंडस्ट्रिज लि. पुणे
**ऑडिओमेट्री मशिन**

६) बँक ऑफ इंडिया, पुणे
**ऑडिओमेट्री मशिन**

७) डॉ. अतुल पाटील सर
**ई सी जी मशिन**

८) मा. वैभव पंडित वाघ सर, पुणे
**ई सी जी मशिन**

९) डॉ. शुभम मुंडे, डॉ. विश्वेश ठाकरे, डॉ. सोमेश माने
**डेंटल स्कॅन ए आय मशिन**

१०) अंजनी माशेलकर फाऊंडेशन
**फुल बॉडी चेकअप ए आय मशिन**

# श्री गणेश हृदयस्तोत्र !

भगवान श्री गणेशांना यथार्थ रीतीने समजून घेण्याचे सर्वोपरी श्रेष्ठ साधन म्हणजे श्री मुद्गल पुराण. श्री मुदगल पुराणाच्या ८ व्या खंडातील ४९ व्या अध्यायामध्ये भगवान श्री शंकर तथा देवी गंगेच्या संवादातून हे स्तोत्र जगासमोर प्रगट झाले आहे. किती सुंदर नाव आहे या स्तोत्राचे? श्री गणेश हृदय स्तोत्र. जणू काही भगवान श्री गणेशांचे हृदय म्हणजे रहस्य उलगडून दाखविणारे स्तोत्र म्हणून श्री गणेश हृदय स्तोत्र. तसेच आपल्या हृदयामध्ये मोरयाला सुस्थापित करणारे स्तोत्र म्हणून श्री गणेश हृदय स्तोत्र. स्तोत्राचे वक्ते आहेत भगवान शंकर. शंकर शब्दाचा अर्थच आहे कल्याण करणारे. या स्तोत्राच्या माध्यमातून भगवान शंकरांनी विश्वाच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त केलेला आहे.

स्तोत्राची श्रोता आहे देवी गंगा. श्रोता कसा असावा? तर देवी गंगेप्रमाणे. स्वच्छ, पवित्र आणि प्रवाही. त्या गंगेने भगवान शंकरांना प्रश्न केला,

वद शङ्कर कस्य त्वं ध्यानं करोषि नित्यदा ।
इच्छामि तमहं ज्ञातूं त्वत्तः किं परमं मतम्

अर्थात हे भगवान शंकरा ! आपण कोणाचे ध्यान करता? आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोण आहे ? ते जाणून घेण्याची मला इच्छा आहे. वास्तविक देवी गंगा भगवान शंकरांच्या मस्तकावर निवास करते. मात्र मस्तकाच्या इतक्या जवळ असून देखील त्या मस्तकाच्या आत काय सुरू आहे? ते तिला समजू शकत नाही. त्यामुळे तिने हा प्रश्न केला आहे त्यावर भगवान शंकर म्हणतात,

गणेशं देवदेवेशं ब्रह्मब्रह्मेशमादरातब । ध्यायामि सर्वभावज्ञे
कुलदेवं सनातनम् ।

हे सर्व भाव जाणणाऱ्या देवी गंगे ! सर्व ब्रह्मांचेही ब्रह्म असणाऱ्या, देव देवेश अशा भगवान गणेशांचे मी ध्यान करीत असतो. ते आपले सगळ्यांचे सनातन कुलदेव आहेत.

तस्य यद् हृदयं देवि गुप्तं सर्वप्रदायकम् ।
कथयिष्यामि सर्वज्ञे येन ज्ञास्यसि तं विभुम्

हे देवी ! त्यांचे जे हृदय म्हणजे हे श्री गणेश हृदय नावाचे स्तोत्र मी तुला सांगतो. हे अत्यंत गुप्त अर्थात मौल्यवान असून सर्व प्रकारचे मनोवांछित फल प्रदान करणारे आहे. असे म्हणून या स्तोत्राचे छंद न्यास इत्यादी गोष्टी सांगितल्यानंतर भगवान शंकरांनी तिला श्री गणेशांच्या एकवीस नावांचा उपदेश केला.

ॐ गणेशमेकदन्तं च चिन्तामणिं विनायकम् । दुण्ढिराजं मयूरेशं लम्बोदरं गजाननम्
हेरम्बं वक्रतुण्डं च ज्येष्ठराजं निजस्थितम् । आशापूरं तु वरदं विकटं धरणीधरम्
सिद्धिबुद्धिपतिं वन्दे ब्रह्मणस्पतिसंज्ञितम् । माङ्गल्येशं सर्वपूज्यं विघ्नानां नायकं परम्

या एकवीस नावांचे त्यांच्या अर्थासह चिंतन करणे हे गणेश हृदयाचे उद्दिष्ट.

स्वाभाविकच देवी गंगेने भगवान शंकरांना त्या प्रत्येक नावाचा शास्त्रीय अर्थ विचारला. त्यावर भगवान शंकरांनी तिला जे अर्थ सांगितले ते क्रमशः....

**गाणेश ज्ञान प्रबोधक**
**प्रा. डॉ. स्वानंद गजानन पुंड**

### १) श्री गणेश !

श्री गणेश हृदय स्तोत्रातील मोरयाचे पहिले नाव म्हणजे श्री गणेश. गणेश,गणपती, गणाधीश, गणनायक, गणाध्यक्ष अशा विविध नावांनी आपण मोरयाला आळवतो. पण नेमका काय अर्थ आहे या नावांचा? तुम्ही म्हणाल हा काय प्रश्न आहे का? शंकरांच्या गणांचा प्रमुख म्हणून गणेश, गणपती. सामान्यतः आपल्याला ऐकून हाच अर्थ माहिती असतो पण हा वास्तव आहे का? केवळ एवढाच अर्थ कसा असेल असा आपण कधी विचार तरी केला आहे का? कधीकाळी या देशात शैव आणि वैष्णव यांच्यात प्रचंड वाद होता. पण त्या काळात सुद्धा वैष्णवांनाच नव्हे तर शाक्त, सौर, पाशुपत या सगळ्यांनाच भगवान श्री गणेश आदिपूज्य होते. जर ते केवळ शिवगणांचे प्रमुख असते तर वैष्णवांनी त्यांना आद्य पूजेचा मान दिला असता का ? मुळात भगवान महादेव असणाऱ्या शंकरांना सोडून त्यांच्या एखाद्या गणाच्या प्रमुखाला आद्य पूजेचा मान असू शकतो का? मात्र तो सनातन काळापासून सुरू आहे ही तर वस्तुस्थिती आहे. मग ते सर्वपूज्यत्व, सर्वादिपूज्यत्व शिवपुत्र, पार्वती नंदनाचे नसेल तर कोणत्या गणेशाचे आहे ? नेमके हेच रहस्य देवी गंगेला सांगताना भगवान शंकर पहिल्या नावाचा दिव्य अर्थ उलगडत आहेत. ते म्हणतात,

गकाररूपं विविधं चराचरं णकारगं ब्रह्म तथा परात्परम् ।
तयोः स्थितास्तस्य गणाः प्रकीर्तिताः
गणेशमेकं प्रणमाम्यहं परम् ॥

गण शब्दांमध्ये ग आणि ण अशी दोन अक्षरे आहेत. भगवान शंकर म्हणतात ग या अक्षराचा अर्थ म्हणजे हे विविध चराचर म्हणजे सगुण साकार विश्व त्यामध्ये असणारे सर्व चर म्हणजे हलू शकणारे आणि अचर म्हणजे हलू न शकणारे सर्व घटक म्हणजे ग तसेच ण अक्षराचा अर्थ सांगताना ते म्हणतात, या सर्व प्रकृतीच्या आतमध्ये असणारे जे परात्पर म्हणजे श्रेष्ठ असे ब्रह्म अर्थात चैतन्य त्यालाच ण असे म्हणतात. व्यक्तिगत पातळीवर सगुण साकार असणारा देह म्हणजे ग आणि त्याच्या आतमध्ये असणारा जीवात्मा म्हणजे ण. तर समष्टीच्या पातळीवर अनंत कोटी ब्रह्मांड म्हणजे ग तर त्यांचे संचालन करणारे विष्णू, शंकरादिक ब्रह्म स्वरूपात वर्णन केलेले सर्व ईश्वर महेश्वर हे ण. अर्थात समस्त सगुण साकार प्रकृती म्हणजे ग. तर त्या प्रकृतीचे संचालन, नियमन करणारे निर्गुण, निराकार चैतन्य म्हणजे ण. या दोन्हींना एकत्रित स्वरूपात म्हणतात गण. तयोः अर्थात या दोन्ही अवस्थांमध्ये असणारे चैतन्य म्हणजे गण. भारतीय दर्शनाच्या दृष्टीने आपल्याला जे जड वाटते ते देखील मूलतः चैतन्यच आहे. आपल्याला त्यातील स्पंदनांची जाणीव होत नसल्याने आपण त्याला जड म्हणतो. आपल्याला त्यातील चैतन्य तत्त्वाची अनुभूती येत नसल्याने, त्या अर्थाने त्याला अव्यक्त म्हटले आहे. असे जडामध्ये असणारे अव्यक्त अर्थात सहजासहजी न समजणारे तथा संचालक स्वरूपात व्यक्त असणारे चैतन्य यांना एकत्रित स्वरूपात ग-ण असे म्हणतात.

अशा गणांचा संचालक असणारा मोरया गणेश असतो. त्या एकमेवाद्वितीय, सर्वश्रेष्ठ असणाऱ्या श्री गणेशांना मी प्रणाम करतो असे म्हणत ,आपण ज्या ओंकार रूप परब्रह्म परमात्म स्वरुप श्री गणेशांचे

ध्यान करतो ते भगवान शंकर उलगडून दाखवत आहेत.

## २) श्री एकदंत

भगवान श्री गणेशांच्या ज्या अनेक नावांचा आपल्याला निश्चितपणे परिचय असतो त्यापैकी एक नाव एकदंत. काय अर्थ आहे एकदंत शब्दाचा ? आपण पटकन म्हणाल की मोरयाचा एक दात तुटलेला आहे म्हणून त्यांना एकदंत म्हणतात. पण आपण कधी विचार केलेला आहे का? की जर मोरयाचा एक दात पूर्ण आहे आणि एक दात अर्धा तुटलेला आहे तर त्यांना खरे तर दीड दंत म्हणायला हवे ना. पण तरी त्यांना आपण एकदंत म्हणतो. आपणच नव्हे तर शास्त्र एकदंत म्हणते. मात्र शास्त्र ज्यावेळी एकदंत शब्द वापरते त्यावेळी त्यांना हा बाहेरच्या दोन दातांपैकी एकाचा आकार इतका वरपांगी अर्थ अपेक्षित नसतो. शास्त्राने एकदंत शब्दाचा फारच वेगळ्या पातळीवर विचार केलेला आहे. तो अर्थ देवी गंगेला सांगताना भगवान शंकर म्हणतात,

मायास्वरूपं तु सदैकवाचकं दन्तः परो मायिकरूपधारकः ।
योगे तयोरेकरदं सुमानिनि धीस्थं नतोऽहं जनभक्तिलालसम् ॥

एक शब्द मायेसाठी वापरला जातो. तिला एका असे म्हणतात.
अजामेकांलोहितशुक्लकृष्णाम् !
अशा शब्दात तिचे वर्णन केले जाते. सत्व, रज आणि तम या तीन गुणांची जी एकात्म साम्यावस्था तिला म्हणतात एका. तिलाच म्हणतात मूलमाया. प्रकृती. त्या मायेला नियंत्रित करणारे चालवणारे अर्थात तिच्यावर सत्ता गाजविणारे जे चैतन्य त्याला दंत असे म्हणतात. शास्त्रामध्ये दंत हा शब्द शक्तीचा क्षमतांचा प्रतीक आहे. आपल्या जीवनात सुद्धा बालपणी ताकद नव्हती तेव्हा दात नव्हते आणि म्हातारपणी ताकद नसते तेव्हाही दात राहत नाहीत. त्याचप्रमाणे एखादी गोष्ट जोर लावून, ताकद लावून करायची असेल तर आपण दात आवळतो यातून दाताचा आणि शक्तीचा संबंध स्पष्ट होऊ शकेल.

यानिमित्ताने एक उपप्रश्न. मोरयाचा एक दात तुटलेला आहे. पण कोणता ? डावा की उजवा? शास्त्राने उत्तर दिले डावा दात तुटलेला हवा. उजवा पूर्ण हवा. दाताचा शक्तीशी असलेला संबंध पाहिल्यावर यातून किती सुंदर अर्थ समोर येतो की ज्या मोरया समोर आल्यानंतर सर्व डाव्या म्हणजे गौण गोष्टी, गौण सत्ता खंडित होतात ते एकदंत. भगवान शंकर म्हणतात हे मानिनी ! देवी गंगे !अशा स्वरूपात एका असणारी माया आणि तिच्यावर सत्ता चालवणारे चैतन्य या दोन्हींचे एकत्रीकरण ज्या मोरयाच्या ठिकाणी असते त्याला एकदंत असे म्हणतात. भक्तांच्या भक्तीची लालसा असणाऱ्या अर्थात त्याने प्रसन्न होणाऱ्या त्या मोरयाला भगवान शंकर धीस्थ म्हणजे बुद्धीमध्ये निवास करणारा असे म्हणत आहेत. त्या बुद्धिस्थ असणाऱ्या बुद्धिपतीला मी नमन करतो असे ते सांगत आहेत.

## ३) श्री चिंतामणी

भगवान श्री गणेशांचे एक अत्यंत सुंदर नाव म्हणजे श्री चिंतामणी. आपल्या मनातील सर्व चिंता दूर करतो तो चिंतामणी किंवा आपल्या चिंतनातील सर्व गोष्टी आपल्याला प्रदान करतो तो चिंतामणी. असा सामान्यपणे या शब्दाचा अर्थ सर्वांना ज्ञात असतो. हे अर्थ तर आहेतच. मोरयाच्या चरणी सर्व चिंता दूर होतात आणि चिंतिलेले सर्व प्राप्त होते यात शंका नाहीच. भगवान श्री ब्रह्मदेवांच्या चित्ताला आलेली अस्थिरता दूर करण्यासाठी त्यांनी चित्त स्थिर करणाऱ्या म्हणून स्थावर अर्थात थेऊर क्षेत्राला केलेली गणेश उपासना असो किंवा गौतमांच्या शापाने प्राप्त झालेल्या दोषातून दूर होण्याची चित्तातील इच्छा पूर्ण करण्यासाठी देवराज इंद्रांनी श्रीक्षेत्र कळंब येथे केलेली उपासना असो, या दोन्ही स्थानी याच कारणाने मोरयाचे नाव चिंतामणी आहे. मात्र भगवान शंकर केवळ एवढाच अर्थ न देता एक अत्यंत दिव्य अर्थ स्पष्ट करीत आहेत. ते देवी गंगेला म्हणतात,

चित्तप्रकाशं विविधेषु संस्थं लिप्तं न लेपादि विवर्जितं तम् ।
भोगैर्विहीनं त्वथ भोगकारकं चिन्तामणिं तं प्रणमामि नित्यम् ॥

शास्त्राने वर्णन केलेल्या पाच प्रकारच्या चित्तांमध्ये राहून त्याची त्यांना प्रकाशित करणारा मात्र त्यातील कोणत्याही गुण किंवा दोषांच्या लेपाने लिप्त न होता, भोगविहीन स्वरूपात सर्व भोगांचा आस्वाद घेणाऱ्या त्या चिंतामणींना मी नित्य प्रणाम करतो. यामध्ये दोन गोष्टी विशेषत्वाने समजून घ्यायच्या आहेत. शास्त्राने क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र आणि निरोध अशा चित्ताच्या पाच अवस्था वर्णन केलेल्या आहेत. सुखाच्या इच्छेने संसारात बाहेर सर्वत्र पसरलेल्या चित्ताला क्षिप्त असे म्हणतात. संसारातून अनेक प्रयत्नाने देखील शाश्वत सुख मिळत नाही म्हटल्यानंतर आता करायचे काय ? या स्वरूपात काही समजेनासे झालेल्या चित्ताला मूढ असे म्हणतात. त्यामुळे संसारातून बाहेर पडणाऱ्या वैराग्य वृत्तीच्या चित्ताला विक्षिप्त असे म्हणतात. हे चित्त जेव्हा शाश्वत सुखासाठी भगवंताच्या चरणी लीन होते तेव्हा त्याला एकाग्र असे म्हणतात. जेव्हा या चरणांशिवाय अन्यत्र कुठेही सुख मिळूच शकत नाही या ठाम विश्वासाने ते तेथेच दृढ राहते त्यावेळी त्याला निरोध चित्त असे म्हणतात. या पाचही प्रकारच्या चित्तांच्या अवस्थांना जे प्रकाशित करतात त्यांना चिंतामणी असे म्हणतात. या सर्वच अवस्थांमध्ये प्राप्त होणाऱ्या आस्वादांचा ते भोग घेतात मात्र यापैकी कोणत्याही भोगाची त्यांना आसक्ती नसल्याने ते भोग रहित आहेत असे भगवान शंकर सांगत आहेत. भगवान श्री गणेश चिंतामणी स्वरूपात या सर्व चित्तांचे प्रकाशक असले तरी त्या चित्तवृत्तींच्या माध्यमातून ज्या गुणांचा किंवा दोषांचा आस्वाद साधक घेतो त्यापैकी कशाचाही लेप भगवंताला लागत नाही. अर्थात चांगल्या अनुभवांची पुनरुक्ती व्हावी किंवा वाईट अनुभव पुन्हा येऊ नये अशी कोणतीच भावना त्यांच्या ठिकाणी नसल्याने केवळ साक्षी स्वरूपात या सर्व गोष्टींचा आधार असतात श्री चिंतामणी.

## ४) श्री विनायक

देवी गंगेला श्री गणेश हृदय स्तोत्राचा उपदेश करताना भगवान श्री शंकरांनी सांगितलेले पुढील नाव म्हणजे श्री विनायक. भगवान श्री शंकर या नावाचा दोन प्रकारे अर्थ सांगतात. ते म्हणतात,

विनायकं नायकवर्जितं प्रिये विशेषतो नायकमीश्वरात्मनाम् ।
निरङ्कुशं तं प्रणमामि सर्वदं सदात्मकं भावयुतेन चेतसा ॥

विनायक शब्दामध्ये नायक शब्दाच्या मागे वि हा उपसर्ग लागलेला आहे. संस्कृत भाषेत वि उपसर्गाचा

दोन प्रकारे अर्थ होत असल्याने येथे देखील ते दोन्ही अर्थ लागू होतात. वि उपसर्गाचा पहिला अर्थ आहे विगत म्हणजे गळून पडणे, निघून जाणे. बिभीषण किंवा विदर्भ शब्दांमध्ये हा अर्थ पहावयास मिळतो. ज्याच्या मधून सर्व प्रकारचे भीषणत्व गळून गेले आहे, तो अत्यंत शांत, प्रसन्न विभीषण. त्याचप्रमाणे जिथून दर्भ नावाचे गवत पूर्णपणे निघून गेले आहे अर्थात जेथील सर्व जमीन शेतीच्या उपयुक्त आहे तो विदर्भ. अर्थात पुढे वर्णन केलेल्या गोष्टींनी विरहित या अर्थाने हा वि उपसर्ग आहे.

विनायक शब्दाचा अर्थ सांगताना भगवान श्री शंकर म्हणतात की हे प्रिय गंगे ! भगवान श्री गणेशांना विनायक म्हणतात कारण ते नायक वर्जित आहेत. अर्थात त्यांच्यावर कोणीही नायक नाही. त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. ते स्वतःसिद्ध आहेत. आत्म नियंत्रित आहेत. स्वतःच परमसत्ता असल्याने ते विनायक आहेत. विनायक शब्दाचा दुसरा अर्थ सांगताना वि उपसर्गाच्या दुसऱ्या अर्थाचा विचार करीत भगवान शंकर म्हणतात, सर्व ईश्वरांचे, महेश्वरांचे श्री गणेश हे विशेष नायक असल्याने त्यांना विनायक म्हणतात. विविध समस्या समयी ईश्वर, महेश्वर ज्यांना शरण जातात असे त्या सगळ्यांचे नायक ते विनायक. त्रिपुरासुरवधाच्या वेळी भगवान शंकर, मधुकैटभ वधाच्या वेळी भगवान विष्णू , विश्वाच्या निर्मितीच्या आरंभी चित्त चंचल झाल्यामुळे भगवान ब्रह्मदेव तथा लेण्याद्रीला देवी पार्वती उपास्य स्वरूपात ज्या मोरयाचे अनुष्ठान करतात ते विनायक. अर्थात या सगळ्यांच्या शक्ती जेव्हा मर्यादित होतात त्यावेळी आपल्यापेक्षाही अधिक शक्तिशाली असणाऱ्या अंतिम तत्त्व स्वरूपात हे सर्व ईश्वर महेश्वर देखील ज्या परम सत्तेला शरण जातात. ज्यांच्या नायकत्वाखाली आपल्या कार्याला मूर्त रूप देतात त्या परब्रह्म, परमात्म स्वरूप श्री गणेशाला विनायक असे म्हणतात. भगवान गणेशांच्या हातात अंकुश असतो त्यामुळे ते सगळ्यांना नियंत्रित करतात पण त्यांच्यावर कोणाचा अंकुश चालत नसल्याने ते स्वतः निरंकुश आहेत. मी भावपूर्णरीत्या सर्वदा म्हणजे सर्व काही देणाऱ्या श्री विनायकांना नमस्कार करतो.

## ५) श्री ढुंढिराज

भगवान श्री गणेशांचे एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण नाव म्हणजे श्री ढुंढिराज. देवी गंगेला हे स्तोत्र सांगणाऱ्या भगवान शंकरांनी स्वतः स्थापन केलेला श्री काशी नगरीतील मोरयाचा हा विग्रह. भगवान विश्वनाथांच्या दर्शनाच्या पूर्वी ज्यांचे दर्शन घ्यावे असा काशी नगरीचा प्रघात आहे ते भगवान ढुंढिराज.

काय आहे या नावाचा अर्थ? त्याचे विवेचन करताना भगवान शंकर म्हणतात.

वेदाः पुराणानि महेश्वरादिकाः शास्त्राणि योगेश्वरदेवमानवाः ।
नागासुरा ब्रह्मगणाश्च जन्तवो ढुण्ढन्ति वन्दे त्वथ ढुण्ढिराजकम् ॥

वेद, पुराण, महेश्वरादिक, शास्त्र, योगी, ईश्वर, देव, मानव, नाग, असुर, ब्रह्मगण हे सगळे ज्याला ढुंढतात म्हणजे शोधत असतात त्यांना श्री ढुंढिराज असे म्हणतात. येथे ढुण्ढन्ति अर्थात शोधत असणे हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. आपण शोध कोणत्या गोष्टीचा घेतो? तर सगळ्यात महत्त्वाची आणि पहिली गोष्ट म्हणजे त्या गोष्टीचाच शोध घेतला जातो जी गोष्ट आपल्याला पूर्णपणे प्राप्त झालेली नसते. जिचे अंतिम स्वरूप समजलेले नसते. जिचा पूर्ण गाभा लक्षात आलेला नसतो. त्या गोष्टीचे यथार्थ स्वरूप समजून घेण्यासाठी शोध सुरू असतो. वेद, पुराण, शास्त्र या सगळ्यांच्या माध्यमातून त्या मोरयाच्या परब्रह्म, परमात्म स्वरूपालाच यथार्थ रीतीने जाणून घेण्याचा प्रयास सुरू असला तरी या सगळ्यांच्या माध्यमातून केवळ शब्ददृष्ट्या जाणीव होऊ शकते. यथार्थ स्वरूपाची जाणीव केवळ अनुभवानेच संभव आहे. त्यामुळे या सगळ्यांच्या प्रयासाला शोधण्याचा प्रयत्न असे म्हटले आहे. हे सगळे तसा प्रयास करतात आणि त्यांना मोरया परिपूर्ण रीतीने समजत नाही म्हणूनच त्यांना म्हणतात श्री ढुंढिराज. दुसऱ्या बाजूला यामध्ये ईश्वर, महेश्वर, योगी, देव, मानव हे सगळे देखील मोरयाला शोधतात असे म्हटले आहे. शास्त्रांच्या माध्यमातून अनुभव जरी येत नसला तरी यांना देखील अनुभव नाही असे म्हणायचे आहे का? तर नक्कीच नाही. मग हे शोधतात या वाक्याचा अर्थ काय? तर मोरयाच्या सच्चिदानंद स्वरूपाचा परिपूर्ण अनुभव त्याच्याशी एकरूप झाल्यानंतरच येऊ शकतो. जोपर्यंत मानव, योगी इत्यादी अवस्थेत आहे अर्थात भगवंतापेक्षा भिन्न साधक या स्वरूपात त्याचे अस्तित्व आहे तोपर्यंत अगदी ईश्वर,महेश्वर झाले तरी ते ही मोरयाच्या त्या निर्गुण निराकार स्वरूपाला पूर्णपणे जाणू शकत नाहीत. सिद्ध अवस्थेत मोरयाशी एकरूप झाल्यानंतरच त्याच्या स्वरूपाची परिपूर्ण जाणीव होऊ शकते. त्यामुळे अगदी ईश्वर, महेश्वर देखील सगुण साकार स्वरूपात भिन्न आणि योगी मानव साधक आहेत तोपर्यंत ते मोरयाच्या त्या निर्गुण निराकार रूपाला शोधतच असतात असा भाव अपेक्षित आहे.

अशा स्वरूपात सर्व शास्त्रे आणि सर्व जीवांपासून शिवापर्यंत ज्याला शोधत असतात त्या परब्रह्म तत्त्वाला म्हणतात श्री ढुंढिराज.

## ६) श्री मयूरेश्वर

भगवान गणेशांच्या वेगवेगळ्या युगामध्ये झालेल्या अवतारांची वेगवेगळी नावे आहेत आणि त्यांची वेगवेगळी वाहने आहेत. कृतयुगामध्ये श्री विनायक अवतार सिंह वाहन होता. त्रेता युगातील श्री मयूरेश्वर अवतार मयूर वाहन होता. द्वापार युगातील श्री गजानन अवतार मूषक वाहन होता तर कलियुगाच्या अंती होणारा धूम्रवर्ण अवतार अश्व वाहन असेल. मात्र अशा वाहनांचा विचार येतो त्यावेळी प्रश्न पडतो की या वाहनांवर बसता कसे येईल? मोरावर किंवा मूषकावर बसता तरी येते का? तर येथे समजून घ्यायला हवी की केवळ भगवान गणेशच नव्हे तर अनेक देवतांच्या वाहनांवर बसणे ही गोष्ट सामान्य वाच्यार्थाने शक्यच नाही. ना हंसावर बसता येते ना गरुडावर. ना सिंहावर बसता येते ना मगरीवर. पण मग अशी वाहने का सांगितली असतील ? नेमक्या याच शंकेचे समाधान भगवान शंकर करीत आहेत. ते या सगळ्याच्या मागे असणाऱ्या रूपकात्मक अर्थांचा विचार स्पष्ट करीत आहेत. मयूरेश्वर शब्दाचा अर्थ सांगताना ते म्हणतात,

मायार्थवाच्यो हि मयूरभावो नानाभ्रमार्थं प्रकरोति तेनू ।
तस्मानं मयूरेशमथो वदन्ति नमामि मायापतिमासमन्तातम् ॥

देवी गंगेला या शब्दाचा गूढार्थ सांगताना भगवान शंकर म्हणतात मयूर हा शब्द मायेचा वाचक आहे. अर्थात मयूर म्हणजे माया. हे प्रतीक वापरताना त्यातील साम्याचा विचार महत्त्वाचा असतो.

मयूर हा विश्वातील सर्वात आकर्षक पक्षी आहे. त्याचा पिसारा आणि नृत्य हा शब्दातीत आनंदाचा विषय आहे. मात्र असे असले तरी त्याच्या ठिकाणी दोन दोष आहेत. काव्यशास्त्राच्या दृष्टीने मोर हा शिखिंडी आहे. नपुंसक आहे. तो आपल्या सहकाऱ्याला शारीरिक दृष्ट्या तृप्त करू शकत नाही. दुसरा दोष म्हणजे त्याचे पाय. तो कितीही सुंदर असला तरी त्याचे पाय अत्यंत कुरूप आहेत. अत्यंत आकर्षक असणे, पण तृप्त न करू शकणे आणि पाय म्हणजे आधार कुरूप असणे याच तीन वैशिष्ट्यांनी युक्त असणारी गोष्ट म्हणजे संसार. संसार वरून अत्यंत आकर्षक आहे पण तो कधीच कोणाला तृप्त करू शकत नाही. संसाराचा पाया असणारी वासना ही कुरूप आहे. त्यामुळे संसाराचे मायेचे प्रतीक आहे मयूर.

ती माया जीवाच्या जीवनात नाना प्रकारचे भ्रम निर्माण करते. त्या मायेचा पती अर्थात संचालक स्वरूपामध्ये भगवान गणेशांना मयूरेश,मयूरेश्वर असे म्हणतात. तिच्यावर सत्ता असणे या अर्थाने मोरावर बसलेला असणे. भगवान शंकर म्हणतात मी त्या मायापतीला नमन करतो.

## ७) श्री लंबोदर

भगवान श्री गणेशांची जी शरीर वैशिष्ट्ये आपल्या मनात पक्की बसलेली आहेत त्यापैकी एक म्हणजे त्यांचे विशाल उदर. त्या आधारे त्यांना महोदर, लंबोदर अशी विविध नावे प्राप्त झालेली आहेत. मात्र केवळ भले मोठे पोट एवढाच त्याचा अर्थ असेल का ? निश्चितच नाही. मुळात ईश्वर, महेश्वरांच्या देखील शरीराचे जे वर्णन केले जाते ते केवळ अवयवांचे नाही तर त्यामागे अपेक्षित असणाऱ्या एका भावार्थाचे ते प्रतीक असते. त्यातून शास्त्रकारांना काही विशिष्ट गूढार्थ सांगायचे असतात. श्री लंबोदर शब्दाचा देखील असाच अर्थ आहे. नेमका काय अर्थ या शब्दाचा ?

भगवान शंकर देवी गंगेच्या निमित्ताने संपूर्ण विश्वाला या सगळ्या नावांच्या मागे असणारा दिव्य आध्यात्मिक अर्थ उलगडून दाखवत आहेत. त्याच शृंखलेत श्री लंबोदर शब्दाचा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अर्थ त्यांनी खालील स्वरूपात व्यक्त केला आहे. ते म्हणतात,

यस्योदराद्विश्वमिदं प्रसूतं ब्रह्माणि तद्वज्जठरे स्थितानि ।
अनन्तरूपं जठरं हि यस्य लम्बोदरं तं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥

हे संपूर्ण विश्व अर्थात चतुर्दश भुवनांची, सप्त स्वर्ग आणि सप्त पाताळांची उतरंड आणि खरे तर अशी अनेक ब्रह्मांडे ज्यांच्या उदरातून प्रसूत म्हणजे निर्माण होतात. अनेक प्रकारची ब्रह्मे त्यांच्या जठर म्हणजे उदरामध्ये निवास करतात. अनेक प्रकारची ब्रह्मे म्हटल्यानंतर आपल्याला आश्चर्य वाटेल. आपल्या डोक्यात बसलेले असते की ब्रह्म एकच आहे. तर लक्षात घ्यायला हवे की एक आहे ते परब्रह्म. साधना दशेमध्ये, विवेचनाच्या पातळीवर अनेक गोष्टींना ब्रह्म असे म्हटलेले आहे. जसे उपनिषद अन्न, प्राण, मन, बुद्धी यांना देखील ब्रह्म म्हणते. अन्नं ब्रह्मेति अशा शब्दात विविध घटकांना आणि पुढे विष्णू ,शंकर ,देवी ,सूर्य यांना देखील ब्रह्म म्हटलेले असते. हे सर्व देखील त्या मोरयाच्याच उदरात म्हणजे नियंत्रणात असतात. स्वाधीन असतात.

या सगळ्यांना सामावून घेत असल्यामुळे स्वाभाविकच मोरयाचे उदर अनंत अर्थात अंतपार न लागणारे आहे. अशा स्वरूपात सर्व ब्रह्मांडांना निर्माण करणारे, सर्व ब्रह्मांना अंकित ठेवणारे आणि अपार अशा स्वरूपातील ज्यांचे उदर असते त्यांना श्री लंबोदर असे म्हणतात. तिथे पोटाच्या केवळ विशाल आकाराचा विषय नाही तर सर्वसमावेशक असणाऱ्या परमव्यापकतेचे प्रतीकात्मक वर्णन आहे लंबोदरत्व. भगवान शंकर म्हणतात मी नित्य त्यांना म्हणजे या स्वरूपातील त्या परब्रह्म, परमात्म्याला वंदन करीत असतो.

## ८) श्री गजानन

भगवान श्री गणेशांचे सर्वोपरी श्रेष्ठ नाव आहे गजानन. ऋग्वेदातील ग, यजुर्वेदातील ज, सामन वेदातील न आणि अथर्वण वेदातील न अशा जणू काही चारही वेदातील अंतिम अक्षरांना एकत्र करून गजानन नाव तयार होते अशी गाणपत्य संप्रदायाची भूमिका. जणू काही चारही वेदातील अंतिम कथन म्हणजे गजानन. सामान्य अर्थाने विचार केला तर गज म्हणजे हत्तीच्या स्वरूपात ज्यांचे मस्तक आहे ते गजानन असा अर्थ होतो. मात्र मूळ प्रश्न हा आहे की एखाद्या हत्तीचे मस्तक एखाद्या व्यक्तीच्या किंवा त्यातही बालकाच्या धडावर बसेल कसे ? दोघांचे गुणोत्तर जुळेल कसे? मग गजानन शब्दाचा नेमका अर्थ काय?

या शब्दामागे असणारा अत्यंत दिव्य अर्थ उलगडून दाखवताना भगवान शंकर म्हणतात,

जगद्गलाधो गणनायकस्य गजात्मकं ब्रह्मशिरः परेशम् ।
तयोश्च योगे प्रवदन्ति सर्वे गजाननं तं प्रणमामि नित्यमं ॥

भगवान शंकर म्हणतात श्री गणेशांचे गळ्याच्या खाली असणारे शरीर जगस्वरूप आहे तर त्यांचे मस्तक गज स्वरूप आहे. गज शब्दांमध्ये दोन अक्षरे आहेत. ग आणि ज. ही दोन अक्षरी पलटवली की शब्द तयार होतो जग. हे जग कधीतरी तयार झालेले आहे त्यामुळे त्याला सादी असे म्हणतात. हे जग कधीतरी नष्ट होणार आहे म्हणून त्याला सांत असे म्हणतात. हे जग तीन गुणांनी भरलेले आहे म्हणून त्याला सगुण असे म्हणतात. या जगात विविध आकार असल्याने त्याला साकार असे म्हणतात. हे जग अखंड बदलत असल्याने त्याला परिवर्तनीय असे म्हणतात. या जगातील कोणताच पदार्थ शाश्वत सुख देऊ शकत नसल्याने त्याला दुःखमय असे म्हणतात. एकत्रित स्वरूपात विचार केला तर जे सादि, सांत, सगुण, साकार, परिवर्तनीय, दुःखमय असते ते जग. याच्या जे विपरीत ते गज. अर्थात जे अनादी, अनंत, निर्गुण, निराकार, अपरिवर्तनीय, शाश्वत, आनंदरूप परब्रह्म ते गज. तेच ज्यांचे आनन म्हणजे मुख ते गजानन. भगवान गणेशांचे मस्तक गजरूप आहे. मस्तक ही ओळख असते. अर्थात निर्गुण, निराकार इत्यादी स्वरूपातच ज्यांना ओळखता येते त्यांना गजानन असे म्हणतात.

जगरूप शरीर म्हणजे प्रगटीकरण आणि गजरूप मस्तक म्हणजे वास्तव स्वरूप यांचे एकत्रीकरण श्री मोरयाच्या ठिकाणी होत असल्याने त्यांना गजानन असे म्हणतात. भगवान शंकर म्हणतात अशा स्वरूपात श्री गणेश परब्रह्म परमात्मा असल्याने मी त्यांना नित्य प्रणाम करतो. त्या स्वरूपाचे अभिवादन करतो.

## ९) श्री हेरंब

भगवान श्री गणेशांचे एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे श्री हेरंब. भगवान श्री सूर्य हेरंब गणेशाचे उपासक आहेत. त्यांच्या वंशात अवतरित झालेल्या भगवान श्री रामचंद्रांनी देखील जिथे जिथे श्री गणेश उपासना केली तेथील मोरयाचे नाव देखील आहे हेरंब. हे नाव तर आपल्या सगळ्यांच्या परिचित असते पण प्रश्न आहे त्याच्या अर्थाचा. काय आहे श्री हेरंब शब्दाचा अर्थ? देवी गंगेला तो अर्थ सांगताना भगवान श्री शंकर म्हणतात,

दीनार्थवाच्यस्त्वथ हेर्जगच्च ब्रह्मार्थवाच्यो निगमेषु रम्बः ।
तत्पालकत्वाच्च तयोः प्रयोगे हेरम्बमेकं प्रणमामि नित्यम् ॥

हेरंब शब्दांमध्ये हे आणि रंब असे दोन शब्द आहेत. त्या दोन्ही शब्दाचा भगवान शंकरांनी नेमका अर्थ स्पष्ट केला आहे. हे हा शब्द जगामध्ये दीन या अर्थाचा वाचक आहे. अर्थात या जगामध्ये जे कोणी दीन आहेत त्यांना हे असे म्हणतात. दीन हा शब्द अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामान्यतः आपण गरीब या अर्थाने या शब्दाचा उपयोग करतो. मात्र त्याचा अर्थ अधिक व्यापक आहे. शास्त्रामध्ये असलेल्या प्रत्येक शब्दाला एक वेगळी छटा असते. अर्थामध्ये सूक्ष्म भेद असतो. तो भेद नेमकेपणाने समजून घेतला तरच त्या शब्दाचा यथार्थ भाव आपल्याला जाणता येतो. त्या आधारे शास्त्रकारांना जे सांगायचे आहे ते नेमकेपणाने समजू शकते. असाच शब्द आहे दीन. दीन शब्दाचा अर्थ केवळ गरीब नाही. गरीब शब्दाचा अर्थ ज्याच्याजवळ कोणत्याही वस्तू नाही तो, असा आहे. मात्र दीन शब्दाचा व्यापक अर्थ म्हणजे जवळ सर्व काही असून देखील त्याचा असूनही उपयोग न करता येणे. घरात खायला काही नसणे याला गरीब असे म्हणतात तर घरात सर्व वस्तू भरलेल्या असून देखील खाण्याची क्षमता नसणाऱ्या व्यक्तीला दीन असे म्हणतात. वास्तवात ही अवस्था गरिबीपेक्षा देखील वाईट आहे. अर्थात येथे या शब्दाचा व्यापक आध्यात्मिक अर्थ अपेक्षित आहे. मानवी जीवनात मुक्तीचा मार्ग उपलब्ध असताना देखील त्यानुसार आचरण न करणाऱ्या जीवाला तेथे दीन म्हटलेले आहे. निगम म्हणजे वेदांमध्ये रंब हा शब्द ब्रह्म या अर्थाने वापरलेला आहे. ते ब्रह्म या सर्व जगाचे, सर्व दीन जीवांचे परिपालक असल्याने त्यांस रंब असे म्हणतात. या दोन्ही स्वरूपात नटलेले चैतन्य हे भगवान श्री गणेशच आहेत. त्यामुळे जग आणि जगत चालक अशा दोन्हींच्या योगामुळे, या दोन्ही स्वरूपात नटलेले असल्याने मोरयाला हेरंब असे म्हणतात.

## १०) श्री वक्रतुंड

मराठी व्याकरणानुसार किंवा सामान्य वाच्यार्थानुसार भगवान गणेशांच्या नावांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला तर ज्या नावांचा अत्यंत विपरीत आणि विक्षिप्त अर्थ निर्माण होऊ शकतो त्यापैकी एक नाव म्हणजे श्री वक्रतुंड. वाच्यार्थानुसार वक्र म्हणजे वेडेवाकडे आणि तुंड म्हणजे तोंड या पद्धतीने अर्थ घेतला तर वेड्यावाकड्या तोंडाचा असा अर्थ तयार होतो. जो मोरयांच्याबाबतीत कसाच अपेक्षित असू शकत नाही. मग या शब्दाचा अर्थ करायचा कसा? नेमका अर्थ माहिती नसल्यामुळे काही लोक आपल्या बुद्धीच्या क्षमतेनुसार वेगवेगळ्या पद्धतीने विचार करतात आणि त्यापैकी काही जण सांगतात की त्यांनी सोंड वाकडी केलेली आहे म्हणून ते वक्रतुंड. पण लक्षात घ्या प्रतीक रूपात ज्या हत्तीच्या मस्तकाचा विचार केलेला आहे त्या हत्तीच्या दृष्टीने विचार केला तर सोंड ही त्याची तोंड नसते. ती त्याचे नाक आहे. मोरयाचे नाव वक्रनासिका नाही. वक्रतुंड आहे. मग वक्रतुंड शब्दाचा नेमका अर्थ काय? तो दिव्य अर्थ देवी गंगेला सांगताना भगवान शंकर म्हणतात,

विश्वात्मकं यस्य शरीरमेकं तस्माच्च वक्त्रं परमात्मरूपम ।
तुण्डं तदेवं हि तयोः प्रयोगे तं वक्रतुण्डं प्रणमामि नित्यम ॥

भगवान श्री गणेशांचे शरीर विश्वात्मक आहे. अर्थात सगुण, साकार आहे. तुमच्या माझ्यासारखेच आहे. मात्र त्यांचे मुख आपल्यासारखे नाही. ते आपल्यापेक्षा वेगळेच आहे. श्री गजानन या नावात पाहिल्याप्रमाणे ते गज मस्तक आहे. निर्गुण, निराकार हीच त्यांची ओळख आहे. येथे भगवान शंकर वक्र हा शब्द वाकडे या अर्थाने न वापरता वेगळे या अर्थाने वापरत आहेत. मोरयाचे मुख म्हणजे त्यांची ओळख वेगळीच आहे अर्थात ती या जगाप्रमाणे सगुण, साकार नसून गजस्वरूप निर्गुण, निराकार आहे. परमात्मा स्वरूप असणारे त्यांचे हे तुंड म्हणजे तोंड अर्थात ओळख श्री मोरयाला वक्रतुंड संबोधन प्राप्त करून देते. त्या दोघांच्या प्रयोगाने म्हणजे सगुण,देह आणि निर्गुण मस्तक अशा स्वरूपातील एकमेव-अद्वितीय मोरया साठी संबोधन आहे श्री वक्रतुंड. या नावाचा श्री मुद्गल पुराणात आणखी एक वेगळा अर्थ दिलेला आहे तो म्हणजे वक्रा असणाऱ्या मायेला जो आपल्या तोंडाने म्हणजे फुंकरीने सहज उडवून लावतो त्या माया संचालक, विनाशक चैतन्याला श्री वक्रतुंड असे म्हणतात.

## ११) श्री ज्येष्ठराज

सर्वसामान्य सगळ्यांच्याच मस्तकामध्ये मोरयाचे जे स्वरूप आहे ते शिवपुत्र, पार्वती नंदन, शिवगण प्रमुख असेच आहे. गंमत म्हणजे हे स्वरूप म्हणत असतानाच आपण काही कथा देखील वाचतो. त्या कथा आपल्याला पाठ देखील असतात पण त्याचा अर्थ आपण कधीच समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. श्री गणेशांशी संबंधित अशीच एक कथा म्हणजे श्रीक्षेत्र लेण्याद्रीची कथा. भगवान गणेश आपल्या पोटी पुत्ररूपात जन्माला यावेत यासाठी देवी पार्वतीने भगवान शंकरांच्या उपदेशावरून श्रीक्षेत्र लेण्याद्री येथे तपश्चर्या केली. प्रसन्न झालेल्या मोरयाने पुत्ररूपाने गिरिजा म्हणजे पार्वतीच्या घरी अवतार घेतला म्हणून येथे मोरयाला गिरिजात्मक असे म्हणतात ही कथा म्हणत म्हणत, ऐकत ऐकत आपण लेण्याद्रीवर जातो. मात्र खाली येताना पुन्हा त्यांना फक्त पार्वती नंदन म्हणतो. आपल्याला हा प्रश्न कधीच का पडत नाही की जर ते केवळ पार्वती पुत्र आहेत तर पार्वतीने ते आपल्या घरी अवतीर्ण व्हावेत म्हणून त्यांच्या जन्माच्या पूर्वीच त्यांची तपश्चर्या कशी केली? पार्वती तपश्चर्या कोणाची करते? ते शाश्वत परब्रह्म आहे भगवान गणेश. पार्वतीच्या घरी झाला तो केवळ एक अवतार. मोरयाचे असे अनेक अवतार आहेत. कृतयुगातील विनायक अवतार कश्यप आणि आदिती यांच्या घरी झालेला आहे. त्यात ना शंकरांचा संबंध आहे ना पार्वतीचा. हीच अवस्था आहे श्रीक्षेत्र रांजणगाव येथील कथेची. त्रिपुरासुर वधाच्या वेळी आकाशवाणीने सांगितल्यानुसार भगवान शंकरांनी तेथे गणेश उपासना केली. भगवान गणेश केवळ शिवपुत्र असते तर पित्याने पुत्राची उपासना कशी केली?

विविध अवतारातील हे माता पिता स्वरूप केवळ अवतारापुरते आहेत. ते मोरयाचे वास्तव माता-पिता नाहीत. जसे कौसल्या दशरथ रामाचे माता पिता असतात, देवकी वसुदेव कृष्णाचे माता पिता असतात, भगवान विष्णूंचे नाही. हेच रहस्य सांगताना भगवान शंकर म्हणतात,

मातापिताऽयं जगतां परेषां तस्याऽपि माता जनकादिकं न ।
श्रेष्ठं वदन्ते निगमाः परेशं तं ज्येष्ठराजं प्रणमामि नित्यम् ॥

तो मोरया सगळ्या जगाचा आणि परेश म्हणजे ईश्वर महेश्वरांचा देखील माता-पिता म्हणजे निर्मिती स्थान आहे. त्याचे कोणीही माता किंवा जनक नाही.

निगम म्हणजे वेद त्यांना सगळ्या देवतांपेक्षाही श्रेष्ठ म्हणतात. त्यामुळेच त्यांना शास्त्र ज्येष्ठराज असे म्हणते. अन्य सर्व देवता, ईश्वर, महेश्वर ज्येष्ठ आहेत. आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. मात्र मोरया या सर्व ज्येष्ठांचाही ज्येष्ठ असल्याने त्यांना ज्येष्ठराज असे म्हणतात.

## १२) श्री स्वानंदनाथ

भगवान श्री गणेशांच्या निवासस्थानाचे नाव आहे स्वानंद. ज्याप्रमाणे भगवान श्री विष्णूंचे निवासस्थान वैकुंठ, श्री शंकरांचे कैलास त्याप्रमाणे मोरयाचा लोक स्वानंद.

मात्र श्री मुद्गल पुराणाने वर्णन केलेल्या दिव्य आध्यात्मिक अर्थाने हा केवळ एका स्थानाचा विचार नाही तर तो एका अवस्थेचा विचार आहे. त्या स्वानंद अवस्थेचा विचार करीतच मोरयाच्या स्वानंदनाथ या नावाचे चिंतन स्पष्ट करताना भगवान शंकर म्हणतात,

नानाचतुःस्थं विविधात्मकेन संयोगरूपेण निजस्वरूपमं ।
पूर्यस्य सा पूर्णसमाधिरूपा स्वानन्दनाथं प्रणमामि चातः ॥

हे विविधात्मक असणारे संपूर्ण विश्व चतु: पदार्थ म्हणजे चार प्रकारच्या रचनांनी युक्त असते. असत ,सत ,सम आणि नेति किंवा अव्यक्त अशा शब्दात या चार अवस्थांचे वर्णन केलेले असते. या जगात जे जे निर्माण होते आणि नष्ट होते त्या सर्व दृश्य, परिवर्तनशील गोष्टींना शास्त्र असत असे म्हणते. व्यष्टीच्या पातळीवर देह आणि समष्टीच्या पातळीवर हे विश्व असे असत आहे. अशाश्वत आहे. परिवर्तनशील आहे. या असत च्या आत असणारे, त्याचे संचालन करणारे आणि अपरिवर्तनीय स्थिर असणारे चैतन्य म्हणजे सत अर्थात देह बदलत असला तरी जीव बदलत नाही. नश्वर विश्व बदलत असले तरी ईश्वर बदलत नाही. त्यामुळे त्याला सत असे म्हणतात. या दोन्हींच्या एकत्रित अवस्थेला सम असे म्हणतात. अर्थात जडस्वरूप देह किंवा विश्व आणि त्याचे संचालन करणारा चैतन्य स्वरूप जीव किंवा ईश्वर या दोन्हींचे एकत्रीकरण म्हणजे सम. देह आहे म्हणून देही या शब्दाला अर्थ आहे. त्याचे देही स्वरूपातील सतब किंवा सम असणे या दोन्ही गोष्टी सापेक्ष आहेत. त्या व्यक्त झालेल्या आहेत. या सापेक्षतेच्या पलीकडे असणारे चैतन्याचे निरपेक्ष स्वरूप म्हणजे नेति किंवा अव्यक्त. या व्यक्त स्वरूपातील तीन आणि अव्यक्त स्वरूपातील एक अशा चारही अवस्थांचे एकत्रीकरण म्हणजे स्वानंद. त्याला निज म्हणजे स्व- स्वरूप असे म्हटले. अशा त्या परिपूर्ण समाधी स्वरूप स्वानंद अवस्थेमध्ये जे निवास करतात त्यांना म्हणतात श्री स्वानंदनाथ.

## १३) श्री आशापूरक

सामान्य मानवांनीच नव्हे तर अगदी देवी देवतांनी सुद्धा त्यांच्या संकट समयी यांच्या चरणाची आस धरली ते आहेत भगवान गणेश. अशाच स्वरूपात भगवान श्री यमराजांनी तपश्चर्या करून स्थापन केलेल्या श्री क्षेत्र अमलाश्रम येथील भगवंताचे नाव आहे श्री आशापूरक. या क्षेत्राची कथा मोठी महत्त्वपूर्ण आहे. भगवान श्री सूर्याची पत्नी देवी संज्ञा हिला त्यांचे तेज सहन न झाल्याने तिने आपली प्रतिकृती स्वरूपात देवी छाया श्री सूर्यांच्या जवळ ठेवून ती आपल्या पिताश्री श्री विश्वकर्मा यांच्याकडे गेली. संज्ञेचे पुत्र असणारे भगवान श्री यमराज यांच्याबद्दल छायेच्या मनात सावत्र पुत्र म्हणून एक प्रकारची आढी होतीच. तिच्याद्वारे मिळणाऱ्या सावत्र वागणुकीने संतप्त झालेले, मूलतः न्यायाधीश स्वरूप असणारे भगवान यमराज एक दिवस चिडून जमिनीवर पाय आपटते झाले. भगवान श्री यमराजांच्या या कृतीचा चुकीचा अर्थ घेऊन , जणू काही मलाच लाथ मारली असे म्हणत, त्यांची सावत्र माता असणाऱ्या छाया हिने त्यांना पाय गळून जाण्याचा शाप दिला. त्या शापातून मुक्तता मिळवण्यासाठी श्री सूर्यांच्याच आदेशावरून सूर्यपुत्र यमराजांनी येथे तपश्चर्या केली. सूर्यपुत्र स्वरूपात त्यांनी स्थापन केलेल्या मोरयाचे देखील मूळ नाव श्री हेरंब असे आहे. मात्र मातेच्या शापाच्या दुष्परिणामापासून मुक्ती मिळावी ही आशा मनात धरून त्यांनी तपश्चर्या केल्यावर त्यांना मिळालेल्या वरदानाने त्यांची आशा पूर्ण झाली म्हणून येथे भगवंताला आशापूरक रूपात ओळखले जाते. नेमकी हीच भावना अधोरेखित करीत भगवान शंकर देवी गंगेला म्हणतात,

मनोरथानं पूरयतीह गङ्गे चराचराणां जगतां परेषामं ।
अतो गणेशं प्रवदन्ति चाशा- प्रपूरकं तं प्रणमामि नित्यम् ॥

हे देवी गंगे ! भगवान श्री गणेश या सर्व चराचरांच्या, जगाच्या आणि ईश्वर, महेश्वरांच्या देखील मनोरथांना, इच्छांना पूर्ण करतात म्हणून श्री गणेशांना आशापूरक असे म्हणतात. मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ आशा कोणती? तर अखंड आनंद प्राप्ती. ती आशा कोण पूर्ण करू शकतो? तर जो अखंड आनंदात आहे. ती अवस्था आहे माझ्या मोरयाची. स्वानंदात असणारा स्वानंदेशच परिपूर्ण आनंदाची इच्छा पूर्ण करीत असल्याने त्यांना आशापूरक असे म्हणतात. सध्या महाराष्ट्राच्या बीड या जिल्ह्यात असणाऱ्या या क्षेत्राचे मूळ संस्कृत नाव आहे अमलाश्रम. जिथे कुठलाही मल उरत नाही तो अ-मल आश्रम. आजही या गावाला नामलगाव असे नाव आहे. त्यातही तोच भाव आहे.

## १४) श्री वरद

भगवान श्री गणेशांच्या निर्गुण निराकार स्वरूपाची उपासना करणाऱ्या वर्गाला गाणपत्य संप्रदाय असे म्हणतात. या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानानुसार भगवान गणेश या विश्वाची सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ सत्ता आहेत. निर्गुण, निराकार, परब्रह्म असणाऱ्या भगवान श्री गणेशांना इच्छा झाली की आपण एकटेच अनेक रूपामध्ये नटावे. त्या इच्छेचा परिणाम म्हणून त्यांच्या ओंकार स्वरूपातून, श्री ब्रह्मदेव, श्री विष्णु, श्री शंकर, श्री देवी आणि श्री सूर्य हे पंचेश्वर विभक्त रूपात प्रकट झाले. मात्र यांच्यापैकी कोणालाच ना

स्वतःची परिपूर्ण ओळख होती ना इतरांची. विश्वाच्या आरंभी हे पाचही ईश्वर कधीतरी एकत्र आले आणि त्यांनी परस्परांना प्रश्न केला की तुम्ही कोण आहात? कोणाच्याच जवळ त्याचे परिपूर्ण उत्तर नव्हते. त्यावेळी त्यांनी परस्परांना विचारले की तुमच्यापैकी कोणी मला निर्माण केले आहे का? ज्यावेळी या प्रश्नाचे देखील उत्तर नकारात्मक आले त्यावेळी भगवान शंकर म्हणतात ज्या अर्थी आपण पाच आहोत आणि आपण एकमेकाला निर्माण केलेले नाही त्याअर्थी आपल्याला निर्माण करणारा कोणीतरी वेगळा असायलाच हवा. तो कोण आहे ? हे माहिती नसल्याने यस्मै कस्मै नमो नमः ! अर्थात जो कोणी असेल त्याला वंदन असो अशा शब्दात या सगळ्यांनी तपश्चर्या केली आणि परिणाम स्वरूप भगवान श्री गणेश त्यांच्यासमोर प्रगट झाले. या पंचेश्वरांना त्यांची नावे, त्यांची आयुधे, त्यांची निवासस्थाने, त्यांची कार्ये भगवान श्री गणेशांच्या कृपेने प्राप्त झाली अशी संप्रदायाची धारणा आहे.

अशा स्वरूपात सगळ्यांना वर देणाऱ्या त्या मोरयाचे वर्णन करताना भगवान शंकर म्हणतात,

वरैः समास्थापितमेव सर्वं विश्वं तथा ब्रह्मविहारिणा च ।
अतः परं विप्रमुखा वदन्ति वरप्रदं तं वरदं नतोऽस्मि ॥

आपल्या वरदानाच्या म्हणजे कृपारूप आशीर्वादाच्या माध्यमातून त्यांनी हे संपूर्ण विश्व आणि त्यामध्ये विहार करणारे ईश्वर, महेश्वर स्वरूप ब्रह्म सुस्थापित केले. त्यामुळे विप्रमुख अर्थात ऋषी,मुनी त्या वर प्रदान करणाऱ्या मोरयाला वरद असे म्हणतात. मी त्यांना वंदन करतो.

## १५) श्री विकट

भारतीय संस्कृतीने सांगितलेली एक अद्वितीय संकल्पना म्हणजे माया. मा म्हणजे नाही आणि या म्हणजे जी. जी अवस्था जशी नाही तशी जाणवणे यालाच माया असे म्हणतात. अत्यंत वेगळ्या पद्धतीने वैज्ञानिक स्वरूपात आपल्याला हा सिद्धांत समजून घेता येतो. समजा आपल्यासमोर एखादी भिंत आहे. भिंत कशापासून तयार झाली? तर त्या भिंतीच्या अणूंपासून. कोणतीही वस्तू त्या वस्तूच्या अणू पासूनच तयार होते. अणूंचे विघटन होई पर्यंत शास्त्रज्ञांना तो अंतिम कण वाटत होता. मात्र अणूचे विघटन झाले आणि त्याच्या आत तीन प्रकारचे कण आहेत हे कळले. इलेक्ट्रॉन, न्यूट्रॉन, प्रोटॉन. यापैकी इलेक्ट्रॉन प्रचंड गतीने फिरतात. फिरण्याच्या याच क्रियेच्या आधारे समजून घेता येते की ज्या अर्थी आत हे इलेक्ट्रॉन फिरतात त्या अर्थी अणू मध्ये पोकळी आहे. हजारो फिरणाऱ्या इलेक्ट्रॉन ने तयार झालेला अणू देखील फिरत आहे. गती हा सचेतनाचा गुण आहे. अर्थात प्रत्येक अणु पोकळ आहे. गतिशील आहे आणि सचेतन आहे. तशा अणू पासून बनलेली भिंत देखील तशीच असायला हवी. मात्र ती तशी दिसत किंवा अनुभवाला येत नाही. ती पोकळ न जाणवता भरीव वाटते. ती गतिशील न जाणवता स्थितीशील जाणवते. तिच्यातील सचेतनत्वाचा अनुभव न येता अचेतनत्वाचाच अनुभव येतो.यालाच माया असे म्हणतात. याच शास्त्रीय सिद्धांताच्या आधारे भगवान शंकर म्हणतात,

मायामयं सर्वमिदं विभाति मिथ्यास्वरूपं भ्रमदायकं च ।
तस्मात्परं ब्रह्म वदन्ति सत्य-मेनं परेशं विकटं नमामि ॥

हे जे काही जाणवत आहे ते सर्व मायामय आहे. मिथ्या आहे अर्थात जसे नाही तसे जाणवत आहे. मिथ्या म्हणजे पूर्ण खोटे नाही. तर ज्याचे वर्णन खरे की खोटे ? या शब्दात करता येत नाही ते. जसे स्वप्न. ते उठल्यावर खोटे वाटत असले तरी जोपर्यंत आपण स्वप्नात आहोत तोपर्यंत ते सत्यच वाटत असते. मात्र उठल्यावर ते असत्य आहे हा आपला अनुभव असतो. अशा स्वरूपात सत्य की असत्य हे याचे निश्चित वर्णन करता येत नाही त्याला माया म्हणतात. ती विविध भ्रम निर्माण करणारी आहे. त्यामुळेच तिला शास्त्रात कट असे म्हणतात. अशा कट स्वरूप मायेच्या पलीकडे असणारा, ज्याच्यापाशी माया गळून पडते असा, ब्रह्मस्वरूप, सर्वश्रेष्ठ परमात्मा विकट नावाने ओळखला जातो. मी त्याला वंदन करतो.

## १६) श्रीधरणीधर

धरणी शब्दाचा अर्थ आहे पृथ्वी. त्यामध्ये धारण करणे असा भाव आहे. जी या सर्व जीवांना धारण करते, आपल्यावर आपल्या शक्तीने धरून ठेवते किंवा जगवते तिला धरणी म्हणतात. या धरणीला धारण करतो तो धरणीधर. या अर्थाने संस्कृत साहित्यात पर्वताला देखील धरणीधर असे म्हणतात. त्याचप्रमाणे ही सर्व पृथ्वी शेषाच्या मस्तकावर आहे या संकल्पनेनुसार शेषाला धरणीधर असे म्हणतात. श्री मुद्गल पुराणामध्ये शेषांनी केलेल्या गणेश उपासनेच्या वेळी त्यांनी मोरयालाच धरणीधर म्हटले आहे. त्याचे कारण देताना श्री शेष म्हणतात,

अहं धराधरः प्रोक्तः स्थूलशब्दप्रधारकः ।
त्वं चित्तभूमिगः स्वामिनं योगेन धरणीधरः ।।

अर्थात मी स्थूल शब्दाने धराधर आहे. पृथ्वीला धारण करणारा या अर्थाने मला धरणीधर म्हणतात पण हे भगवंता आपण चित्तभूमी नामक सूक्ष्म भूमीचे धारण करीत असल्याने आपणास योगशास्त्राच्या माध्यमातून धरणीधर असे म्हटले आहे.

नेमका हाच भाव भगवान शंकर देवी गंगेला समजावून सांगत आहेत. भगवान शंकर म्हणतात,

चित्तस्य प्रोक्ता मुनिभिः पृथिव्यो नानाविधा योगिभिरेव गङ्गे ।
तासां सदा धारक एक एव वन्दे च धरणीधरमादिभूतम् ॥

हे गंगे योग्यांनी म्हणजे योग साधना करणाऱ्या तथा मुनींनी म्हणजे मनन करणाऱ्या साधकांनी चित्ताच्या विविध भूमी वर्णन केलेल्या आहेत. अर्थात विविध पद्धतीने विविध स्थानी चित्त स्थिर होत असते. ते ज्या स्थानी स्थिर होते त्या स्थानाला त्याचे आधारस्थान या अर्थाने भूमी असे म्हटलेले आहे. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे क्षिप्त चित्त संसारालाच आधार करते आणि तेथेच राहते त्यामुळे त्याला चित्ताची भूमी असे म्हटले आहे. या सर्व चित्तभूमींचा देखील आधार मोरयाच आहे. त्यामुळे योगातील अर्थाच्या दृष्टीने मोरयाला धरणीधर असे म्हणतात. त्याचप्रमाणे योगशास्त्रामध्ये चित्त मूलाधार इत्यादी विविध चक्रांच्या ठिकाणी निवास करीत असल्याने त्या स्थानांना चित्तभूमी असे म्हटले आणि त्या सर्व भूमींचे धारण भगवान करीत असल्याने भगवंतांना धरणीधर असे म्हणतात.

## १७) श्री सिद्धिबुद्धीश

भगवान श्री गणेशांच्या दोन अंगाला दोन देवी असतात. एकीचे नाव आहे सिद्धी दुसरीचे नाव आहे बुद्धी. गाणपत्य संप्रदायात रिद्धी, सिद्धी असे शब्द नाहीत तर सिद्धी आणि बुद्धी असे शब्द आहेत.

आपल्यापैकी अनेकांना हे शब्द माहिती आहेत. फक्त प्रश्न आहे की त्यापैकी सिद्धी कोणती ? आणि बुद्धी कोणती? जर ते माहीतच नसेल तर मग त्यातील मिळेल कोणती? शास्त्राने वर्णन केले की मोरयाच्या डाव्या हाताला असते ती सिद्धी आणि मोरयाच्या उजव्या हाताला असते की बुद्धी. किती सुंदर रचना आहे ही? मोरया म्हणतो जीवनात सिद्धी म्हणजे पद, पैसा, प्रतिष्ठ इत्यादी सर्व गोष्टी हव्यातच. पण त्या सर्व गोष्टी डाव्या म्हणजे गौण आहेत. त्यांच्यापेक्षा बुद्धी उजवी आहे. कारण बुद्धीच्या माध्यमातून सिद्धी प्राप्त करता येते पण सिद्धीच्या माध्यमातून बुद्धी प्राप्त होत नाही.

देवी सिद्धी आणि बुद्धीच्या याच स्वरूपाचा विचार करीत भगवान श्री शंकर देवी गंगेला म्हणतात,

विश्वात्मिका ब्रह्ममयी हि बुद्धिः तस्या विमोहप्रदिका च सिद्धिः ।
ताभ्यां सदा खेलति योगनाथः तं सिद्धिबुद्धीशमथो नमामि ॥

ब्रह्ममयी असणारी म्हणजे परब्रह्माच्या चैतन्य स्वरूपाच्या प्रतिबिंबाला धारण करणारी विश्वात्मक अर्थात सर्व व्यापी असणारी जी शक्ती तिला बुद्धी असे म्हणतात.

त्या बुद्धीच्या ठिकाणी जी शक्ती विमोह निर्माण करते तिला सिद्धी असे म्हणतात. अपुऱ्या प्रकाशात ज्याप्रमाणे दोरीचे ज्ञान न झाल्याने दोरीच्या ठिकाणी साप दिसतो त्याप्रमाणे मोरयाचे परिपूर्ण ज्ञान न झालेल्या बुद्धीच्या जोरावर देवी सिद्धी नाना प्रकारचे भ्रम निर्माण करते. वेदांत शास्त्रात मायेच्या या दोन शक्तींना आवरणात्मिका शक्ती आणि विक्षेपात्मिका शक्ती असे म्हणतात. त्यांनाच गाणपत्य संप्रदायाच्या परिभाषेमध्ये सिद्धी आणि बुद्धी असे म्हणतात. वेदांत शास्त्राचे तेच सिद्धांत संप्रदायाला सांगायचे आहेत. फक्त संप्रदायाने त्यात पारिभाषिक बदल केलेले आहेत. त्या दोघींच्या माध्यमातून जे योगनाथ भगवान लीला करीत असतात त्यांना सिद्धीबुद्धीश असे म्हणतात. भगवान शंकर म्हणतात मी त्या मायापती मोरयाला वंदन करतो.

## १८) श्री ब्रह्मणस्पती

गाणपत्य संप्रदायाचा सर्वोच्च ग्रंथ आहे श्री मुद्गल पुराण. या पुराणात काही अतिवैशिष्ट्यपूर्ण परिभाषा सादर केलेल्या आहेत. जशी अष्टविनायक ही कल्पना मूलतः श्री मुद्गल पुराणाची. या पुराणातील नऊ पैकी आठ खंडांमध्ये श्री वक्रतुंड, श्री एकदंत, श्री महोदर ,श्री गजानन, श्री लंबोदर, श्री विकट, श्री विघ्नराज आणि श्री धूम्रवर्ण अशा आठ विनायकांची चरित्रे वर्णन केलेली आहेत. यातील आरंभीच्या चार विनायकांचे वर्णन व्यष्टी स्वरूपात म्हणजे व्यक्तीच्या पातळीवर तर पुढील चार विनायकांचे वर्णन समष्टीच्या म्हणजे विश्वाच्या पातळीवर केलेले आहे. व्यष्टी पातळीवर त्यांना देह, देही, बोध आणि सांख्य अशा चार ब्रह्मरूपात वर्णन केलेले असून समष्टी पातळीवर असत, सत, सम आणि नेति अशा चार ब्रह्मांचा विचार केलेला आहे. देवतांच्या परिभाषेत त्यांना क्रमाने श्रीशक्ती, श्रीसूर्य, श्री विष्णू आणि श्री शंकर असे संबोधिले आहे. याच सर्व परिभाषांचा आधार घेत भगवान शंकर देवी गंगेला म्हणतात,

असत्यसत्साम्यतुरीयनैज्यग त्रिवृत्ति रूपाणि विरच्य खेलकः ।
सदा स्वयं योगमयेन भाति तं नमाम्यतोऽहं त्वथ ब्रह्मणस्पतिम् ॥

असत ,सत, साम्य, तुरीय, नैजग, निवृत्ती अशा विविध स्वरूपामध्ये विविध ब्रह्मांची निर्मिती करून भगवान श्री गणेश त्यांच्या माध्यमातून खेळत असतात अर्थात लीला करीत असतात. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे परिवर्तनशील देहाला आणि विश्वातील समस्त पदार्थांना असत असे म्हणतात. त्यात जड पदार्थांना देखील स्वतःची शक्ती असल्याने त्याला शक्ती ब्रह्म म्हटले. त्या देहाचे, देहातील अवयवांचे प्रकाशन करणाऱ्या देहस्थ चैतन्याला देही आणि विश्वाच्या पातळीवर सूर्य म्हटले.

देह आणि देहीच्या एकत्रित अवस्थेला व्यष्टी पातळीवर बोध तर समष्टी पातळीवर सम अर्थात सर्वत्र व्यापक स्वरूपात श्रीविष्णू असे म्हटले जाते. तर या सर्वांचा निरास झाल्यानंतर संख्या विरहित स्वरूपात व्यष्टी स्तरावर सांख्य तर समष्टी स्तरावर नेती किंवा शिवब्रह्म अशी संज्ञा आहे. या सगळ्यामध्ये चैतन्य स्वरूपात अधिष्ठित असले तरी स्वतः मात्र योगरूपामध्ये अर्थात यांच्यातील कोणत्याही गुणदोषांच्या स्पर्शाने रहित अवस्थेत ते या सर्व ब्रह्मांचे अधिष्ठान स्वरूप संचालक असल्याने त्यांना ब्रह्मणस्पती असे म्हणतात.

## १९) श्री माङ्गल्येश

भगवान श्री गणेशांच्या विषयात सर्वसामान्यांच्या मनामध्ये ज्या काही समजुती पक्क्या बसलेल्या आहेत त्यापैकी एक म्हणजे उजव्या सोंडेचा गणपती. उजव्या सोंडेचा गणपती फार कडक असतो. त्याचे सोवळे, ओवळे अत्यंत महत्त्वाचे असते. त्याची ठरावीक पद्धतीने रोज पूजा झालीच पाहिजे. अन्यथा तो संकट निर्माण करतो. अशा स्वरूपातील अनेक भूमिका आपण वारंवार ऐकतो. मात्र खरेच असे काही असते का? गाणपत्य संप्रदायाच्या कोणत्याही ग्रंथात उजव्या किंवा डाव्या सोंडेच्या गणपतीचे वेगळे वर्णनच नाही. मग त्याचे कडक किंवा सौम्य असणे हा तर नंतरचाच विषय. सर्वप्रथम आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोरया मंगलमूर्ती आहे. तो कधीही कोणाचे काही अमंगल करीत नाही. त्यामुळे उजव्या सोंडेचा विग्रह घरात आहे म्हणून तो आपले काही वाईट करेल ही कल्पनाच निरर्थक आहे. दोन मिनिटं चर्चेपुरते मान्य जरी केले तरी अशी उजव्या सोंडेची मूर्ती मंदिरात नेऊन ठेवणे किंवा कोणत्या गुरुजींना देणे या वाक्यात त्यांचे वाईट झाले तरी चालेल, हा किती विचित्र अर्थ आहे? लक्षात घ्या भक्ती हा प्रीतीने करायचा विषय आहे भीतीने नाही.

मोरयाच्या याच मंगलमूर्ती स्वरूपाचे वर्णन करताना भगवान शंकर देवी गंगेला म्हणतात,

अमङ्गलं विश्वमिदं सहात्मभिः अयोगसंयोगयुतं प्रणश्वरमं ।
ततः परं मङ्गलरूपधधारकं नमामि माङ्गल्यपतिं सुशान्तिदमं ॥

अमंगल काही असेल तर ते हे विश्वच आहे. आपल्या सोबतच्या सर्व गोष्टींच्या बाबतीत अयोग आणि संयोग म्हणजे दुरावणे आणि पुन्हा मिळणे या गोष्टी वारंवार चालत असतात. संयोग होतो तेव्हाच वियोगाची निश्चिती ठरलेली असते. त्याचप्रमाणे हे संपूर्ण विश्व प्रणश्वर म्हणजे विनाशशील आहे. यातील कोणतीच गोष्ट शाश्वत नाही. चिरंतन नाही. कितीही प्रदीर्घकाळ असला तरी कधी ना कधीतरी विनाश निश्चित आहे. त्यामुळेच या विश्वाला अमंगल म्हटले आहे. या विश्वाच्या या दोषांच्या पार असल्यामुळे मोरयाला माङ्गल्येश असे म्हणतात. ते मंगलमूर्तीच सुशांती प्रदान करू शकतात. अस्थिर, परिवर्तनशील, नश्वर विश्वाच्या माध्यमातून मिळणारे सुख देखील तसेच असणार. एक तर ते विश्व नश्वर आहे आणि दुसरी गोष्ट त्याचा आस्वाद घेणारा देह नश्वर आहे. मात्र मोरया या दोन्हीच्या पार असल्याने तोच शाश्वत शांती प्रदान करू शकतो कारण ते त्याचे स्वरूप आहे.

## २०) श्री सर्वपूज्य

गाणपत्य संप्रदायात मोरया शिवपुत्र, पार्वती नंदन किंवा शिवगण प्रमुख म्हणून पूजनीय नाही तर शिवहरिरविब्रह्मजनक स्वरूपात यांचे अभिवादन केले जाते. सामान्य व्यक्तीच नव्हे तर ईश्वर,महेश्वर देखील त्यांच्या संकट समयी ज्या श्री चरणांचा आश्रय करतात ते आहेत भगवान गणेश.

त्रिपुरासुर वधाच्या वेळी भगवान शंकरांनी श्रीक्षेत्र रांजणगाव येथे त्यांचे पूजन केले. मधुकैटभ दैत्यांच्या विनाशासाठी भगवान श्री विष्णूंनी सिद्धटेक येथे गणेश उपासना केली. चित्ताला स्थिरता प्राप्त व्हावी म्हणून भगवान ब्रह्मदेवांनी श्रीक्षेत्र थेऊर येथे श्री चिंतामणीची स्थापना केली. श्री गणेश आपल्या पोटी पुत्र रूपात यावेत यासाठी देवी पार्वतीने लेण्याद्रीला त्यांची तपश्चर्या केली. श्रीक्षेत्र काशी येथे भगवान श्री सूर्यांनी श्री लोलार्क गणेशाची स्थापना केली.

नवगण राजुरी किंवा श्रीक्षेत्र ओझर सारख्या क्षेत्रांवर सर्व देवतांनी एकत्र उपासना करून त्यांची स्थापना केली आहे.

देवराज इंद्र श्रीक्षेत्र कळंब, श्री चंद्र गंगामसले, श्री मंगळ पारनेर, श्री यमराज अमलाश्रम, श्री शनि पैठण अशा स्वरूपात वेगवेगळ्या देवतांनी केलेल्या गणेशोपासनांची स्थाने उपलब्ध आहेत.

भगवान श्री विष्णूंच्या मानवी अवतारात श्री वामनांनी श्रीक्षेत्र आदासा, श्री परशुरामांनी श्री क्षेत्र माहूर, श्री रामचंद्रांनी श्री विद्याधीशपुरम्, श्री श्रीकृष्णांनी पुणे जिल्ह्यातील सुपे आणि यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथे गणेश स्थापना केल्याचे उल्लेख आहेत.

मोरयाच्या याच सर्वपूज्य स्वरूपाचे वर्णन करताना भगवान शंकर देवी गंगेला म्हणतात,

सर्वत्रमान्यं सकलावभासकं सुज्ञैः शुभादावशुभादिपूजितम् ।
पूज्यं न तस्मान्निगमादिसम्मतं तं सर्वपूज्यं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥

भगवान श्री गणेश सर्वत्र म्हणजे सर्वच संप्रदायांमध्ये अर्थात शैव, वैष्णव,शाक्त, सौर या सर्वच संप्रदायात मान्य आहेत. सगळ्यांनाच ते पूजनीय आहेत. ज्ञानी व्यक्तीने सर्व शुभ किंवा अशुभ कार्यांच्या आरंभी त्यांचेच पूजन केलेले आहे. वेदांमध्ये त्यांच्यापेक्षा पूज्य कोणालाही मानलेले नाही. त्या सर्वपूज्य श्री गणेशांना मी नित्य वंदन करतो.

## २१) श्री विघ्नराज

भारतीय कथांमागे असणारी मानसशास्त्रीय भूमिका व्यवस्थित समजून घ्यायला हवी. कथांमध्ये दोन प्रकारच्या कथा असतात एक विधी कथा तर दुसऱ्या निषेध कथा.

एखादी गोष्ट करा म्हणजे तुम्हाला हे लाभ होतील हे सांगणाऱ्या कथांना विधी कथा असे म्हणतात तर एखादी गोष्ट करू नका त्याने तुमचे हे नुकसान होईल हे सांगणाऱ्या कथांना निषेध कथा असे म्हणतात. लाभाच्या प्रीतीने असो की नुकसानीच्या भीतीने दोन्ही कडून त्या गोष्टी व्हाव्यात हाच त्यामागील एकमेव हेतू असतो.

हीच गोष्ट भक्तीच्या क्षेत्रातही लागू पडते. एका बाजूला भगवंताची भक्ती केल्याने प्राप्त होणारे लाभ सांगितलेले असतात तर दुसरीकडे भक्ती न करणाऱ्यांच्या जीवनात येणाऱ्या संकटांचा उल्लेख असतो. दोन्हीचा उद्देश असतो जीवाला भक्तीकडे प्रवृत्त करणे.

नेमक्या याच मानसशास्त्रीय भूमिकेचा विचार करीत भगवान श्री गणेशांच्या विघ्नराज स्वरूपाचे वर्णन करताना भगवान शंकर देवी गंगेला म्हणतात,

भुक्तिं च मुक्तिं प्रददाति तुष्टो भक्तिप्रियो निजविघ्नहा च ।
भक्त्या विहीनाय ददाति विघ्नान तं विघ्नराजं प्रणमामि नित्यम् ॥

भगवान गणेश प्रसन्न झाल्यावर भुक्ती आणि मुक्ती दोन्ही प्रदान करतात. व्यावहारिक संपन्नतेला भुक्ती असे म्हणतात तर आध्यात्मिक शांतीला मुक्ती. देवी सिद्धी आणि बुद्धीचे पती असणारे भगवान ह्या दोन्ही गोष्टी प्रदान करतात. भक्ती प्रिय असणारे भगवान निज म्हणजे आपल्या भक्तांची सर्व विघ्नही दूर करतात. मात्र जे भक्तिविहीन आहेत त्यांना नाना प्रकारची विघ्ने प्रदान करतात. त्यामुळेच त्यांना विघ्नराज असे म्हणतात. जीवनातील भुक्ती मुक्तीच्या प्राप्तीच्या इच्छेने असो किंवा विघ्नांच्या निवारणाच्या भूमिकेतून असो भगवंताची भक्ती व्हायला हवी हेच शास्त्रकारांना विशेषत्वाने सांगायचे आहे. भगवंताची भक्तीच मानवाला पशुत्वातून विकसित करी परमेश्वराच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहित करीत असते. मानवी जीवनात येऊन दिव्यत्व प्राप्त न करणे हेच खरे तर सगळ्यात मोठे विघ्न. सुख, शांती, समाधान हीच सर्वोच्च प्राप्ती. ती ज्या मोरयाच्या कृपेने होते त्यांना म्हणतात विघ्नराज. आपल्या जीवनातील समस्त विघ्नांना दूर करीत आपणास भुक्ती आणि मुक्ती प्रदान करावी या प्रार्थनेसह या लेखमालिकेची सांगता.

**जय गजानन**

**विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड, वणी मो. नं. ९८२२६४४६११**

# श्रद्धांजली!!



श्यामराव आष्टेकर
माजी क्रीडा राज्यमंत्री



बाळासाहेब शिरोळे
माजी महापौर



भारतभाऊ बोंद्रे
माजी मंत्री



गंगाधरराव पटणे
माजी आमदार



राज पुरोहित
माजी मंत्री



महादेव शिवणकर
माजी खासदार



मुकुल रॉय
माजी केंद्रीय मंत्री



प्रकाश देवळे
माजी आमदार



शंकरराव निम्हण
माजी महापौर



शालिनीताई पाटील
महाराष्ट्राच्या माजी महसूल मंत्री



शिवाजीराव कर्डिले
आमदार



सुरूपसिंग नाईक
माजी आमदार



ब्रिगेडियर जगपाल सिंग
पाकिस्तानात घुसून
तिरंगा फडकविणारे वीर



मधुमती
अभिनेत्री



जसपाल राणा
दिग्गज नेमबाज



जालिंदर कामठे
जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष



हेमा साने
ज्येष्ठ पर्यावरणतज्ञ



तुषार पाटील
अपर पोलिस अधीक्षक, दौंड

# श्रद्धांजली!!


भरत कपूर
अभिनेता


नितिन देसाई
डीबीएलचे अध्यक्ष आणि
व्यवस्थापकीय संचालक


एस.एल.भैरप्पा
लेखक


विनया ऐनापूरकर
लेखिका


रामचंद्र मोरवंचीकर
प्रख्यात इतिहासकार, लेखक


रतनलाल सोनग्रा
लेखक


डॉ. मुकुंद अभ्यंकर
कॉसमॉस को-ऑप. बँकेचे
माजी अध्यक्ष


सर विल्यम मार्क टुली
ब्रिटिश पत्रकार आणि
नवी दिल्लीतील बीबीसीचे ब्युरो प्रमुख


प्रा.भास्कर चंदनशिव
लेखक


विनोदकुमार शुक्ल
हिंदी साहित्यिक


प्रा.राजेंद्र डेंगळे
जर्मन लेखक


अरविंद पाटकर
ज्येष्ठ प्रकाशक




पंडिता प्रभा मराठे
ज्येष्ठ कथक नृत्यांगना


ललिता जे. राव
शास्त्रीय गायिका


रघू राय
प्रसिद्ध छायाचित्रकार


सी.डी.गोपीनाथ
ज्येष्ठ कसोटीपटू


डिकी बर्ड
माजी क्रिकेट पंच

# श्रद्धांजली!!



श्रीनिवास कुलकर्णी
ज्येष्ठ साहित्यिक



मंगला सामंत
लेखिका, विचारवंत



प्रकाश कुंटे
ज्येष्ठ बुद्धिबळ संघटक



विक्रांत आढाव
क्रीडापत्रकार



डॉ.श्रीपाद ढेकणे
मुख्यमंत्री कार्यालयाचे अधिकारी



प्रदीप रावत
अभिनेता



तीजनबाई
ज्येष्ठ लोकगीत गायिका



डॉ.गौतम गोवित्रीकर
दंतशल्यविशारद



कुकू कोहली
सिनेदिग्दर्शक



डॉ.पराग रासने
मंडळाचे वैद्यकीय सल्लागार



नंदकुमार आढाव
(मयूर ब्रास बँड )



प्रकाश ननावरे



सुधाकर आंबेडकर



श्रीमती सुमती
यशवंतराव राहुरकर



शोभाबेन भल्ला



प्रकाश भोईटे
ज्येष्ठ पत्रकार



सत्यपाल ऊर्फ
गोट्या मावडीकर





# गणेशोत्सव २०२५

## मयूरेश्वर जन्मोत्सव

भाद्रपद शु. चतुर्थी ते अनंत चतुर्दशी

दि. २७/०८/२०२५ ते ०६/०९/२०२५


श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे.
श्री पद्मनाभस्वामी मंदिर - केरळ





नुरवी, पुरवी प्रेम, कृपा जयाची...!!!



बाप्पांचे जल्लोषपूर्ण वातावरणात प्रस्थान!!!



बाप्पांची पहिली छबी टिपण्यासाठी भक्तांची लगबग...



मंडपाचे विधीवत भूमिपूजन

# आगमन मिरवणूक !


कार्यकर्त्यांची तरुण पिढी


बाप्पांचे औक्षण करण्यासाठी आतुरतेने वाट बघणाऱ्या महिलाभगिनी


प्रभात बँडचे सुमधुर वादन


पदाधिकारी व कार्यकर्ते








बाप्पाचे उत्सवमंडपात आगमन



## भाद्रपद शुध्द चतुर्थी,
## श्रींची प्रतिष्ठापना!

झालरिया पिठाधीश्वर
श्री श्री १००८ परमपूज्य
स्वामीजी श्री घनश्यामाचार्य महाराज
यांच्या शुभहस्ते विधीवत संपन्न झाली.



सुख, समृद्धी मांगल्य कायम राहण्यासाठीचा संकल्प...



ॐ एकदंताय विद्महे, वक्रतुंडाय धीमहि...!!!





पूजेच्या मंगलमूर्तीचे स्वस्थानी प्रस्थान...



'सुखकर्ता दु:खहर्ता...'
उत्सवातील पहिली मंगल आरती



ट्रस्टच्या वतीने प. पू. स्वामीजींचा सत्कार



प. पू. घनश्यामाचार्य महाराजांचे आशीर्वचन

# विद्युत रोषणाई उद्‌घाटन

**राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्या शुभहस्ते झाले.**



श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्याकडून श्रींची आरती



श्रींच्या विद्युत रोषणाईचे
श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्या हस्ते उद्‌घाटन



श्री पद्मनाभ स्वामी मंदिर





ट्रस्टतर्फे श्रीमती माधुरीताई मिसाळ यांचा सत्कार

## हरिजागर



... विठ्ठल गणपती नाही दूजा!!



## प.पू.महासाधू गणेशाचार्य मोरया गोसावी महाराजांच्या पालखीचे उत्सव मंडपात स्वागत



बोला मंगलमूर्ती मोरया...!!



# सामूहिक अथर्वशीर्ष पठण

# ऋषिपंचमी !

ॐ नमस्ते गणपतये।
त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि।
त्वमेव केवलं कर्ताऽसि।
त्वमेव केवलं धर्ताऽसि।
त्वमेव केवलं हर्ताऽसि।
त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्माऽसि।
त्वं साक्षादात्माऽसि नित्यम्।।





**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां**
**स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा।**


महाआरती


अथर्वशीर्ष पठण


अथर्वशीर्ष पठण


ट्रस्टतर्फे सौ. सुनेत्राताई पवार यांचा सत्कार


अथर्वशीर्ष पठण


सह. धर्मदाय आयुक्त सौ. रजनीताई क्षीरसागर यांचा सन्मान


गणेश गजर...!!!

# गणेशयाग

प्रणम्य शिरसा देवं
गौरिपुत्रं विनायकम् ।
भक्तावासं स्मरेन्नित्यमायुःकामार्थसिद्धये ।।












# महाभिषेक... !!!

## सामान्य भाविक, आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर श्रींना अभिषेक करतात.


मा.श्री.अंकुशजी व सौ. ज्योतीताई काकडे


आमदार श्री. हेमंतभाऊ व सौ.मृणालिनीताई रासने


मा.श्री. राजूशेठ सांकला व रंजनाताई सांकला


मा.श्री. गणेशजी व सौ. गौरीताई बिडकर


मा.श्री. राजेशजी पांडे सपत्नीक


मा. श्री. प्रवीणजी चोरबोले सपत्नीक


किन्नर समुदाय


थायलंडहून खास आलेले बाप्पांचे भक्त


अभिनेत्री तेजस्विनी पंडित


अनाथांच्या नाथा तुज नमो... श्रीवत्स संस्थेतील बालक


सांख्यज्योतिषी सुश्री श्वेता जुमानी


म.न.पा.अधिकारी श्री.दिनेश गोरोला सपत्नीक


श्री.कृष्णराजजी महाडीक सपत्नीक


अव त्वं माम् ।


अव वक्तारम् ।

सूर्यनमस्कार, अथर्वशीर्ष पठण
करताना विविध शालेय विद्यार्थी ...
अग्निहोत्राची महती आणि महत्त्व भाविकांपर्यंत
